पुणें मराठी ग्रंथालय
नाटक
क्रमांक -- १८५

016484

# संगीत

# दामिनी.

पुणे मराठी ग्रंथालय
ांक नाटक २८५
ांक ३३०८

# संगीत दामिनी.

श्रीमती हिराबाई पेडणेकर,
संगीत जयद्रथविडंबन, संगीत मिराबाई
इत्यादि नाटकांच्या कर्त्री
यांनीं लिहिलें.

[प्रथमावृत्ति.]

सर्व हक्क स्वाधीन.

किंमत बारा आणे.

Printed by G. N. Kulkarni at his Karnatak Press,
No. 7, Girgaon Back Road, Bombay,
and
Published by Hirabai Pednekar, at Ganjawalla's Chawls,
Kandewadi, Bombay.

# दोन शब्द.

सुमारें पांचसहा वर्षांपूर्वी एका पौराणिक कथानकाच्या आधारें मीं ' जयद्रथ-विडंबन' नांवाचें एक लहानसें संगीत नाटक लिहिलें. मजसारख्या एका अशिक्षित स्त्रीची ती अगदीं सामान्य कृति असतांहि स्त्रीशिक्षणाविषयीं कळकळ व कौतुक असणाऱ्या अनेक विद्वान् व रसिक गृहस्थांनां ती बरीच आवडली, असें कळल्यामुळें प्रोत्साहन येऊन एक मोठें स्वतंत्र नाटक लिहावें, असें मला वाटूं लागलें. प्रस्तुत नाटक हें त्याच विचाराचें फल होय.

हें नाटक मीं लिहिलें खरें, परंतु तें रंगभूमीवर आलें नसतें तर त्याचें फारसें चीज होण्याचा व तें लोकांसमोर यावयाचा विशेष संभव नव्हता. चांगल्या विद्वान् नाटककारांच्या सुंदर नाट्यकृति रंगभूमीवर यावयाला किती अडचणी येतात, याविषयीं कांहीं माहिती व थोडा अनुभव असल्यामुळें मजसारख्या अशिक्षित स्त्रीची ही सामान्य कृति रंगभूमीवर कशी येते, याबद्दल मला फार काळजी वाटत होती. परंतु **ललितकलादर्श संगीत नाटक मंडळीचे** मालक **रा. रा. केशवराव भोंसले** व व्यवस्थापक **रा. रा. गणेश विनायक वीरकर,** यांनीं हें नाटक रंगभूमीवर आणून ठिकठिकाणीं याचे कळकळीनें प्रयोग केले. या त्यांच्या धैर्याबद्दल व स्त्रीशिक्षणाविषयींच्या आस्थेबद्दल त्यांचे मीं कितीहि आभार मानिले तरी ते थोडेच होणार आहेत. परंतु यापेक्षांहि ठिकठिकाणीं झालेल्या या नाटकाच्या प्रयोगांनां कौतुकानें सहानुभूति दाखविणाऱ्या व परगुणपरमाणूचा पर्वत करणाऱ्या स्त्रीशिक्षणाभिमानी रसिक विद्वानांचे व प्रेक्षकवृंदाचे उपकार मला अधिक वाटतात, हें येथें अवश्य नमूद केलें पाहिजे.

शेवटीं, प्रस्तुत नाटकाच्या रचनेंतील, मुद्रणांतील व प्रयोगांतील अनेकविध दोषांकडे सदय अंतःकरणानें पहाण्याविषयीं सविनय विनंति करून नाटकाकडे वळण्यास मी वाचकांनां व प्रेक्षकांनां प्रार्थना करितें.

मुंबई,
ता. १ अक्टोबर १९१२.

**हिराबाई पेडणेकर.**

# पात्रें.

| | |
|---|---|
| **तारानाथ** ... ... ... | कान्तिपुरचा राजा. |
| **मंदार** ... ... ... | कान्तिपुरांतील एक सरदार, इंदुमतीचा नवरा. |
| **रजनीकान्त अथवा मधुकर**... | दामिनीचा नवरा आणि इंदुमती व तारिणी यांचा बंधु. |
| **पुरंदर** ... ... ... | तारानाथाचा सापत्न बंधु. |
| **सदानंद, विश्वानंद, प्रेमानंद**... | पुरंदराचे शिष्य व साथीदार. |
| **तारिणी** ... ... ... | तारानाथाची बायको आणि इंदुमती व रजनीकान्त यांची बहीण. |
| **इंदुमती** ... ... ... | मंदाराची बायको आणि तारिणी व रजनीकान्त यांची बहीण. |
| **दामिनी** ... ... ... | रजनीकान्ताची बायको. |
| **चित्रांगदा** ... ... | तारिणीची दासी व पुरंदराची हस्तक. |

कोतवाल, शिपाई वगैरे.

स्थल—कान्तिपुर.

# संगीत दामिनी.

## मंगलाचरण.

[ चाल–अमान तु हमान० ]

प्रणाम सदा शिवेप्रती । अर्धतनू पतिची व्यापुनि बहु
चतुरा त्रिभुवनिं जी रमणीय सती–विजयासि दावि सक-
लांसि ॥ ध्रु० ॥ अन्तरिं चपला मेघ धरी । द्युति वह्नि-
सवें वसतीसि करी । मधु वर्षे ज्योत्स्ना इंदु करीं । जन
मोहिनी मोही प्रणयभरीं । या मूर्ति तदीया भिन्न परी ।
सदा विजयी ॥ १ ॥

---

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

[ **स्थलः**–समुद्राचा तीर. दामिनी मूर्च्छित पडली आहे, असा प्रवेश. ]

**दामिनी**—( सावध होऊन ) संपलं का वादळ ? आतां उघडूं का मी डोळे ? बोलायचं नाहीं वाटतं माझ्याशीं ? नका बोलूं गडे ! मी उघडतेंच आतां डोळे ! इतकी कांहीं मी भित्री नाहीं हो ! ( डोळे उघडून ) अगबाई ! हें काय ? मी जहाजांत प्रियकरांच्या जवळ ना होतें ? मग मी इथं कशी आलें ? समजलं. मी फार भित्री आहें, ह्मणून वाटतं मला इथं एकटी निजलेली ठेऊन तिकडे कुठं तरी माझी मौज पहात लपून बसायला झालं असेल. प्राणनाथ ! पुरे झाली गडे, आतां ही थट्टा ! यावं आतां लवकर अन् आपल्या या लाडकीचं भय दूर करावं. अजूनहि नाहींना यायचं ? थांबा ! मी या तांडेलांनांच विचारतें आतां. ( चहूंकडे पाहून ) मी इकडे कशी आलें ? आमचं जहाजहि कुठं दिसत नाहीं ! मला इथं एकटी सोडून हे सर्वजण गेले तरी कुठं ? खास इथं कांहीं तरी दगा आहे. हं ! आतां आठवलं. आह्मी त्या भयंकर वादळांत सांपडलों होतों

अन् त्यांत आमचं जहाज फुटून मी इथं आलें. हो ! असंच. नाहीं तर मीच एकटी इथं कशी आलें असतें ? ( थांबून ) पण माझ्या प्रियकरांची काय स्थिति झाली असेल ? प्राणनाथ ! आपली ती सुंदर मूर्ति मला या स्थलीं दिसेल काहो ? समुद्राच्या भयंकर स्वरूपाचं मला भय वाटलं ह्मणून आपण मला हृदयाशीं घट्ट धरून बसलां ! अन् अशा भयंकर संकटांत आपली प्रिया सांपडली असतां कशी हो आपणांला तिची कींव येत नाहीं ?

[ चाल—मैतो उनको बचन्० ]

**टाकुनीयां प्रिया ! केविं गेलां । एकलीला ॥ ध्रु० ॥**
**दुःख हें कीं मजसि द्यावया कुंभजन्मा कुणी जन्मला ।**
**तयें प्रेमाब्धि का शोषिला ॥ १ ॥ कधिंहि अंतर न दिधलें**
**मला । अदय मग कां अतां जाहलां । विरह माझा**
**सुखद वाटला ॥ २ ॥**

देवा, आह्मां उभयतांचा असा वियोग करून तुला लाभ तरी कोणता झाला ? तुझ्या सेवेला मी कधीं चुकलें नाहीं. माझे प्राणनाथ तुझी विभूति आहेत, असं समजून मीं त्यांची या क्षणापर्यंत एकनिष्ठपणानं सेवा केली—दीनदयाळा ! त्याचं कारे हें फळ मला तूं दिलंस ?

[ चाल—नका निंदू० ]

**जाहलासी असा क्रूर कैसा दयाळा ! दया काय अजुनी**
**न येई । सौभाग्यतिलका न, मज्जीवना कां नेलेंसि**
**एकाकि गेहीं ॥ ध्रु० ॥ सोसूं कसें दुःख साहे न हा**
**विरह, ने त्यांसमचि ईसही । विरहीं तुझ्या पळहि**
**कमला न राही, तद्विरह तैसा तुला दुःख देई । हा**
**स्वानुभव ध्यानिं घेई ॥ १ ॥**

पण देवा ! तुझ्याकडे तरी काय दोष ? मींच चांडाळणीनं त्यांनां माझ्या-बरोबर माहेरीं येण्याचा आग्रह केला नसता, तर असा प्रसंग आह्मांवर कां आला असता ? हे सागरा ! माझ्या प्राणनाथांसारखं रत्न आपल्या उदरांत घेऊन आपलं रत्नाकर हें नांव तूं अगदीं सार्थ केलंस ! आणि वाळुकेप्रमाणं मला या तीरावर टाकलंस. आह्मां पतिपत्नींत असा द्वैतभाव करणं तुला शोभलं ना ? मी इतकी का पापिणी आहें, कीं, माझ्या पुण्यशील नाथांच्या सहवासानं सुद्धां

मी पावन झालें नाहीं ? असो-तूं जरी माझा अव्हेर केलास, तरी त्या परमेश्वराला माझी खास करुणा येईल.

[चाल-न छेडो हमे०]

**नुपेक्षी कधिंही शरणागतास ईश तो ॥ ध्रु० ॥ आप्तजनहि दूर करिति, वालि न ज्या कोणि जगतिं, रक्षितसे त्याप्रती सदा अनाथनाथ तो ॥ १ ॥ भक्तकाजिं धांव घेत, संकटिं तद्वन करीत, प्रार्थनेसि मम वळत न काय रमाकांत तो ॥ २ ॥**

ती पहा प्राणनाथांची मूर्ति मला आपणाकडे यायला खुणवीत आहे. प्राणनाथ ! ही आलें मी. आपणावांचून या दुःखमय जगतांत मी एक क्षण तरी कशी राहूं ? ( थांबून ) अगबाई ! पण मी अशा या वाईट कल्पनाच कां बरं मनांत आणतें आहें ? मी जशी त्या भयंकर संकटांतून वांचलें, तसेच माझे प्रियकरहि वांचले नसतील कशावरून ? परमेश्वराच्या मनांतून जर आह्मांला सुखी करायचं असेल, तर तेंहि कांहीं अशक्य नाहीं. सध्याच उतावीळपणा न करितां धीर धरून रस्ता मिळेल तिकडे जावं अन् गांवोगांव प्राणनाथांचा शोध करावा. शोध लागला तर ठीकच आहे; नाहीं तर मृत्यूच्या द्वारानं तरी परलोकीं त्यांना शोधायला जावं. अशा रीतीनें मरतांना, माझें कर्तव्य मीं केलं, असं मनाला समाधान तरी होईल. प्रियकरांच्या दर्शनाविषयीं मनांत जरा आशा उद्भवतांच स्वतःच्या जीविताची मला चिंता वाटूं लागली. मी दुःखावेगांत असल्यामुळें मला या जागेचं मुळींच भय वाटलं नव्हतं. अगबाई ! काय हें भयंकर रान ! यांतून मी जीवंत राहून प्रियकरांचा शोध करणार कसा ? (वर पाहून) ज्यानं मला जीवंत राहण्याची बुद्धि दिली, तोच माझं रक्षणहि करील.

---

## प्रवेश दुसरा.

[ **स्थल**-पुरंदराचा मठ. पुरंदर, सदानंद, प्रेमानंद व विश्वानंद बसले आहेत. ]

**पुरंदर**—सांगितलेलें राहीलना नीट ध्यानांत ? नाहीं तर आयत्या वेळीं कराल कांहीं तरी घोटाळा ! ह्मणून तुह्मांला पुन्हां सांगतों. मंदार आज सहकुटुंब आपल्या जहागिरीच्या गांवीं जाणार आहे. वाटेंत त्याच्यावर छापा घालून इंदुमतीला पळवा आणि त्याला असा चोप द्या, कीं, महिना दोन महिने त्यानें

अंथरूण सोडूं नये ! तितक्या अवधींत आपलें राणीविषयींचें काम आटोपून येथून पोबारा करूं; मग खुशाल करूं द्या तारानाथाला आमचा शोध. मात्र आपणाला फार सावधगिरीनें काम केलें पाहिजे.

**सदानंद**—त्याविषयीं नको आपल्याला काळजी. असलीं कामें बेमालूमपणें साधणें ह्मणजे आतां आमच्या हातचा मळ होऊन राहिलें आहे. यमालाहि ऐखाद वेळीं एखाद्यावर पाश टाकायला विचार करावा लागत असेल, पण आमच्या दुर्भेद्य पाशांत आम्हीं हां हां म्हणतां माणसें अडकावतों !

**पुरंदर**—आपल्या कामांत तुम्ही इतके कुशल आहां, म्हणून तर माझीं सारीं कारस्थानें यशस्वी होतात. खरेंच, चोऱ्या करणें, डाके घालणें वगैरे कामांत तुम्ही चोरांच्या गुरूंचेहि गुरु आहांत !

**विश्वानंद**—पण काय हो गुरुजी ! चोरी करणें, हें पातक आहे असें म्हणतात, तें खरें का ?

**पुरंदर**—कोण म्हणतो असें ? आणा त्याला असा माझ्यासमोर ! अरे वेड्या, चोरी करणें जर पातक असतें, तर कृष्णासारख्या देवादिकांनीं त्या कां केल्या असत्या ? परमेश्वरानें सुद्धां धडधडीत चोऱ्या केल्या, मग आम्हीं तर काय यःकश्चित् माणसें !

**प्रेमानंद**—गुरुजी ! तुम्हीं हा मार्ग स्वीकारण्याचें अद्यापि आम्हांला कारण सांगितलें नाहीं. आम्हीं तुम्हाला चार दोन वेळ विचारिलें, पण सांगेन कधीं तरी, अशी तुम्ही आजपर्यंत टाळाटाळीच करीत आलां. आज नाहीं आम्ही तुम्हाला सांगितल्याशिवाय सोडायचे !

**पुरंदर**—( स्वगत ) आजपर्यंत मीं यांच्याजवळ माझा वृत्तांत गुप्त ठेविला होता; पण मी जर असा त्यांच्याशीं कपटानें वागलों, तर तेहि माझ्याशीं तसेच वागणार. यांचा माझ्यावर पूर्ण विश्वास आहे. शिवाय माझ्या आश्रयाशिवाय यांनां एक दिवसहि राहतां येणार नाहीं; मग यांच्याजवळ माझें हृद्गत सांगायला काय हरकत आहे ? ( उघड ) तर मग आज सांगतोंच तुम्हांला. तुम्ही माझे परम मित्र आहांत; तेव्हां तुमच्याजवळ माझा वृत्तांत सांगायला कांहीं हरकत नाहीं.

**प्रेमानंद**—आपल्या मित्रांविषयीं इतका संशय ?

**पुरंदर**--भलतेंच कांहीं तरी ! तुमच्याबद्दल का संशय घ्यायचा? या स्थितींत फार सावधगिरीनें वागावें लागतें. ऐका तर मग. या संस्थानचे अधिपति तारानाथ तुम्हांला ठाऊक असतीलच ?

**सदानंद**--हो ! हो ! त्यांची आमची दोन चार वेळां भेट झाली होती. प्रत्येक वेळीं तीन तीन चार चार महिने आम्हांला फुकट जेवण मिळण्याची अन् बिनभाड्यानें रहाण्याची त्यांनीं फार चांगली व्यवस्था केली. मोठे उपकारी गृहस्थ आहेत ते !

**विश्वानंद**--मीहि तुमच्याबरोबरच होतोंच कीं ! फक्त माझी मुष्टिमोदक व धम्मकलाडू यांवरच संभावना झाली; पण तुम्हांला मात्र चार महिने अंधारकोठडीचें सुख मिळालें ! तें असो, पण पुढची हकीगत गुरुजी ?

**पुरंदर**--तारानाथ आणि मी सापत्न बंधु.

**प्रेमानंद**--अस्सें अस्सें ! तर मग आपला दर्जा फारच मोठा आहे म्हणायचा. आजपर्यंत आम्हीं आपल्याशीं आपण आह्मांपैकींच एक आहां, असें समजून फार सलगीचें वर्तन केलें, त्याची क्षमा करा.

**पुरंदर**--त्यांत कसली क्षमा मागतां? तुमच्यापेक्षां माझी उच्च स्थिति आहे, असें का तुम्हांला वाटतें? तुम्ही माझ्यापेक्षां शतपटीनें बरे; तुम्हाला फक्त शारीरिक यातनाच कधीं भोगाव्या लागत असतील; पण मला शारीरिक आणि मानसिक या दोन्ही प्रकारच्या व्यथांनीं गांजलें आहे.

**सदानंद**--मानसिक व्यथा प्रबल होतात, तेव्हांच अंगीं वैराग्य बाणतें.

**पुरंदर**--कसलें वैराग्य घेऊन बसलां अहांत ! एखाद्या नटाप्रमाणें मनोविकार दाबून प्रसंग येईल तसें मला वागावें लागतें.

**प्रेमानंद**--पण इतकी ही यातायात कशाकरितां ?

**पुरंदर**--तें ओघानेंच तुह्माला पुढें कळेल. येथला पूर्वीचा राजा निपुत्रिक होता. आमचे वडील गरीब खरे, पण त्यांवर त्याचा फार लोभ असे. आमच्या वडिलांनां दोन बायकांपासून झालेले आह्मी दोघे मुलगे. आह्मांपैकीं एक मुलगा राजानें माझ्या वडिलांजवळ दत्तक मागितला. त्यांनींहि मित्रत्वाला स्मरून आणि आह्मीं भाग्यास चढावें ह्मणून माझ्या धाकट्या भावाला–तारानाथाला–राजाला दत्तक दिलें आणि माझ्यावर त्यांचें अतिशय प्रेम, ह्मणून या पुढल्या हालअपेष्टा सोसायला मला त्यांनीं आपलें भिकार गृहराज्य अर्पण केलें. कांहीं दिवसांनीं

राजा आणि माझे वडील दोघेहि मृत्यु पावले. अंतर इतकेंच, कीं, तारानाथाच्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्याच्या हातांत संस्थानचें आधिपत्य आलें आणि आमच्या वडिलांच्या मृत्यूनें आह्मांला चौखुंटाची जहागीर मिळाली !

**सदानंद**–दैवाची गति विचित्र आहे !

**पुरंदर**–मला जेव्हां दारिद्र्यानें अतिशय भंडावून सोडलें, तेव्हां तारानाथ पूर्वींचें नातें कांहीं स्मरतो का पहावें, ह्मणून मी कांहीं दिवसांनीं त्याच्याकडे गेलों. तेथें गेलों तों काय ? जें आमच्या स्थितींत अंतर, तेंच प्रेमांतहि दिसून आलें.

**प्रेमानंद**–मला वाटत होतें, कीं, आह्मांलाच या धनानें वेडें केलें आहे. पण नाहीं, मोठमोठे लोक सुद्धां आमच्याप्रमाणेंच पागल बनतात !

**पुरंदर**–तारानाथ राजा होतांच त्याच्या माझ्या वैभवांत किती अंतर पडलें पहा. त्याच्या पायांशीं शेंकडों भुवनसुंदरी लोळण घेतात आणि मी त्यांच्या पायांशीं लोळण घेतली, तरी त्या माझ्याकडे ढुंकूनहि पहात नाहींत ! संपत्तीला तो लाथेनें झिडकारीत असतां ती हात जोडून त्याच्यापुढें उभी ! आणि मी तिच्यासाठीं श्रम करीत असतां माझ्यावर तिची वक्रदृष्टि ! अशीं एक कीं दोन, किती उदाहरणें तुह्माला सांगूं? या त्याच्या सुखामुळें, माझ्या मनांत जो त्याच्याबद्दल मत्सराग्नि पेटत होता, त्यांत या क्रोधाग्नीची भर पडतांच तो अधिक प्रदीप्त होऊन त्यानें माझ्या देहाचा भडका उडविला ! त्याच्याप्रमाणें माझी स्थिति झाली पाहिजे, तर एक मी शांत होईन; किंवा निदान त्याचा सूड उगवून तरी माझ्या हृदयांत पेटत असलेल्या दोन्ही अग्नींना विझवून टाकीन.

**प्रेमानंद**—कां ही व्यर्थ यातायात? आपणाजवळ आतां धनसंचय बराच झाला असेल. तेव्हां खुशाल चैन करून सौख्य भोगायला काय हरकत आहे ?

**पुरंदर**—माझा मुख्य हेतु तडीस गेल्याशिवाय या भगव्या वस्त्रांनां आणि सूड घ्यायच्या इच्छेला मी कधीं सोडणार नाहीं.

**सदानंद**—तुमचा मुख्य हेतु कोणता ?

**पुरंदर**—तारानाथाचीं आणि माझीं कारस्थानें मोडण्यांत जे कोणी त्याला साहाय्य करीत आहेत, त्यांचा मी पक्का सूड घेणार ! त्याच्या प्रजेच्या धनाची लूट करून, त्यांना अनंत यातना देऊन मी स्वतः सुखाच्या शिखरावर बसणार !

**प्रेमानंद**—पण हें सारें वैराग्याच्या वेषानें कसें साधणार ?

**पुरंदर**—याच वेषांत तर माझें कार्य बेमालूम रीतीनें पार पडेल. अरे, हा वेष ह्मणजे भाविक लोकांचा विश्वास आकर्षून घ्यायचें बिनतोड साधन ! माझ्या

कार्यांची मजल बरीच आली आहे. माझ्या साधुत्वाची खात्री करून राणीला दर्शनाकरितां आपल्या मठांत आणण्यासाठीं आपली चित्रांगदा तिच्याजवळ दासी होऊन राहिली आहे, हें तुह्माला ठाऊकच आहे.

**प्रेमानंद**—पण गुरुजी! तुह्मी केलेली कामाची अन् चैनीची वाटणी एकंदरींत कांहीं ठीक नाहीं बुवा! तुह्मी वाटेल तशा चैनी माराव्या आणि आह्मी त्या कांटेऱ्या रानावनांतून वणवण हिंडत असावें!

**सदानंद**—मला वाटतें, प्रत्येकानें पंधरा पंधरा दिवस गुरु बनून इतरांनीं त्याचें शिष्यत्व पत्करावें; ह्मणजे सगळ्यांनां सारखें सुख भोगायला मिळेल.

**पुरंदर**—(स्वगत) काय चमत्कार आहे! माझें हृद्गत कळण्याबरोबर हे माझ्या सुखाचा हेवा करूं लागले! (उघड) माझ्या जागीं आतां तुह्मी कोणीहि मठाधिपति झालां, तर लोकांनां आतां तुमचा तितका विश्वास पटणार नाहीं आणि आपलें जमत आलेलें सारें कारस्थान बिघडेल. पण तुह्मी इतके अधीर कां होतां? माझा एकादा कार्यभाग झाला, कीं, आपण सारेजण खुशाल चैन करूं. तोंपर्यंत मात्र सुख, दया, माया, या सर्वांचा आपण त्याग केला पाहिजे. एखाद्याच्या डोळ्यांत पाणी पाहिलें, कीं, आपण गहिंवरून डोळ्यानें पाणी काढावयाचें, पण त्याला चांगलें तरवारीचें पाणी दाखवायची तयारी करायची! तोंडानें ठेवायची मधुर वाणी, पण हातानें करायची कसाबाची करणी!

**प्रेमानंद**—मी मघाशीं उगीच कांहींतरी बोललों. खरें ह्मटलें तर साधूचें हुबेहूब सोंग आणणें आपल्याइतकें आह्मांला साधायचें नाहीं.

**पुरंदर**—(डोळे मिचकावून) आमच्या विश्वानंदाला गुरुनिष्ठ शिष्याचें सोंग फार चांगलें साधतें!

**विश्वानंद**—अन् मठाधिपति गुरुजींचें सोंग कांहीं आपणाला कमी नाहीं साधत! सदानंद! परवांची गंमत तुह्मांला ठाऊक आहे का?

**सदानंद**—नाहीं बुवा, सांग पाहूं.

**विश्वानंद**—परवां एक बाई आपला नवरा आपणांशीं बोलत नाहीं, ह्मणून यांनां प्रश्न विचारायला आली होती. हे बसले होते त्यावेळीं शुकासारखे ध्यान लावून. तिनें जेव्हां यांचीं पुष्कळ आर्जवें केलीं तेव्हां हे चवताळून एकदम तिच्या अंगावर आले. कारण, बाई होती कुरूप! बरें, यांनीं तिला आशीर्वाद द्यायचा तो तरी धड! काय ह्मणे, तुझ्या अंगावरचा एखादा जिन्नस जाईल,

तेव्हां तुझा नवरा तुझ्याशीं बोलेल. मी होतोंच यांचा आशीर्वाद खरा करायला. गेलों त्या बाईच्या मागून आणि काढला तिच्या डोकींतला चंद्रकोर. 'माझा नवरा मला तडातड बोलला' असें सांगत ती बाई दुसऱ्या दिवशीं मठांत आली.

**सदानंद**—कांहो गुरुमहाराज, तुह्मांला खरेंच का कांहीं भविष्य कळतें?

**पुरंदर**—अरे कसलें भविष्य घेऊन बसलां अहां! देतों धोरण पाहून कांहीं तरी खुबीनें जोडून!

**प्रेमानंद**—मग लोकांनां तुमच्या सांगण्याचा गुण कसा पटतो?

**पुरंदर**—मीं प्रश्न सांगण्याची आणि त्यांचें काम होण्याची वेळ एक आली, कीं आला गुण! आणि त्यांचें काम नाहीं झालें, कीं, कांहीं तरी बाता मारून ठेवतों त्यांना हेलपाटे घालीत! कसलें भविष्य आणि कसलें काय?

**विश्वानंद**—कायहो गुरुजी, पुरुषांपेक्षां स्त्रियाच या कामांत अधिक फसतात नाहीं?

**पुरंदर**—उघडच आहे. त्या पुरुषांपेक्षां अज्ञानी असतात. त्यांनां आमचें कपट कळत नाहीं.

**प्रेमानंद**—पण आतां हा फसवाफसवीचा धंदा फार दिवस चालणार नाहीं.

**सदानंद**—कांरे बाबा? तुलाहि भविष्य कळूं लागलें वाटतें?

**प्रेमानंद**—तसें नव्हे हो. स्त्रियांनां शहाण्या करण्याचा विचार चालला आहे, असें कुणाकडूनसें मीं ऐकिलें आहे.

**पुरंदर**—नुसता विचारच चालला आहे ना? मग कांहीं हरकत नाहीं! कारण तो अमलांत येईपर्यंत शेंकडों वर्षें लागतील आणि तोंपर्यंत आमच्यासारखे हजारों लोक आपलीं पोटें भरतील. चला, मी आतां स्नानाला जातों. तुह्मी सांगितलेलें काम मात्र चांगलें बजावा. [ जातात. ]

---

## प्रवेश तिसरा.

[ **स्थलः**-राजवाड्यांतील एक दालन. तारानाथ प्रवेश करितो. ]

**तारानाथ**—नको तें राज्य आणि नको तें राजवैभव!

[ चाल—मधुमूरनरकविनाश० ]

**घे दुःखभारा शिरीं पौरजन हे सुखवावया जो झटे**
**॥ ध्रु० ॥ सारथी अति निपुण जरि या राज्यशकटा**

**आवरी। वाहि चिंता सतत हृदयीं सौख्य मुळिं न तदंतरीं॥ सुख नृपपदीं वाटे। परि न मुळिं; दुःख सकल दाटे॥ २॥**

हल्लींच्या राजवैभवापेक्षां माझी पूर्वीची स्थिति किती पटीनें तरी चांगली होती. निदान, त्या वेळीं मी मनानें तरी सुखी होतों. सध्या राज्यांत पडत असलेल्या अनेक दरोड्यांमुळें माझ्या प्रजाजनांच्या जीविताची मला स्वतःपेक्षां अधिक चिंता वाटते. आज कित्येक दिवस माझ्या राज्यांत सतत दरोडे पडत आहेत, त्यांत कित्येक लोक प्राणांलाहि मुकले; तरी चोरांचा शोध लागूं नये, हें खरोखर मला अत्यंत लांछनास्पद आहे. आतां तर माझ्या अधिकाऱ्यांविषयीं मला संशय वाटूं लागला आहे. तेच त्या चोरांनां सामील होऊन त्यांनींच हा दंगा चालविला नसेल कशावरून ? या दरोड्यांच्या बंदोबस्तांत चोर समजून निरपराधी प्राण्यांची हत्या मात्र माझ्या हातून न होवो ह्मणजे झालें. जोंपर्यंत हा राज्यभार वहावा लागणार, तोंपर्यंत ही चिंता आणि असला त्रास मागें असा-यचाच ! आतां तारिणीच्या महालांत जाऊन चिंतेचें कांहीं निरसन होतें का पाहूं या; पण या राज्यकारभाराच्या भानगडींत मी बरेच दिवस तिच्या महा-लांत गेलोंहि नाहीं, ह्मणून ती अतिशय खिन्न होऊन बसली असेल. मला या भानगडींमुळें जितकी उदासीनता आली आहे, त्याच्या शतपट माझी भेट न झाल्यामुळें माझ्या प्रियेला उदासीनता आली असेल. बाकी, कांहीं दिवस वियोग झाल्याशिवाय एकमेकांच्या सहवासाचें महत्त्व प्रत्ययास येत नाहीं, असें ह्मणतात, त्याचा प्रत्यय या वेळीं मला चांगला येत आहे.

[ चाल—अष्टमीचा चंद्र शोभे० ]

**प्रियजनांचा विरह जेवीं दुःख देई मानसा। वाढवितो तेविं हृदयीं दर्शनाची लालसा॥ अंधकारें व्यापूनीयां अखिल जगता ती निशा। प्रियकरी ते जनमनासीं उदय विधुचा कीं जसा॥ वस्तु जवळी सतत असतां अवगणीतो नर जसा। दूरि होतां प्राप्तिकरितां धांव घेई भ्रांतसा॥ १॥**

अरे वा ! बोलतां बोलतां मी तिच्या महालाजवळ आलोंच कीं ! आतां जाऊन,

[ चाल—रसिया बारेके० ]

**सखिच्या अरविंदवदना। बघुनी सुखवीन मी नयनां ॥ ध्रु०॥ स्पर्शसुखा अनुभवुनी जडता देहिं न उरविन। हृदया सुखविन करुनी अधरामृतपाना ॥१॥**

[ जातो.

## प्रवेश चवथा.

[ **स्थलः**-तारिणीचा महाल. तारिणी सचिंत बसली आहे. ]

**तारिणी**—आज बरेच दिवसांत तिकडचं दर्शन झालं नाहीं, म्हणून मनाला कशी हुरहुर लागून राहिली आहे. पूर्वी मला भेटल्याशिवाय एक दिवसहि जात नसे, पण अलीकडे पहावं तर माझं स्मरणहि होत नाहीं. इतकं मन पालटायला माझ्या हातून असं झालं तरी काय बाई? तिकडेच विचारीन म्हटलं, तर अलीकडे अगोदर गांठच पडत नाहीं अन् पडलीच कधीं, तर माझ्याशीं प्रेमानं बोलायलाहि होत नाहीं. पूर्वी तिकडचं मन किती आनंदांत असे, पण अलीकडे पहावं तों उदासीनता जशी कांहीं तिथं ठाणंच धरून बसली आहे. पण असं व्हायला कारण मी झालं आहें, कीं, निराळंच कांहीं आहे, हें कळल्याशिवाय माझं मन कांहीं शांत होणार नाहीं.

**चित्रांगदा**—( प्रवेश करून ) बाईसाहेब! सरकारस्वारी आली आहे.

**तारिणी**—( स्वगत ) अग बाई! आज काय हें नवलच! ( उघड ) बरं आहे, तूं जा आतां. ( ती जाते. ) आतां यायचं झालं म्हणजे भाषणच करणार नाहीं मुळीं स्वारीशीं. मग काय असेल तें आपोआपच कळेल.

**तारानाथ**—( प्रवेश करून स्वगत ) अहाहा! दर्शन होतांच मनाची उदासीनता क्षणांत पार नाहींशी झाली.

[ चाल-महतीं प्रयासिं युद्धकला० ]

**मनिं नुरवि दुःख देइ सौख्य वदन हें किती।**
**प्रियदर्शनेच सकल कष्ट विलय पावती ॥ ध्रु० ॥**
**हा देह न, मज गमत खचित विमल सर अती।**
**हें वदन न, विकसतचि त्यांत कमल मृदु किती।**
**या भृकुटि नसति, कमलीं अलिपंक्ति भासती।**
**हे लोचन नच, रुचिर सरीं मीन तळपती ॥ १ ॥**

(उघड) आज स्वारी बरीच रागावली आहेशी वाटतें. नेहमींपेक्षां माझ्या स्वागताची आज निराळीच तयारी दिसते आहे. माझ्या येण्याची उत्सुकतेनें वाट पहात असलेल्या मुखाऐवजीं मला हा केशकलाप दिसत आहे. पण कांहीं हरकत नाहीं. हा ढग बाजूला सरला, कीं, पूर्वीपेक्षां सतेज अशा चंद्राचें आपोआप दर्शन होईल. मला पहाण्याकरितां डोळे कसे उत्सुक झाले आहेत. पण त्यांनां धनिणीच्या हट्टामुळें माझ्याऐवजीं गालिच्याचीं फुलें पहावीं लागत आहेत. तीच गोष्ट या हातांची ! आपल्या प्रियजनाला कंठालिंगन देण्यासाठीं ते कसे सारखी चळवळ करीत आहेत. पण तूर्त पदर सांवरण्यापलीकडे कांहींच काम मिळत नसल्यामुळें, बिचारे हताश होऊन गालांवरच विश्रांति घेत आहेत. हा तुझा अमृतानें भरलेला अधर—पण नको, रागानें दंतारोपण झाल्यामुळें त्याला तूर्त अधिकच शिक्षा होत आहे. मी येतांक्षणींच तुझ्या मुखचंद्राचें दर्शन झालें नाहीं, ह्मणून मला प्रथम थोडेंसें वाईट वाटलें, पण मजवर असलेलें तुझें गाढ प्रेम व्यक्त करणाऱ्या तुझ्या या लीला पाहून मी आतां आनंदसागरांत पोहत आहें. (तिच्याजवळ जाऊन) मी काय ह्मणतों आहें, तें नीट कळलें ना ?

**तारिणी**—( रागानें बाजूला उभी रहाते. )

**तारानाथ**—काय हा रागाचा फण्कारा ? पण असो ! त्यांतल्या त्यांत डोळ्यांनीं आपलें कर्तव्य बजावलेंच. त्याच्याप्रमाणें या हातांनीं आणि ओंठांनींहि आपलें काम नीट कां बजावूं नये हें कळत नाहीं.

**तारिणी**—मला कीं नाहीं, असल्या भाषणांचा अगदीं कंटाळा आला आहे.

**तारानाथ**—आणि मलाहि विनवण्या करण्याचा त्रास आला आहे. ये पाहूं अशी जवळ आणि आनंदानें माझ्याशीं बोल; म्हणजे तुझा कंटाळा आणि माझा त्रास तेव्हांच निघून जातील.

**तारिणी**—मला हीं खोट्या प्रेमाचीं भाषणं ऐकायला नकोत.

**तारानाथ**—मलासुद्धां हा खोटया रागाचा फण्कारा पहायला नको.

**तारिणी**—मी कांहीं उगाच रागावलें नाहीं.

**तारानाथ**—तूं रागावली नसतीस तर मी तुझीं आर्जवें करीत बसलों नसतों. तुह्मी बायका मोठया वस्ताद खऱ्या. पुरुषांकडून कशा विनवण्या करून घ्याव्या हें तुम्हांसच ठाऊक !

**तारिणी**—बायकांनांच कांहीं नांवं ठेवायला नकोत हो. पुरुषहि कांहीं कमी नसतात. आतां माझ्या तडाक्यांत सांपडणं झालं आहे म्हणून. नाहीं तर थोडी का मला आपली पायधरणी करावी लागते ?

**राजा**--तुझीं आर्जवें करून मी थकलों म्हणजे तशी कल्पना मी करितों किंवा झोंप लागली म्हणजे कधीं कधीं स्वप्नांत मला तसा भास होतो इतकेंच! बाकी, प्रत्यक्ष पायधरणीचा प्रसंग येतो माझ्यावरच! पण त्याचें कांहीं मला वाईट वाटत नाहीं. कारण, त्याचा परिणाम आपल्या प्रियजनाचें कर्णमधुर भाषण ऐकणें हाच होतो. बरें, पण इतका राग येण्याला कारण तरी काय झालें? सांगितल्याशिवाय आम्हाला कसें कळणार? पुरे झाला तो राग. आतां येथें येऊन बैस कशी. तूं जवळ नसलीस म्हणजे मला कसें चुकल्याप्रमाणें वाटतें.

**तारिणी**—आहे ठाऊक! आपलं मजवर किती प्रेम आहे, तें मला कळतं आहे हो!

**तारानाथ**—

[ **चाल**—ना दिर दिर दिम तनन० ]

**खचित हा दास कोपा पात्र न, करु कसें सुदति!**
**संशयनिरसन ॥ ध्रु० ॥ मत्प्रेमाचा अनुभव असतां**
**कलुषित करिशी कां निर्मल मन ॥ १ ॥ विश्वासातें**
**अपात्र व्हाया घडलें काय कधीं मज कारण ॥ २ ॥**

**तारिणी**—मी विचारीन त्याचं सरळ उत्तर द्यायचं कबूल करायचं असेल तर सांगतें.

**तारानाथ**—आधीं तूं इथें येऊन बैस. मग सरळ उत्तराचें पाहूं.

**तारिणी**—आधीं कबूल केल्याशिवाय मी बसणार नाहीं.

**तारानाथ**—तूं बसल्याशिवाय मी कबूल करणार नाहीं. तुह्मां बायकांनां अशा हट्टी होऊं देतां उपयोगी नाहीं. जरा लगाम सैल सोडली, कीं, तुह्मी पुरुषांचे हक्कच घेऊन बसतां!

**तारिणी**--खरं ना हें? मग मी बोलत नाहीं, ह्मणून मघांपासून इतकी तळमळ कां चालली आहे ती?

**तारानाथ**--कोण तळमळतो आहे? हट्ट हट्ट ह्मणून तुमचा चालवयाचा तरी किती?

**तारिणी**—आतां असल्या निरर्थक भाषणांत वेळ घालवायचा, कीं, मी विचारीन त्याचं नीट उत्तर द्यायचं?

**तारानाथ**—तूं आधीं येथें येऊन बैस.

**तारिणी**—मला उत्तर मिळाल्याखेरीज नाहीं मी बसणार.

**तारानाथ**—असें काय ? ठीक आहे. माझ्या आज्ञेपेक्षां तुला स्वतःचा हट्टच अधिक वाटतो ना ? मग मी तरी आतां येथें बसतों आहें कशाला ? हा निघालों मी.

( जाऊं लागतो. )

**तारिणी**—( स्वगत ) अगबाई ! खरंच रागवायला झालं. ( उघड ) पण मी बरी जाऊं देईन. असं माझ्यावर रागवायला झालं आहे तरी काय ?

**तारानाथ**--किती दिवसांनीं मी मोठ्या उत्सुकतेनें तुला भेटायला आलों आणि तूं तिकडे तोंड फिरवून उभी राहतेस ! मग कां मला राग येणार नाहीं ?

**तारिणी**--बरं, पण आतां तरी बसायचं गडे !

**तारानाथ**—मला जितका तूं त्रास दिलास, तितका मी तुला देईन, तेंव्हां मग बसेन.

**तारिणी**—चूक झाली हो माझी ! मी क्षमा मागतें. आतां तरी झालं ना ? नाहीं तर मी पुन्हां रागावेन हो !

**तारानाथ**—असें शासन मिळणार हें कळल्यानंतर कोणता सेवक आज्ञा उल्लंघन करील ? ( बसून ) प्रिये, माझ्याविषयीं तुझ्या मनांत किती बरें अविश्वास हा ! तुझ्या आलिंगनाचें सौख्य मिळाल्याशिवाय मी येथून जाईन तरी कसा ? योगिजनांनां तपोवनांत जाऊन महत्प्रयासानें ब्रह्मानंद अनुभवितां येतो; पण मला तर तुझ्या मंदिरांतच त्याचा अनुभव वारंवार मिळतो. जगांत लोक तीर्थसेवनानें आपला आत्मा पवित्र करितात; पण तुझ्या अधरामृतसेवनानेंच माझा आत्मा पवित्र होतो ! लोक ईश्वराचें चिंतन करितात, पण मला तुझ्याशिवाय चिंतनीय विषय दुसरा दिसतच नाहीं !

**तारिणी**—भाषणांत मात्र प्रेम कसं ओतप्रोत पाहून घ्यावं !

**तारानाथ**—आणि कृतींत कोठें दुष्काळ पडला ?

**तारिणी**—तेंच आतां मी दाखवून देणार आहें. खरं खरं सांगायला होईल ना ?

**तारानाथ**—अगदीं खरें सांगतों.

**तारिणी**—आतांसा असा खिन्नपणा कां बरं धरायचा ? मी क्षणभर कधीं जवळ नसलें तर आपणांला तें सहन होत नसे अन् आतां मला दर्शन दिल्याशिवाय दिवसच्यादिवस जातात !

**तारानाथ**—तूं ह्मणतेस त्याप्रमाणें मी आतांसा फार उदास झालों आहें खरा.

**तारिणी**—पण त्याचं कारण काय, विचारतें मी ? अन् मी जवळ असतां-नाहि तो उदासपणा टिकावा का ?

**तारानाथ**—(स्वगत) राज्यांतील दंगेधोप्यांसंबंधानें हिला कशाला सांगा. विनाकारण माझ्या चिंतेची वांटेकरीण हिला करण्यापेक्षां कांहींतरी खोटेंच सांगावें या वेळीं.

**तारिणी**—कां ? कांहीं लोणकढी ठेवून द्यायचा चालला आहे वाटतं विचार ?

**तारानाथ**—लोणकढी कसली ? पण तुला कदाचित् वाईट वाटेल ह्मणून खरें सांगायला भीति वाटते.

**तारिणी**—या चरणांपासून मला दूर करण्याच्या गोष्टीशिवाय दुसरं कांहीं सांगितलं, तरी मला वाईट वाटणार नाहीं.

**तारानाथ**—ऐक तर–एक दिवस मी नेहमींप्रमाणें दरबारांत बसलों असतां एक तपस्वी तेथें आला. इतर बैराग्यांप्रमाणें तोहि असेल असें समजून माझे सेवक त्याला कांहीं दानधर्म करायला लागले. पण आपण निपुत्रिकाकडून धर्म स्वीकारीत नाहीं असें त्यानें त्यांनां निक्षून सांगितलें अन् तो तसाच तेथून निघून गेला. तेव्हां मला काय वाटलें असेल याची तूंच कल्पना कर. या दोषा-पासून मुक्त कसें होतां येईल या चिंतेंत मी अलीकडे रात्रंदिवस असतों.

**तारिणी**—(सुस्कारा सोडून) खरंच. आपल्या सुखांत उणीव काय ती तीच एक आहे. पण करायचं काय ? परमेश्वराची मर्जी. आपल्या हातचं का तें आहे ?

**तारानाथ**—मला आतां याला एकच उपाय दिसतो. पण त्याला तुझी अनु-मति पाहिजे. ती मिळेल कीं नाहीं, याची मला मोठी शंका आहे.

**तारिणी**—आपली चिंता दूर व्हायला माझ्या अनुमतीचीच जरूर आहे, हें कळल्यानंतरहि मी अनुमति देणार नाहीं, इतकी का मी निर्दय आहें ?

**तारानाथ**—आतां पर्यायानें कशाला ? स्पष्टच सांगून टाकतों एकदा. दुसरा विवाह करून या चिंतेंतून मोकळें व्हावें, असा माझा हेतु आहे.

**तारिणी**—( स्वगत ) काय ऐकिलं मीं हें ?

**तारानाथ**—स्तब्ध कां राहिलीस ? माझा विचार तुला पसंत नाहीं वाटतें ?

**तारिणी**—माझ्या पसंतीवर काय आहे ? आपणाला जर त्यापासून सुख होत असेल, तर मी आपल्या सुखाच्या आड कशी येऊं ?

**तारानाथ**—दुसरा विवाह सुखकारक होईल, अशी माझी कल्पना आहे. माझा विचार मीं सचिवांनां कळविला. त्यांचेंहि माझ्याचप्रमाणें मत पडून माझ्या पसंतीकरितां ठिकठिकाणच्या सुंदर स्त्रियांच्या तसबिरीहि त्यांनीं आणविल्या. खरेंच, तुला सांगतों, त्यांतील एक तरुणी इतकी सुंदर होती, कीं, तसबीर पहातांच मीं तेंच स्थल जमवायला सचिवांनां सांगितलें.

**तारिणी**—म्हणजे ? हें सर्व पूर्वी ठरून, मग का माझी संमति घ्यायला यायचं ?

**तारानाथ**—काय करूं ? मी अगोदर तुला विचारायला यायचें खरें, पण त्या नादांत मला तुझ्या महालांत यायचें स्मरणहि राहिलें नाहीं.

**तारिणी**—खरंच का हें सगळें ?

**तारानाथ**—तसाच कांहीं फायदा असल्याशिवाय खोटें बोलण्यांत काय अर्थ ?

**तारिणी**—मला दाखवायला होईल का ती तसबीर ?

**तारानाथ**—सचिवांनीं ती परत पाठविली आणि ती मजजवळ असती तरी तूं पाहून काय करणार होतीस ?

**तारिणी**—माझ्या प्रेमाची वांटेकरीण होण्याइतकी ती भाग्यवती स्त्री कशी आहे, तें तरी पाहिलं असतं.

**तारानाथ**—तसें कांहीं तुला वाईट वाटायला नको हो. दुसऱ्या स्त्रिया कितीहि अन्तःपुरांत आल्या, तरी तुझा पट्टराणीपणाचा मान कांहीं कमी होणार नाहीं.

**तारिणी**—आपलं प्रेम दुसऱ्या ठिकाणीं जडल्यावर पट्टराणीच्या मानाला घेऊन काय करायचं आहे ? पट्टराणी होऊन दुःखांत जन्म काढण्यापेक्षां आपल्या प्रियकरणीच्या महालांत तिच्या दासीची दासी होऊन मी आपल्या प्रेमकथा ऐकत बसेन.

**तारानाथ**—( स्वगत ) तरी झटलें अजून मत्सरानें कसा संचार केला नाहीं !

**चित्रांगदा**—( प्रवेश करून ) सरकार ! बाहेर अमात्य आले आहेत.

**तारानाथ**—होय का ? चल मी हा आलोंच. ( तारिणीस ) प्रिये ! येऊं ना ? या राज्याच्या भानगडी विश्रांतीच्या वेळीं सुद्धां त्रास द्यायला कशा तयार असतात !

[ जातो. चित्रांगदाहि जाते.

**तारिणी**—आतां सांगायचं झालं, तें सर्व खरं असेल का ? ( निःश्वास टाकून ) पुरुषांच्या चंचल मनाचा भरवंसा कोणीं द्यावा ! पुत्रप्राप्तीच्या सुखाकरितां माझ्या सुखावर पाणी ओतायला तयार व्हायचं, हेंच का तिकडचं माझ्यावर प्रेम ? देवा ! माझ्यांत दुसरं एखादं व्यंग ठेवूनहि मला पुत्रवती कां केली नाहींस ? असं होतं तर आजचा हा दारुण प्रसंग मजवर कां आला असता ? हें संकट टाळायला कांहींच का युक्ति नाहीं ? छेः, मला तर कांहींच सुचत नाहीं. त्या नवीन राहिलेल्या चित्रांगदेला कांहीं उपाय सुचतो का पहावा याला. ती फार चतुर आहे. चित्रांगदे, अग चित्रांगदे !

**चित्रांगदा**—( प्रवेश करून ) काय आज्ञा आहे ?

**तारिणी**—ये अशी, माझ्यजवळ बैस. मी तुला कांहीं विचारणार आहें.

**चित्रांगदा**—मी इथं बरी आहें सरकार ! आपल्याजवळ बसण्याची का माझी योग्यता आहे ? माणसानं शोभेल तेंच केलं पाहिजे.

**तारिणी**—फारच बाई चेंगट तूं. बस ह्मटलं बसावं. उगीच अशीं अन् तशीं शास्त्रें सांगत बसूं नये.

**चित्रांगदा**—( स्वगत ) मीं सर्व आडून ऐकलं हें यांनां कळावं कसं ? ( उघड ) आपल्या आज्ञेच्या बाहेर का मी आहें ? ही बसतें मी. सांगावं काय तें सरकार !

**तारिणी**—आतां उगीच लांबण लावीत नाहीं. एकदमच तुला विचारितें—तिकडचं प्रेम माझ्यावर सदोदित कायम राहील, असा कांहीं उपाय मला सांग गडे !

**चित्रांगदा**—पण अगोदर मी विचारतें, महाराजांच्या प्रेमाबद्दल आपणाला शंका कां आली ?

**तारिणी**—अग आतां नुसती शंका नाहीं. दुसरं लग्न करून माझ्या प्रेमाला कायमची वांटेकरीण आणायचा विचारसुद्धां तिकडे ठरला.

**चित्रांगदा**—काय बाई तरी ऐकतें मी हें ? आपण रूपगुणांनीं प्रत्यक्ष लक्ष्मी—मग महाराजांनां ही बुद्धि कशी सुचली ?

**तारिणी**—अग हें सारं ह्मणे पुत्रप्राप्तीकरितां हो !

**चित्रांगदा**—ह्मणजे ? संततीकरितां दुसरं लग्न करायला आपलं अगदींच का वय झालं ?

**तारिणी**—अग, हें वरवर सांगायचं निमित्त आहे. खरं ह्मणशील तर हा सारा चंचल मनाचा परिणाम आहे.

**चित्रांगदा**—माझी आपली अशी समजूत होती, कीं, महाराजांचं आपल्यावर फार प्रेम आहे. पण असल्या क्षुद्र कारणाकरतां डळमळणारं हें कसलं बाई प्रेम ?

**तारिणी**—प्रेम ह्मणजे या जगांत कांहींतरी अनिर्वचनीय महत्त्वाची गोष्ट आहे, असं आजपर्यंत मला वाटत होतं. पण आतां मधुर भाषण करून घटकाभर दुसऱ्याचं मन रंजवणं याचंच नांव प्रेम; असं अनुभवानं वाटतं.

**चित्रांगदा**—बाईसाहेब ! सर्वच ठिकाणीं हा नियम लागू केला तर आपल्याहि निर्मल प्रेमाला तोच दोष येईल, ह्मणून कांहीं व्यक्तींपुरतंच हें ह्मटलं पाहिजे.

**तारिणी**—बरं, जाऊं देत त्या गोष्टी. त्यांचा विचार करून मनाला दुःखच ना लावून घ्यायचं ? हं, सांग बरं चित्रांगदे ! मजवर येऊं पाहणारं हें भयंकर संकट टाळायला मी काय करूं ? कोणत्या देवाला भजूं ? कोणाला शरण जाऊं ?

**चित्रांगदा**—त्याचा सावकाशपणानं काय तो विचार ठरवितां येईल. असा उतावीळपणा करून कसं चालेल, सरकार ?

**तारिणी**—उतावीळ होऊं नको तर काय करूं ? निर्लज्जपणानं त्या सवतीची दासी होऊन का राहूं ? हा अपमान मी सहन तरी कसा करूं ?

**चित्रांगदा**—मी असं कसं ह्मणूं बाईसाहेब ? कोणत्याहि मानी स्त्रीला हा अपमान सहन होणार नाहीं.

**तारिणी**—चित्रांगदे ! खरंच सांगतें तुला, माझ्या धाकट्या गोजिरवाण्या युवराजाच्या लीलांनीं महाराजांनां अन् मला जर लवकरच भंडावून सोडलं नाहीं तर माझा जन्म व्यर्थ आहे असं समज ! चित्रांगदे ! पुत्राशिवाय आणि पतिप्रेमाशिवाय मी आतां जीवंत तरी कशी राहूं ?

**चित्रांगदा**—( स्वगत ) हं ! हा प्रसंग आपल्या कामाला बरा आहे. ( उघड ) याला मी एक युक्ति सुचवितें आपणाला. एखाद्या ज्योतिषाला विचारून आपल्या नशिबीं संतति आहे कीं नाहीं, हें आपण समजून घ्यावं अगोदर.

**तारिणी**—ते ज्योतिषी तरी मेले खरंच सांगतील असं कशावरून ? पैशाच्या आशेनं मेले कांहींतरी माझ्या मनाजोगंच बोलतील झालं !

**चित्रांगदा**—सरकार ! सगळेच ज्योतिषी कांहीं लोभी नसतात. हो, बरी आठवण झाली. आपल्या शहरांत कोणी एक साधु नवीनच आले आहेत, त्यांनां म्हणे ज्योतिष चांगलं समजतं.

**तारिणी**—असेल कदाचित् तसं; पण आपण त्यांच्याकडे गेलों अन् त्यांनीं 'तुमच्या कपाळीं अपत्यसुख नाहीं,' असं सांगितलं म्हणजे कायमचीच निराशा ना ? त्यापेक्षां असेच आशेनं दिवस काढलेले काय वाईट ?

**चित्रांगदा**—पण त्या साधुमहाराजांनां कांहीं नुसतं ज्योतिषच समजतं, असं नाहीं; ते मोठे योगीहि आहेत असं म्हणतात. ते बोलतात तें म्हणे खरं होतं. कदाचित् त्यांनीं आपणाला आशीर्वाद दिला, तर परमेश्वराच्या कृपेनं आपण पुत्रवती व्हालहि.

**तारिणी**—पण त्यांच्या अद्भुत शक्तीचा अनुभव कोणाला पटला आहे का ?

**चित्रांगदा**—हें काय विचारणं बाईसाहेब ? आज हजारों लोक त्यांच्या दर्शनाला धांवत आहेत ते का उगीच ? आपले मेव्हणे मंदार तर त्यांच्या अगदीं भजनीं लागले आहेत. म्हणून म्हणतें, एकदा जाऊन त्यांचं दर्शन घ्यावंच.

**तारिणी**—तिकडे जाण्यापेक्षां आपण त्यांनांच इकडे बोलवावं.

**चित्रांगदा**—सरकार ! ते कांहीं इतर ढोंगी पोटभरू साधूंपैकीं नाहींत दुसऱ्याच्या घरीं यायला. त्यांतूनहि ते इकडे यायला कबूल झाले, तरी महाराजांनां ही गोष्ट नाहीं का कळायची ? त्यांनांतर हें कळून उपयोगी नाहीं.

**तारिणी**—पण समज, आपण गेलों अन् तिथं आपणाला मंदार भेटले, तर नाहीं का तिकडे कळायचं ?

**चित्रांगदा**—त्याची तजवीज मजकडे लागली सरकार ! तिथं कोणी चिटपाखरूंहि नसेल अशाच वेळीं आपण जाऊं. त्यांच्या शिष्यांपैकीं एकजण माझ्या ओळखीचा आहे.

**तारिणी**—( विचार करून ) ठीक आहे; केव्हां जायचं तर तिकडे ?

**चित्रांगदा**—आधीं मी तिकडे जाऊन सर्व व्यवस्था नीट करून ठेवतें. मग आपण जाऊं. पण बाईसाहेब ! हें केवळ मी सांगतें म्हणूनच आपण करूं नये. आपली इच्छाच असली तर चलावं. हो, नाहीं तर चित्रांगदेनं सांगितलं म्हणून हें सर्व झालं, असं नको व्हायला.

**तारिणी**—अग, माझी इच्छा नसती, तर मींच प्रथम तुला विचारलं असतं कशाला ? बरं, जा तर आतां. नीट व्यवस्था करून ये लवकर. [ चित्रांगदा जाते.]

आतां त्या साधुमहाराजांचं दर्शन घेऊन एकदा नशिबाची परीक्षा पहावी अन् सोक्षमोक्ष काय तो करून घ्यावा. [ जाते. ]

---

## प्रवेश पांचवा.

[ **स्थल**–रस्ता. दामिनी प्रवेश करते. ]

**दामिनी—**

[ चाल–दिजिये दरसन्० ]

**या जगीं नसे कुणी मजअशी अभागिणी ॥ ध्रु० ॥**
**पतिलागीं अर्पिती। स्वप्राणा युवती किति। पतिमरणा**
**कारण कुणि झालि न दुजि कामिनी ॥ १ ॥ पातक**
**शिरिं घेतलें। स्त्रीनामा दूषियलें। जन्मा कां आलें मी**
**नकळे अशि पापिणी ॥ २ ॥**

या बैराग्याच्या वेषानं माझं खरं स्वरूप कसं पार बदलून गेलं आहे. हा पोषाक मिळवायला मला किती यातायात पडली ! त्या निबिड वनांतून मार्ग शोधीत शोधीत मी रामतीर्थाजवळ आलें. तिथं एका गरीब बाईला द्रव्य देऊन हा पोषाक आणविला. तेव्हां कुठं मोकळेपणानं फिरायला मला मोकळीक झाली. मी स्त्रीवेषानं फिरतें, तर इतक्या अवधींत माझ्यावर किती संकटं कोसळलीं असतीं कोण जाणे ! तरुण स्त्रीला सौंदर्याची अनुकूलता असेल, तर संकटपरंपरा तिच्यामागं लागलीच ह्मणून समजावी.

[ चाल–उठ गडे सत्वरी० ]

**रूप न बरवें गमे जरि तें भूषण दे स्त्रीजना ॥ ध्रु० ॥**
**लावण्य न हें, चुंबकमणि हा ॥ ओढुनी आणी संकट-**
**लोहा। दुःखसागरीं लोटी देहा। तोषवि जरि लोचनां**
**॥ १ ॥ जेविं विकल करि परहृदयासी। तेविं कठिणता**
**आणि तयासी। मुकवि युवतिंना सकल सुखासी।**
**भुलवी जरि नरमना ॥ २ ॥**

असो. येथपर्यंत कसंतरी निभावलं, पण पुढं काय ? या ठिकाणीं माझी कुठं ओळख नाहीं. इथली रीतभात मला ठाऊक नाहीं. अशा वेळीं मी वागावं कसं याचंच मला मोठं गूढ पडलं आहे.

[ चाल–प्रणति असो० ]

**व्यसन नवें पातलें। धैर्य न मुळीं राहिलें ॥ ध्रु० ॥ होइ कुणाशीं परिचय आतां। आश्रय देई कोण अनाथा। गति माझी नकळे ॥ १ ॥ मित्रापरि मी मानुं कुणासी। पात्र करूं कुणा विश्वासासी। खिन्न हृदय झालें ॥ २ ॥**

बरेच दिवस कंदमूलांवर काढावे लागल्यामुळं भुकेनं माझे प्राण कसे व्याकुल होऊन गेले आहेत. तशीच मला कधीं चालायचीहि संवय नाहीं. तो प्रसंग दुर्दैवानं मजवर आल्यामुळं पाय अगदीं थकून गेले आहेत. आतां जर लवकर कोणाचा मला आश्रय न मिळेल, तर इथंच मला राम झटलं पाहिजे. जवळ असलेले कांहीं अलंकार विकून अन्नसामुग्री आणीन झटलं, तर असे मौल्यवान् अलंकार या वेषात माझ्याजवळ असलेले कुणीं पाहिले तर मला ते चोर नाहीं का ठरविणार? बरं, कोणाच्या घरीं जाऊन आश्रयाची याचना करावी, तर तेंहि योग्य नाहीं. अशा या अडचणीमुळं मला खास वाटतं, कीं, माझ्या सर्व वासनांसह माझा आत्मा या देहाला लवकरच सोडून जाणार! देवा!

[ चाल–पाहुनी मुखचंद्र० ]

**मन कल्पना अशुभा करी, गति काय होइल नाकळे। हृदय चितावन्हिनें सगळें चितेपरि तें जळे॥ ध्रु० ॥ दुर्दशा जणुं राक्षसी वासुनी मुखकंदरा। ग्रासण्या बसली गमे। हो जीव पाहुनि घाबरा ॥ १ ॥**

पण मी अशी चिंता करीत काय राहिलें आहें? ज्यानें मला निर्जन वनांतून येथपर्यंत वाट दाखविली, तेथल्या भयंकर श्वापदांपासून माझं रक्षण केलं, तो मला आतां अंतर देईल का? त्या दीनदयाघनावर माझा पूर्ण विश्वास आहे. त्याच्या कृपेमुळं मला जें ज्ञान प्राप्त झालं आहे, त्याचा उपयोग मी संकटसमयीं कसा करितें, हें पहाण्याकरितांच त्यानं माझ्यामागं ही संकटपरंपरा लाविली नसेल कशावरून? धीर धरून आतां मला प्रियकराच्या शोधाला लागलं पाहिजे. ['सच्चिदानंद' असा शब्द पडद्यामागें होतो.] अगबाई! हें काय? कोण बरं हें भगवत्स्मरण करीत आहे? (पाहून) अहाहा! शिष्यमंडळीनं वेष्टिलेले हे साधुमहाराज देवदर्शनाला जात आहेत वाटतं! महाराजांची वृत्ति तर एखाद्या तपस्व्याप्रमाणं दिसते आहे. बाकी, खरं काय आहे तें परिचयाशिवाय कळणार नाहीं ह्मणा. पण सध्यां आश्रयाला हें स्थान ठीक दिसतं आहे.

पुणे मराठी ग्रंथालय
नारायण पेठ, पुणे २

जावंच तर आतां. महाराजांच्या भक्तमंडळींत जाऊन आपणहि त्यांचा एक भक्त बनावं.

[ **राममंदिर**–पुरंदर व त्याचे शिष्य देवाला नमस्कार करीत आहेत; दामिनी पुरंदराला नमस्कार करते.]

**विश्वानंद**—अरे ए वैरागड्या ! गुरुजी सोंवळे आहेत हें तुला दिसत नाहीं का ? चालला शिवायला. गुरुजींचे पाय म्हणजे धर्मशाळेची पायरीच कीं नाहीं वाटेल त्यानें शिवायला ! कांहीं सोंवळेंओंवळें आहे कीं नाहीं ?

**पुरंदर**—अरे, असें ज्याच्यात्याच्यावर तोंड टाकूं नये. मुला ! तुझें माझ्याशीं काय काम आहे ?

**दामिनी**—आपण कृपाळु होऊन देत असाल, तर या चरणांची मजकडून सेवा व्हावी इतकंच मागणं आहे.

**पुरंदर**—( स्वगत ) वः ! हा तरुण अन् फार सुंदर दिसतो. पण मुलगा हा ! ( उघड ) मुला, तुझें नांव काय ?

**दामिनी**—मला कमलाकर म्हणतात.

**पुरंदर**—तुझ्या रूपाप्रमाणें तुझें नांवहि गोड आहे. कमलाकर, तूं कुठला कोण ? इतक्या लहान वयांत हा वेष कां धारण केलास ?

**दामिनी**—मी लहान असतांच माझे आईबाप मला सोडून गेले. तेव्हांपासून माझ्या चुलत्यानं माझं संगोपन करून मला शिक्षण दिलं. माझ्या ज्ञानरवीचा उदय होणार, इतक्यांत सदोदित प्रेमवृष्टि करणाऱ्या माझ्या चुलत्याच्या जीविताचा अस्त झाला ! त्यावेळीं मला या जगाचा वीट आल्यामुळं सद्गुरूच्या शोधार्थ मी हा वेष घेऊन गांवोगांव भटकतों आहें. आजच या गांवांत आलों. येथें माझ्या कोणी ओळखीचं नाहीं, म्हणून आश्रयाच्या चिंतेंतच होतों. इतक्यांत सद्गुरुचरणांचं दर्शन झालं.

**पुरंदर**—(स्वगत) काय गुलाम लबाड आहे ! यानें इतक्यांत गुरुशिष्याचें नातेंहि जोडून दिलें. ( उघड ) तुला आश्रय द्यायला कांहीं हरकत नाहीं म्हणा. पण आधींच आमच्या मठांत शिष्यमंडळीचा बराच जमाव झाल्यामुळें माझ्या नित्यकर्माला व्यत्यय येत आहे. त्यांत आणखी अधिक शिष्यवृंद कशाला जोडूं ? शिवाय तुह्मां प्रापंचिक जनांच्या सहवासापेक्षां एकटें रहाणेंच आह्मांला आवडतें. जा कमलाकर, दुसऱ्या कोणाकडेहि तूं गेलास, तरी तुझ्यासारख्या सुकुमार सुंदर तरुणाला कोणीहि आश्रय देईल.

**दामिनी**—महाराज ! मला असे पराङ्मुख कां होतां ? आपल्यासारखे दयानिधि जर मला दीनाला आश्रय देणार नाहींत, तर कोणाला माझी करुणा यावी ? हे साधुश्रेष्ठा !

[ चाल—दिलदार दिलारा० ]

**हा चरणिं शरण तव पतित अवन करिं हे करुणा सन्ता ।**
**नतजनरक्षणिं तत्पर, अशि सत्कीर्ति सुनिर्मल दूषित**
**होइल जरि या त्यजिशिल, आश्रित करुनी हरिं मनिं-**
**ची चिंता ॥ ध्रु० ॥ जन्मतांच या त्यजिति तातमाता ।**
**आप्त कोणी न जगीं राहिला त्राता । तूंहि दूर करिशी**
**जरि या अनाथा । जाण अंतरति मत्प्राण मला आतां ॥**

**पुरंदर**—( स्वगत ) अरे, हा तर जास्तच चिकटूं लागला ! याला ठेवावा तर आपल्या धंद्याला व्यत्यय येईल आणि जाऊं द्यावा तर तितकें आपल्या वेषाला अन् पेषाला शोभत नाहीं.

**दामिनी**—महाराज ! असे स्तब्ध कां राहिलांत ? मला कांहीं आशेला जागा आहे ना ?

**पुरंदर**—( स्वगत ) द्यावा झालें आश्रय याला. फार गरीब दिसतो आणि येथें कोणी याच्या ओळखीदेखीचें नाहीं, हेंहि एक ठीक आहे. शिवाय माझ्या कारस्थानांला अशींहि कांहीं माणसें पाहिजेच आहेत. ( उघड ) कोणकोणत्या विद्यांत तूं पारंगत आहेस, सांग पाहूं कमलाकर ?

**दामिनी**—व्याकरण, छंदःशास्त्र, काव्यालंकार, नाट्य वगैरे शास्त्रांचं अध्ययन मीं केलं आहे. वेदांतविषयांतहि माझी थोडीबहुत गति आहे.

**पुरंदर**—( स्वगत ) हें एका अर्थीं ठीक झालें. आह्मी मोठे विद्वान् आहों, असें समजून आमच्याकडे मोठमोठे शास्त्रीपंडित शास्त्रांतील शंका विचारण्यास येत असतात. पण आमचें त्यासंबंधाचें ज्ञान बेताचें असल्यामुळें आह्मांला कांहीं त्यांनां समर्पक उत्तरें देतां येत नाहींत. अशा वेळीं कशी तरी वेळ मारून नेण्यापेक्षां याला पुढें करावा, ह्मणजे फजीती तरी टळेल. ( उघड ) ठीक आहे कमलाकर ! तुझ्या विनंतीप्रमाणें आह्मी देतों तुला आश्रय.

**दामिनी**—गुरुमहाराजांचे या दासावर किती उपकार झाले ह्मणून सांगूं ?

**पुरंदर**—विश्वानंद ! चला आपल्या या नवीन सोबत्याला घेऊन.

[ सर्व जातात. पडदा पडतो. ]

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

[ **स्थल**—मंदाराच्या वाड्यांतील बाग. इंदुमती एकटी बसली आहे.]

**इन्दुमती**—या रजनीकांतांनां पाहिलं ह्मणजे माझ्या मधुकरदादाचं मला स्मरण होतं. त्याच्या लग्नाच्या वेळीं त्याचं अन् बाबांचं भांडण होऊन तो जो कुठं नाहींसा झाला, त्याचं अजूनपर्यंत कुठं ठिकाणच नाहीं. बाबांच्या मृत्यूनंतर तरी तो घरीं येईल, अशी आह्मांला फार आशा होती, पण तीहि निष्फल झाली ! पण त्याच्याविषयींचा माझा ध्यास मात्र वाढला ! अलीकडे तर त्याचा मला इतका ध्यास लागून राहिला आहे, कीं, त्याच्यासारखा साधारण जरी कोणी पुरुष माझ्या दृष्टीस पडला, तरी तो माझा दादाच आहे असं वाटून त्याच्याकडे माझं मन वेधतं. रजनीकांतांचं बोलणंचालणं, तोंडवळा हीं सारीं हुबेहुब माझ्या दादासारखीं आहेत. ह्मणून ते मला फारच प्रिय वाटूं लागले आहेत. देवा ! माझ्या माहेरच्या माणसांपैकीं कोणी तरी माझ्याजवळ असावं, अशी माझी इच्छा होती, ह्मणून का तूं माझं समाधान करण्याकरतां त्यांनां त्या संकटांत घालून आह्मांकडे पाठविलंस ? किंवा आपल्या दीनदयाघन या नांवाप्रमाणं करणी करून माझ्या दुःखाचा मला विसर पडावा ह्मणून तूं हा माझा दादाच मला मिळवून दिलास ?

[ चाल–मन हें होइ बावरें० ]

**नयनीं मोह कां पडे । मन कां वळत त्याकडे ॥ ध्रु० ॥**
**अंतरलें बहुदिन सुख तें प्राप्त मला होतें । सत्य मानुनी मृगजल हें व्यर्थचि कीं फसतें ॥ १ ॥ भ्रम झाला मतिसी का या, दृष्टि भुले का ही । सत्य नसुनि हें सुखकर कीं स्वप्नचि मी पाहीं ॥२॥ कीं दीनेच्या श्रीहरि तो विनतीसी वळला । प्रियबंधूतें ह्मणुनि तयें मम गृहिं धाडियला ॥ २ ॥**

आतां खरं काय तें त्यांच्यापासून ओघाओघानंच काढलं पाहिजे. अगबाई ! आलेच हे ! रजनीकांत, तुह्मी असे घाबरलेले कां बरं दिसतां ?

**रजनीकांत**—( प्रवेश करून ) बाईसाहेब ! तुमची पूर्वपुण्याई सबळ ह्मणून आज दादासाहेबांचे प्राण वांचले.

**इन्दुमती**—( घाबरून ) ह्मणजे ?

**रजनीकांत**—दादासाहेबांची गाडी वेशीजवळ जातांच एकाएकीं कांहीं दरोडेखोरांनीं त्यांच्यावर हल्ला केला. दैववशात् मी जर ऐनवेळीं त्या बाजूला गेलों नसतों, तर आज आपणावर फार भयंकर प्रसंग ओढवला असता.

**इन्दुमती**—पण अगोदर मला सांगा, तिकडे कांहीं इजा तर झाली नाहीं ना ?

**रजनीकांत**—दादासाहेब सुखरूप आहेत; पण आपल्या माळ्याची स्त्री मात्र दरोडेखोरांनीं पळवून त्यांनीं त्याच्या मुलाला ठार मारिलें.

**इन्दुमती**—अगबाई ! आतां ते मेले त्या बिचारीची काय दशा करतील कोणाला ठाऊक ? अलीकडे चोरांचा सुळसुळाट फारच झाल्यामुळं केव्हां कोणावर कसा प्रसंग येईल त्याचा नेम नाहींसा झाला आहे. पण रजनीकांत ! तुह्मीं तिथं अकस्मात् कसे गेलां ?

**रजनीकांत**—मला जनांच्या सहवासापासून दूर रहावेंसें वाटतें, हें तुह्मांला ठाऊक आहेच. आज संधि सांपडतांच मी गांवाबाहेर जाण्याकरितां फिरतफिरत वेशीजवळ गेलों, तों तुमचें नांव घेऊन कांहीं चमत्कारिक दिसणारीं माणसें ओरडतांना मीं ऐकलीं, ह्मणून काय प्रकरण आहे, तें पहाण्याकरितां मी पुढें जातों, तों कांहीं माणसें माळणीला नेत आहेत आणि कांहीं दादासाहेबांवर हल्ला करीत आहेत, असें माझ्या दृष्टीस पडलें. दादासाहेबांनां सोडवून नंतर त्या बाईला मी सोडविणार, इतक्यांत ते तिला घेऊन पार नाहींसे झाले. बरें झालें, तुह्मी दादासाहेबांबरोबर गेलां नाहीं; नाहीं तर आज केवढा घोर अनर्थ झाला असता ?

**इन्दुमती**—तारिणीची प्रकृति एकाएकीं बिघडली अन् सरकारस्वारीहि इथं नाहीं, असा निरोप तिच्याकडून एकाएकीं आल्यावरून मला बरोबर जाण्याचा बेत रहित करावा लागला. माझ्यावरचं संकट त्या बाईवरच गेलं ह्मणायचं. पण कांहीं झालं तरी वाईटच झालं !

**रजनीकांत**—या चोरांच्या बंडाईत बायकामाणसें घेऊन परगांवीं जाणेंच आधीं रास्त नाहीं.

**इन्दुमती**—आमच्या जहागिरीच्या गांवीं हा माळी असतो. बरेच दिवस झाले, ह्मणून मी त्या सर्वांनां इकडे बोलाविलं होतं; आतां इकडचं जाणं त्याच

गांवीं होणार, अन् त्यांनांहि बरेच दिवस इथं येऊन झाले, ह्मणून तीं सगळीं माणसं इकडच्याबरोबरच गेलीं. पण पुढं हें संकटाचं ताट वाढून ठेवलेलं त्यांनां काय माहीत ?

**रजनीकांत**—होणाऱ्या गोष्टी कधीं टळत नाहींत !

**इन्दुमती**—बरं, पण आतां स्वारी कुठं गेली आहे ?

**रजनीकांत**—दरोड्याची वर्दी देण्याकरितां दादासाहेब वाड्याकडे गेले आणि मी इकडे आलों.

**इन्दुमती**—रजनीकांत, हे तुमचे उपकार मी कसे फेडूं ?

[ चाल–घरिघरि देखा० ]

**आभारि मी असें। अपुली अती। शिरिं हा उपकार-**
**भार वाहतसें ॥ ध्रु० ॥ व्यसनिं वपुसि घालुनी प्राण-**
**दान पतिसि दिलें। उपमा उपकृतिसि या न कांहिं दिसे ॥**

**रजनीकांत**—बाईसाहेब, यांत मी काय मोठेंसें केलें ?

[ चाल–या तव बघुनि मधुर० ]

**ही मम उपकृति केविं असे। व्यसनीं रक्षियला हा देह**
**जयें, तत्कार्या तो झटलासे ॥ ध्रु० ॥ जल सजवितसे**
**स्वातिजलधरां जन्म मौक्तिका द्याया, सिंधुसि तेची**
**सहाय्य करिती, तेवीं मम कृति भासे ॥ १ ॥**

आपणा उभयतांचे माझ्यावर इतके उपकार झाले आहेत, कीं, त्यापुढें माझ्या या कृतीला 'उपकार' असें नांव देणें, ह्मणजे मला लाजविण्यासारखें आहे.

**इन्दुमती**—रजनीकांत, आमचे तरी तुमच्यावर उपकार कसले झाले आहेत ? मनुष्याच्या भूतदयेला उचित तेंच आह्मीं केलं. त्या प्रसंगीं कोणीहि असंच करता. त्यांतूनहि तुह्माला ते उपकारसे वाटत असतील, तर त्यांची फेड करणंहि तुमच्या स्वाधीनच आहे.

**रजनीकान्त**—आपल्या अमित उपकारांची फेड करण्याची इच्छा माझ्या मनांत प्रबल असतांहि ती पूर्ण होणें कधींहि शक्य नाहीं, याचा मला फार विषाद वाटतो. बाईसाहेब !

[ चाल–झन् झन् पायल० ]

**सफल नच होई आस हृदयिंची। शतजन्म जरी अपु-**
**ल्या कार्या ही काया वाहीं ॥ ध्रु० ॥ व्यसनामधुनी**

**मज वांचविलें। आजवरी मम रक्षण केलें। त्यांतुनि**
**कैसा होइन उतराई ॥ १ ॥**

**इन्दुमती**—( हंसून ) अं: ! आमचे उपकार फेडण्याची युक्ति अगदीं सोपी आहे. रजनीकांत ! तुह्माला आनंदांत पाहिलं ह्मणजे आमच्या उपकारांची सारी फेड झाली असं आह्मांला वाटेल.

**रजनीकान्त**—यांतहि तुमचें मजवरचें अपार प्रेमच व्यक्त होत आहे. पण मला दुर्भाग्याला तुमची ही इच्छाहि पूर्ण करितां येऊं नये, अशीच ईश्वरी इच्छा दिसते. बाईसाहेब, माझी हृदयमंजुषा दुःखाच्या भारानें इतकी दडपून गेली आहे, कीं, तेथें सुखाचें वारेंहि प्रवेश करूं शकणार नाहीं ! माझ्यावर आलेल्या प्रसंगाला जरी बरेच दिवस झाले आहेत, तरी नित्यस्मरणानें तो प्रसंग आतांच एका क्षणापूर्वी ओढवल्याचा भास मला होत असतो. या दुःखविषानें दूषित झालेल्या वातावरणांत मी अजूनपर्यंत जिवंत तरी कसा राहिलों, याचेंच मला आश्चर्य वाटतें.

[ चाल–रे मे सखि जानी० ]

**नसे सुख कांहीं । प्रियजनविरहित शून्य दिसे ही ज-**
**गति । अजुनि सोडुनी तनुसी प्राणही नच जाई ॥ ध्रु० ॥**
**प्रेमा नच अन्य विषयिं । घडि घडि मन विकल होइ ।**
**प्रियकांता स्मरुनि हृदयिं । सतत तिला अश्रुहार वाहीं ॥१॥**

**इन्दुमती**—तुमची प्रकृति पूर्ण बरी होईपर्यंत तुमचा वृत्तांत विचारून तुह्मांला दुःख देऊं नये, अशी तिकडची मला आज्ञा होती, ह्मणून आजपर्यंत माझी इच्छा मला पूर्ण करतां आली नाहीं. पण तुमची प्रकृति आतां ठीक झाली आहे; आतां आपला वृत्तांत विचारायला मला कांहीं हरकत दिसत नाहीं.

**रजनीकान्त**—इंदुमतीबाई ! कृपा करून मला माझा वृत्तांत विचारूं नका.

**इन्दुमती**—( स्वगत ) यांच्या या उत्तरानं तर माझी शंका दृढ होत आहे. ( उघड ) रजनीकांत ! निदान तुह्मांला जगांत मायेचीं माणसं कोण अन् किती आहेत, तें तरी मला सांगाल ?

**रजनीकान्त**—आमचें जहाज फुटून माझी प्रिया मला ज्या दिवशीं अंतरली, त्याच दिवशीं खऱ्या रजनीकांताच्या अवताराची समाप्ति झाली ! अर्थात् त्या वेळचीं जरी कोणी मायेचीं माणसें मला असलीं, तरी त्यांची स्मृति मला आतां

नाहीं. तुमच्या समोर असलेला हा रजनीकांत, तो रजनीकांत नसून आयुष्यांतील कष्टमय दिवस कसे तरी लोटीत असलेला एक चालताबोलता पुतळा आहे. इंदुमतीबाई! त्या भयंकर वादळाच्या भीतीनें प्रियेनें जें मला आलिंगन दिलें, तेंच अखेरचें असें जर मला त्या वेळीं कळतें, तर त्या भुजरूपी बंधनांतून न सुटतां मी तसाच प्रियेच्या पाशांत बद्ध राहिलों असतों. पण हाय! माझ्या दुर्दैवामुळें ऐनवेळीं जीवितरक्षणाचा मार्ग पाहण्याची मला बुद्धी झाली!

**इन्दुमती**—अजुनहि तुमचा वृत्तान्त सांगायला तुह्मांला कष्ट होत असतील, तर तो मी या प्रसंगीं विचारीत नाहीं. पण रजनीकान्त! असं नेहमीं दुःख करून काय फायदा? परमेश्वरानं तुह्मांला त्या संकटांतून वांचविलं, त्यांत त्याचा कांहींतरी चांगलाच हेतु असला पाहिजे, असं नाहीं का तुह्मांला वाटत?

**रजनीकान्त**--असा शुष्क वेदान्त माझ्यासारख्या चिरदुःखी मनुष्याला पटत नाहीं!

**इन्दुमती**—असं कां बरं ह्मणतां रजनीकान्त?

[ चाल–पुंडरीक लोचना० ]

**होतसां निराश कां। खिन्न करितसां मन कां॥ ध्रु०॥**
**क्रूर बनुनि अपणा जरि लोटियलें शोकसरीं। ईश सदय**
**बसविल परि पुनरपि तो सुखशिखरीं॥ १॥**

**रजनीकान्त**—आतां सुख हा शब्द मला जगांतून नाहींसा झाला आहे. माझ्या प्रियेची मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर उभी राहून ती 'अजून तुह्मीं या मृत्युलोकींच सुख भोगीत अहां ना?' असें मला क्षणोक्षणीं विचारीत असते! दामिनि! प्रिये दामिनि! तुझ्या प्रेमाचें सार्थक माझ्या हातून झालें नाहीं, ह्मणून का लाडके! तूं मला टाकून गेलीस?

**इन्दुमती**—रजनीकांत! कदाचित् तुमचा हा शोक व्यर्थहि असेल, असं मला वाटतं. तुह्मी जसे त्या संकटांतून वांचलां, तशी तुमची पत्नीहि वांचली असेल, अशी आशा करायला तुह्मांला आधार नाहीं असं नाहीं.

**रजनीकान्त**--एकाद्या बुडत असलेल्या माणसाला जसा काडीचा आधार आशेचा वाटतो, परंतु शेवटीं तो खरोखर निष्फल ठरतो, तसांच तुह्मी मला ज्याची आशा दाखवीत अहां, तो आधारहि निष्फल आहे. क्षणभर तुह्मी ह्मणतां तसेंच कबूल करून मजप्रमाणें तिलाहि कोणीं वांचविलें असेल, अशी मनाची समजूत

करून घेतली, तरी पुढील सर्व संकटपरंपरेंतून पार पडून माझी प्रिया पुनः माझ्या दृष्टीस पडेल, ही आशा मी कशी धरूं ?

[ चाल--शून्यचि भासे० ]

प्रियमुखदर्शन आस गमे ही निष्फल सांप्रत मातें।
आस नसे जरि अल्पहि हृदयीं शांत कसें मन होतें॥
दुर्धर संकटनग ते मार्गी आड असोनि तियेला।
होइल कैशी गोचर कान्ता पुनरपि या दृष्टीला॥ १॥

**इन्दुमती**—पण मी ह्मणतें, तुह्मी आतां असं दुःख तरी किती दिवस करीत रहाणार ? या सुंदर चित्रविचित्र वस्तूंनीं भरलेल्या सृष्टींतून एखादी सुंदर व प्रिय अशी वस्तु नाहींशी झाली, ह्मणून मनुष्यानं चिरकाल उदासीनता धरून कसं चालेल ? इतर वस्तु तरी परमेश्वरानं आपल्याच उपभोगाकरितां उत्पन्न केल्या आहेत ना ? आपण एकाच वस्तूविषयीं विशेष आदर दाखवून ती नाहींशी झाल्यानंतरसुद्धां बाकीच्यांचा अव्हेर केला, तर ज्याप्रमाणं त्या वस्तूचा, त्याप्रमाणंच पर्यायानं परमेश्वराचाहि आपण अपमान केल्यासारखा नाहीं का होत ?

**रजनीकान्त**--एखाद्याला जीवनाधार असणारी वस्तूच नाहींशी झाल्यावर तो मनुष्य जीवंत असूनहि मेल्यासारखाच नाहीं का ? त्याची ही जीवन्मृतावस्था त्याच्या उदासीनतेच्या रूपानें प्रकट होते. ज्याला सर्व विश्वच शून्य आणि उदासीन दिसतें, त्याच्यापुढें त्यांतील अनंत मनोहर वस्तु जरी आणून ठेवल्या, तरी त्यापासून त्याला तिळमात्रहि सुख वाटणें शक्य नाहीं. किंबहुना अन्य वस्तु कितीहि रमणीय असल्या, तरी त्या त्याच्या उपभोगाकरितां नाहींत, हें त्याची व त्याच्या जीवनाधार वस्तूची ताटातूट करण्यांतच परमेश्वर सुचवीत असतो.

**इन्दुमती**—मी तुमच्यापुढं काय बोलणार रजनीकान्त ? पण इतकं मात्र खरं, कीं, संसारांत जर मनुष्याला रहायचं आहे, तर परमेश्वर ठेवील त्या स्थितींतच त्यानं सुख मानून घेतलं पाहिजे, रजनीकान्त ! तुह्मी आनंदांत असलां तर आह्मांला बरं नाहीं का वाटणार ? स्वतःच्या सुखाकरितां नव्हे, पण आमच्या संतोषाकरितां तरी तुह्मी दुसरा विवाह करून सुखानं रहा, अशी तुह्मांला आह्मा उभयतांची विनंति आहे.

**रजनीकान्त**—क्षमा करा बाईसाहेब! प्रियेशीं कृतघ्नपणा करायला तुह्मी मला सांगूं नका.

**इन्दुमती**—यांत कसला त्यांच्याशीं कृतघ्नपणा झाला? पत्नी धडधडीत जीवंत असतां पुरुष कसकसे अनाचार करितात ते तुह्मी पहातांना?

[ चाल–विषय भवंतें विषचि ते० ]

**कितिक वनिता नरकरीं निष्कारण मुकती जीविता। नीतिरता त्या असतां, किति नर जगिं करिती दुःखिता ॥ १ ॥ कुटिल गमती त्या तयां, प्राणहि जरि चरणीं वाहती। छल करिती अमित किती जणुं किंकरिशा त्यां वाटती ॥ २ ॥**

अशापैकीं तर तुह्मी कांहीं करीत नाहींना? फक्त तुह्मी विवाह करणार अन् तोहि दुसऱ्यांच्या आग्रहानं; त्यांतूनहि तुमची पत्नी जीवंत असती तर एक गोष्ट निराळी होती.

**रजनीकान्त**—माझी प्रिया या जगांत जीवंत नसली ह्मणून काय झालें? ती जरी सांप्रत स्वर्गांत आहे, तरी तिचें सर्व लक्ष्य या पृथ्वीवर भ्रमण करणाऱ्या तिच्या अभागी पतीकडे लागून राहिलें असेल. मी जर असलें निंद्य आचरण केलें, तर अशा नीच पतीला आपलें सर्वस्व वाहिल्याबद्दल माझी प्रिया स्वर्गांतहि अश्रु ढाळीत नाहीं का रहाणार? तिनें पश्चात्तापानें ढाळलेले अश्रु मला येथें कधींहि सुख भोगूं देणार नाहींत!

**इन्दुमती**—तुमचं पत्नीवरचं हें निःसीम प्रेम पाहून मला अत्यंत आनंद होतो; आणि अशा प्रेमाचा अनादर करण्याचा उपदेश आह्मी तुह्माला करतों, याचं वाईटहि वाटतं. खरोखर, तुह्मी हें एक जगाला उत्कृष्ट उदाहरण दाखवीत अहां; पण तुमच्यावरचं आमचं प्रेमच पुनःपुनः आह्मांला तोच उपदेश करायला लावतं आहे. आपल्या गत पत्नीप्रमाणं नाहीं, पण तिच्याहून रूपगुणांनीं थोडी कमी, अशी दुसरी पत्नि तुह्मांला नाहीं का मिळणार रजनीकान्त?

**रजनीकान्त**—बाईसाहेब, मी कांहीं तिच्या गुणांवर किंवा सौंदर्यावर लुब्ध होऊन तिच्यावर प्रेम करीत नव्हतों. माझ्या प्रियेवर माझें असें निश्चल प्रेम कां जडलें होतें, हें मला सांगतां यावयाचें नाहीं. पण इतकें मात्र खरें आहे, कीं, माझें मन आकर्षण करील अशी एकहि स्त्री आतां या जगांत असणें शक्य नाहीं.

**इन्दुमती**—ह्मणजे ? तुह्मांला असं कां वाटतं रजनीकांत ? तुमच्या मनांतून आमचं ऐकायचंच नाहीं, ह्मणून तुह्मी असं ह्मणतां अहां!

**रजनीकान्त**—इंदुमतीबाई! कृपा करून असा आपला भलताच समज करून घेऊं नका, अशी आपणाला माझी विनंति आहे. द्वितीय विवाह कधींहि करायचा नाहीं, असा माझा निश्चय होऊन चुकला आहे.

**इन्दुमती**—अं:! या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ज्या मनाला असा निश्चय करितां आला, त्याला तो मोडतांहि येणार नाहीं का ?

**रजनीकान्त**–बाईसाहेब! माझ्या जागीं माझी दामिनी असती, तर तिनें काय केलें असतें ?

**इन्दुमती**—पतिनिष्ठ स्त्रीच्या कर्तव्याला उचित अशाच रीतीनं त्या वागल्या असत्या.

**रजनीकान्त**—होय ना? मग बाईसाहेब! स्त्रियांनीं मात्र आपलें कर्तव्यपालन करावें आणि आह्मीं पुरुषांनीं त्यांच्या विमल प्रेमाची खुशाल पायमल्ली करून कर्तव्यपराङ्मुख व्हावें हा कोणता न्याय? जगांतील कांहीं कर्तव्यशून्य कामांध पुरुष तसें करीत असतील तर खुशाल करोत, पण मी तर अत:पर—

[ चाल–किस्कदल्ल मेजोकरू० ]

**घालवीन काल हा सदा प्रियाचिंतनीं ॥ ध्रु० ॥ जळतां हा देह विरहिं धन्यताचि मानीं। अन्य जना ठाव अतां राहिला न मन्मनीं ॥ १ ॥ मुकलों मी सकल सुखा उत्साह न राही। जाइ मजसि भूवरी प्रिया जयीं सोडुनी ॥ २ ॥**

**इन्दुमती**—( स्वगत ) अहाहा! रजनीकान्तांचे हे शब्द ऐकायला दामिनीबाई जर जीवंत असत्या, तर त्यांनां किती आनंद झाला असता! पतीच्या प्रेमाच्या एका शब्दांत काय जादू भरून राहिली आहे, याची माझ्याइतकी बहुतकरून कोणाहि स्त्रीला पूर्ण कल्पना नसेल. आतां हा विषयच बदलावा हें बरं, ह्मणजे यांचं दु:ख अधिक भडकणार नाहीं. ( उघड ) या उद्यानांत पाहिलात का काय चमत्कार चालला आहे तो ? हा पहा वाऱ्यानें या तलावाचा शांतपणा नाहींसा करण्याचा कसा सारखा प्रयत्न चालविला आहे! पण इतकाहि त्रास सोसून पुन्हां तो शांतताच धारण करीत आहे; तसंच तिकडे पहा—तो चक्रवाकपक्षी

आपल्या रमणीचा वियोग झाला म्हणून रडत असतांहि सकाळीं पुनरपि तिची भेट होईल, असा विवेक करून आपलं दुःख विसरला आहे. दुःखांतहि सुख मानून कसं रहावं, हें असल्याहि क्षुल्लक वस्तूंपासून शिकतां येतें.

**रजनीकान्त**—या वस्तूंविषयीं जर माझ्या मनांत आदरबुद्धि असती, तर तुमच्याप्रमाणें मीहि त्यांनां या बावतींत गुरु केलें असतें. पण खरें म्हणाल तर मला त्यांचा अतिशय तिरस्कारा येतो.

[ चाल–वंगरि मोरि मुरक० ]

**विकल करित उपवन हृदया। स्मरण दे रमणीमनाचें**
**जल हें स्मरत मुख वघुनी फुलां या ॥ ध्रु० ॥ चक्रवाक**
**निजकांता पाहिल अस्ता जातां विधु आस न तशि**
**मुळि या ॥ १ ॥**

**इन्दुमती**--बरं, पण अजून तिकडचं येणं कसं होत नाहीं?

**रजनीकान्त**—आतां येतील.दादासाहेब. चला, आपण वाड्यांत जाऊन त्यांची वाट पहात वसूं. [ जातात.

---

## प्रवेश दुसरा.

[ **स्थल**–रस्ता. पुरंदर प्रवेश करितो. ]

**पुरंदर**—या मंदाराचें दैव मोठें बलवत्तर दिसतें खरें! नाहींतर माझ्या त्या भयंकर डावांतून तो कसचा सुटणार होता? मला तो व्यूह रचायला किती दिवस लागले, पण त्या दुष्ट रजनीकांतानें एका क्षणांत माझा बेत हाणून पाडला. त्याची बायको इंदुमती त्याच्याबरोबर जाणार असल्याची मला अगदीं पक्की बातमी लागली होती. पण तिच्या सुदैवानें आणि आमच्या दुर्दैवानें तिच्याऐवजीं दुसरीच स्त्री आयत्या वेळीं मंदाराबरोबर आमच्या तडाक्यांत सांपडली. बरें! आमच्या या दीर्घ शहाण्यांनीं तरी मंदाराबरोबर दुसरी स्त्री आहे असें कळून येतांच तिला तेथेंच सोडून पळून जावें कीं नाहीं? तर बेटे तिचा आणि तिच्या मुलाचा खून करून बसले! या हल्ल्यांत आम्हांला द्रव्यप्राप्ति जरी बरीच झाली, तरी आमचा मुख्य हेतु कांहीं साधला नाहीं तो नाहींच आणि हे खून उघडकीला येतात कीं काय, ही धास्ती मात्र मागें लागून राहिली आहे. बेत केल्याप्रमाणें मंदार या जगांतून कायमचा नाहींसा झाला असता, म्हणजे त्याच्या कनकाचा व कांतेचा मालक

४३७ दा. नं. ३३०८

मी झालों असतों. पण त्या रजनीकांतानें माझा घात केला. बरें आहे! एक वेळ बेत फसला ह्मणून काय झालें? त्या दुधखुळ्या मंदारावर पुनः माझा डाव टाकल्याखेरीज मी रहातों काय? यांत एवढें मात्र झालें, कीं, आजपर्यंत मला जो एकच शत्रु होता, तो आतां हा रजनीकांत आणखी दुसरा झाला. आतां या दोघांनांहि नाहींसें करण्याला काय बरें युक्ति करावी? हां—प्रथम रजनीकांताला मंदारापासून दूर केलें पाहिजे. पण हें साधणार कसें? (थांबून) हो, ठीक जुळलें! रजनीकांताचा व इंदुमतीचा गुप्त संबंध आहे, असें मंदाराच्या मनांत द्यावें भरवून आणि त्यानेंच हा हल्ला केला, असे त्याचे कान फुंकावे; या कामांत ते दागिनेहि आपल्या फार उपयोगी पडणार आहेत. ठीक आहे. रजनीकांत! पहातों आतां तुझ्या अंगांत काय कर्तबगारी आहे ती! तूं आपल्या प्राणदात्याचे प्राण वांचवितांना या सर्पाच्या फणेवर पाय दिला आहेस, पण त्याचा दावा धरून हा सर्प तुझे प्राण घेईल, हें कसें तुझ्या लक्ष्यांत आलें नाहीं? पण चित्रांगदा अजून कशी आली नाहीं? तिचा द्रव्यलोभ माझ्या चांगलाच पथ्यावर पडला आहे. ही आलीच ती—चित्रांगदे! ये. कशी काय आपली कामगिरी बजावलीस सांग पाहूं?

**चित्रांगदा**—(प्रवेश करून) मी एखाद्या कामांत हात घातला अन् त्यांत मला अपयश आलं, असं कधींतरी झालं आहे का?

**पुरंदर**—अग, तूं तशी हुषार आहेस, ह्मणून तर या जोखमीच्या कामगिऱ्या मी तुझ्यावर बेलाशक सोंपवितों. सांग पाहूं एकंदर हकीकत कशी काय झाली ती.

**चित्रांगदा**—धीर असला तर सांगतें सारं—आपला कार्यभाग होण्याजोगं थोडंसं आज घडून आलं आहे.

**पुरंदर**—काय तें?

**चित्रांगदा**—त्या दिवशीं सरकारांनीं सहज पुत्रप्राप्तीकरितां आपण दुसरं लग्न करणार असं ह्मटलं. राणीसाहेब काय भोळ्याच! त्यांनां महाराजांची ती थट्टा खरी वाटली. झालं, त्याचा फायदा घेऊन मीं माझा फांस टाकायला सुरवात केली अन् त्यांत यशहि पण चांगलं येत चाललं आहे. त्या आजच माझ्याबरोबर आपल्या मठांत येणार आहेत हो!

**पुरंदर**—हो का? तर मग चांगलीच हुषारी दाखविलीस तूं! पण राजाला यांतली कांहीं बातमी नाहीं ना?

१२७ न. नारायण पेठ, पुणे

**चित्रांगदा**—छे:, त्यांनां कांहीं त्यांतलं ठाऊक नाहीं, अन् त्यांच्या नकळत त्या येणार आहेत इकडे.

**पुरंदर**—हें एक बरें झालें. पण त्या इंदुमतीविषयींच्या कामाची कोठपर्यंत मजल आली आहे ?

**चित्रांगदा**--आधीं या कामाचं बक्षिस कुठं आहे तें आणा; मग दुसऱ्या कामाची वार्ता !

**पुरंदर**—अग, बक्षिसाचें मोठेंसें काय घेऊन बसली आहेस ? माझीं कामें साध्य झालीं, कीं, तुला बक्षिसच बक्षिस !

**चित्रांगदा**—हो ! असं आश्वासन मात्र तुम्हांला नेहमीं चांगलं देतां येतं. आजपर्यंत मीं तुमचीं इतकीं कामं केलीं, त्यांचं काय बक्षिस मला तुम्हीं दिलंत ? नाहीं म्हणायला मला तुम्हीं थापा मात्र खूब दिल्यात बाई ! पण आतां मात्र मी फसणार नाहीं हो ! बजावून ठेवतें. आधीं या कामाबद्दलचा मोत्यांचा कंठा घेईन, तेव्हां मग दुसऱ्या कामगिरीला लागेन.

**पुरंदर**—हात्तिच्या ! कंठाच ना ? माझीं हीं दोन्हीं कामें नीट बजावलींस, कीं, जडावाच्या दागिन्यांनीं तुला मढवून काढीन मढवून ! आहेस कुठें तूं ? ते दागिने घालून तूं सजलीस, कीं, पहाणारांनां असा भास व्हावा, कीं, ही दुसरी तारिणी राणीच !

**चित्रांगदा**—हो, खरंच का सांगतां हें सगळं ? कीं माझी तुम्हीं ही नुसती थट्टा चालविली आहे ?

**पुरंदर**--काय थट्टा आणि ती तुझी ? शांतं पापं, शांतं पापं ! अग, हें पातक माझ्या हातून होईल तरी कसें ? चित्रांगदे ! तूं शहाणी अन् समजूतदार आहेस, अशी माझी पक्की खात्री आहे; म्हणून मी तुला एक प्रश्न विचारितों, त्याचा नीट विचार करून जबाब दे. हां ! समज, मी तुझ्या म्हणण्याप्रमाणें आतां तुला पुष्कळसे दागिने दिले, पण आमच्या या लफंगेबुवांनीं तुझ्या डोळ्यांत धूळ टाकून ते लुंगावले, म्हणजे मग आटोपलाच कीं नाहीं तुझा सारा कारभार ! मी जरी या लफंग्यांनां माझे सोबती म्हणतों, तरी ज्यांनां नेहमीं लांड्यालबाडया, चोऱ्या, दरोडे घालण्याची संवय, ते तुला अन् मला तरी कसचे सोडणार आहेत ? मी त्यांचा गुरु बनून जरी सध्यां त्यांनां दुसऱ्यांनां लुबाडायला शिकवीत आहें, तरी ही वस्ताद मंडळी एखादे वेळीं गुरूची विद्या गुरूलाच फळवायला कमी

करायची नाहीं! माझें द्रव्य मी किती काळजीनें रक्षण करीत असतों तें पहातेस ना तूं?

**चित्रांगदा**—हो, खरंच बाई! हें कांहीं माझ्या कधीं लक्ष्यांत आलं नाहीं.

**पुरंदर**—नाहींच यायचं तुझ्या लक्ष्यांत हें! अग, बोलून चालून तुह्मी अडाणी बायका! तुह्माला हे पेंचपाच कसे कळावेत? हीं सर्व धोरणें आह्मींच ठेवावीं. हं, सांग पाहूं, इंदुमतीच्या घरीं गेली होतीस का तूं?

**चित्रांगदा**—मी सारी पांच सात वेळ तिच्या घरीं गेलें आहें. पण राणी-साहेबांच्या तोंडून ती फार सद्वर्तनी बायको आहे, असं मीं ऐकलं आहे. तिच्या नोकर माणसांजवळहि मीं बारिक चौकशी केली. पण सारींजणं तिच्या सद्गुणाची वाखाणणी करीत असतात.

**पुरंदर**—बरोबरच आहे. तारिणी पडली तिची सख्खी बहिण. तेव्हां आपल्या बहिणीच्या दुर्गुणांवर पांघरूण घालणें हें तिचें कर्तव्यच आहे. अन् नोकर माणसें तीं काय? जरा द्रव्याचा प्रयोग झालेला असला, कीं, लागले बेटे यजमानणीचे गोडवे गायला. खरोखर, मृदंगाचें आणि या नोकरांचें बरेंच साम्य असतें. त्याला पिठाचा लांच दिला, कीं, त्याच्यांतून कसे गोड बोल निघ-तात! तीच स्थिति या नोकर माणसांची! मी तुला एक खुबी सांगून ठेवितों चित्रांगदे! ज्या स्त्रीच्या सद्गुणांची जगांत फार तारीफ, तेथें खात्रीनें कांहींतरी पाणी मुरतें आहे, असें पक्कें समजावें. दुर्गुणी स्त्रिया स्वतःचीं पापकृत्यें लपवा-यला बाहेर मोठें पातिव्रत्याचें अन् सद्गुणांचें ढोंग दाखवीत असतात. अग वेडे, तो मंदार ह्मणजे कसला खाष्ट खवीस! अशा नवऱ्याच्या संगतींत तिला काय सुख मिळत असेल?

**चित्रांगदा**—हें मात्र खरंग बाई! तिला पतीपासून यत्किंचित्‌हि सुख नाहीं, असं राणीसाहेब ह्मणत होत्या.

**पुरंदर**—झालें तर. आधींच तो मंदार पराकाष्टेचा कुरूप, त्यांत मोठा तिरसट आणि पक्का संशयी! कधीं ह्मणजे स्वारी आनंदांत आहे असें नाहींच. असल्या अरसिक, कटकटी माणसाच्या सहवासांत आनंद मानून रहायला ती इंदुमती ह्मणजे अगदीं मूर्खच असेल? अग, अशा नवयौवना लावण्यमंजरी जर कुरूपाला सुरूप, अन् दुर्गुणाला सद्गुण मानून पातिव्रत्यानें राहूं लागल्या, तर मदनाला या जगांतून आपलें चंबूगवाळें आटपून पोबाराच केला पाहिजे! खरें विचारशील, तर मला त्या रजनीकांताबद्दल वाईट संशय येतो चित्रांगदे!

**चित्रांगदा**—हो, असं दिसतं खरं. इंदुमतीचा त्याच्यावर फार लोभ आहे हें खास. मलासुद्धां त्यांच्याविषयीं थोडी शंकाच आहे. मी जेव्हां जेव्हां तिच्या घरीं गेलें तेव्हां ती आपली त्या रजनीकान्ताबद्दलच बोलत असे! एक दोन वेळां तर तीं दोघें अगदीं एकांतांत बसलेलीं मला आढळलीं.

**पुरंदर**—झालें तर! त्याबद्दल आणखी खात्री ती काय असायची आहे? तरुणीतरुणांचा एकांत ह्मणजे भावी अनिष्ट गोष्टीचा भक्कम पाया! अग, असें सुखाचें भांडारच जर इंदुमतीच्या हातीं घरच्याघरीं लागलें, तर बाहेर आपल्या पातिव्रत्याचा टेंभा खुशाल मिरवायला तिला काय हरकत आहे? हेंच कीं नाहीं तिचें सद्वर्तन अन् पातिव्रत्य?

**चित्रांगदा**—तो रजनीकांत अनाथ आहे ह्मणूनहि कदाचित् इंदुमती त्याच्यावर लोभ करीत असेल. असं नसेल कशावरून? सगळींच माणसं कांहीं पापाच्या डबक्यांतले किडे नाहींत!

**पुरंदर**—पण तुझा माझा हा वाद कां? मी सांगतों तें तुला खोटें वाटत असेल, तर तूं तिच्याशीं युक्तीनें सख्य कर, ह्मणजे ती आपणच आपलें हृद्गत तुला सांगेल. बायकांच्या मनासारखें बोलणारा लवकरच त्यांचा मित्र होतो. आतां आधीं तूं तारिणीला इकडे घेऊन ये. त्या इंदुमतीलाहि कोणत्या युक्तीनें आपल्या मठांत आणायची, तें मी तुला आतांच सांगून ठेवतों. त्याप्रमाणें युक्ति कर, कीं काम फत्ते! [ जातात.

---

## प्रवेश तिसरा.

[ **स्थल**—पुरंदराच्या मठांतील एक खोली. दामिनी सचिंत उभी आहे. ]

**दामिनी**—गुरुमहाराज यायला वेळ कसा लागला बरं? मिळाला असेल कोणीतरी भक्त वाटेंत! गुरुजींनां भक्तांचा काय तोटा? मी इथं आल्यापासूनच हळुहळू मला या सर्व मंडळीविषयीं संशय येऊं लागलाच होता. पण काल सर्वांचं भाषण मीं आडून ऐकलं, तेव्हां तर माझी पक्कीच खात्री झाली. मला तर आतां या बिलंदर मंडळीची मोठी भीति वाटूं लागली आहे. न जाणो, ही उद्योगी मंडळी एखाद्या किचाटांत सांपडली तर माझीहि यांजबरोबर धिंडका निघायची! ही गोसावी मंडळी गांवोंगांव फिरणार—यांच्या सहवासांत राहिलं तर मला माझ्या प्राणनाथांचा शोध लागेल, अशा मोठ्या आशेनं मी

यांच्या मेळ्यांत राहिलें; पण इथं पहातें तो कांहीं निराळाच प्रकार! ही मंडळी तर आणखी बरेच दिवस इथं रहाणार असं दिसते. इथं माझ्या प्रियकरांचा शोध लागला तर ठीकच आहे, नाहीं तर मात्र या पापी चांडाळांच्या सहवासांत व्यर्थ दिवस गेल्यासारखं होणार आहे. हे बिलंदर इथं राहून तरी काय करणार आहेत? तर इथल्या स्त्रियांच्या पातिव्रत्यावर हल्ला अन् नागरिक जनांच्या धनाची लूट! इतका स्त्रीपुरुषांचा मेळा या मठांत जमतो, पण एकालाहि यांच्या कृष्णकारस्थानांचा सुगावा लागूं नये, हें मोठें आश्चर्य आहे, यांत शंका नाहीं. काय चमत्कार आहे! बिचाऱ्या भोळ्या अज्ञानी स्त्रिया आपल्या घरांतून पैसा आणून या गोसावड्यासमोर खुशाल ओततात अन् त्याच्या धुमींतली राख मोठ्या भक्तिभावानं घरीं घेऊन जातात! ही अपवित्र रक्षा या पवित्र विभूतीची विभूत ह्मणून किती स्त्रीपुरुषांच्या अन् बालकांच्या पोटांत जात असेल, कोण जाणे! काय हा भयंकर अंधार!

[ पुरंदर व त्याची शिष्यमंडळी प्रवेश करते. ]

**पुरंदर**—कमलाकर! अरे, स्वस्थसा बसला आहेस? आमच्या मठाचा तुला कंटाळा तर नाहींना आला?

**दामिनी**—गुरुमहाराज! कंटाळा येणार कसा?

[ चाल—हे गोविंद राखो शरम० ]

**सज्जनसहवासें ये वीट का मनासी॥ ध्रु०॥ ज्ञानसिंधु**
**भरुनि इथें उद्धरी जगासी। वसविते सदा निजगृह**
**शांति या स्थलासी॥ १॥ वसति येथ सतत चरण**
**पूज्य जे जनासी। त्यजुनि कोण जाइ अशा सत्समा-**
**गमासी॥ २॥**

**पुरंदर**—(स्वगत) हा मला हें सारें मुद्दाम टोंचून तर नसेलना बोलत? अन् बोलेना कां? आहे दोन दिवस नवा, तोंपर्यंत करील अशा वल्गना! पुढें जाते कुठें स्वारी? (बसून उघड) हें पहा कमलाकर! परमेश्वरप्राप्तीचे अनेक मार्ग आहेत, त्यांपैकीं आह्मी हा एक स्वीकारिला आहे. चांगल्यापेक्षां वाईट मार्गानेंच परमेश्वर लवकर भेटतो, ही एक परमेशसाधनाची तुला गुरुकिल्ली सांगून ठेवतों. बरें, तूं आमच्या पंथाची दीक्षा केव्हां घेणार?

**दामिनी**—मी वाटेल तेव्हां तयार आहें, गुरुमहाराज!

**पुरंदर**—ठीक आहे. आमच्या दीक्षेला धूप, गंडे वगैरेंची कांहीं भानगड नाहीं. फक्त चेल्याला उपदेश द्यायचा ह्मणजे झालें. ज्या तत्त्वांवर माझ्या पंथाची मीं उभारणी केली आहे, तीं तुला थोडक्यांत सांगतों. इतर योगिजनांनां षड्रिपु जिंकावे लागतात, पण आह्मी फक्त मोहाला जिंकून बाकीच्यांनां मोकळे ठेवितों. कारण, सर्वच शत्रूंनां जर आह्मीं जिंकून हतवीर्य करून टाकले, तर ते सर्व एक होऊन फारच प्रबल नाहीं का व्हायचे ? इतर योगी यच्चयावत् प्राण्यांविषयीं आपल्या मनांत सदोदित भूतदया जागृत ठेवितात; पण आह्मी सर्वांनां मारून त्यांनांच भूतें करून ठेवितों. कारण, संसृतीच्या पाशांत आपणाला जखडवायला हीं जगांतलीं माणसेंच कारण होत असतात. तूर्त इतकीं तत्त्वें पुरे झालीं ! या तत्त्वांच्या धोरणानें चाललास, कीं, तुझा मार्ग तुला आपोआप नीट कळूं लागेल.

**सदानंद**—गुरुजी ! याला हा उपदेश करून व्हायचें आहे काय ? अहो, ही भागुबाई आहे शुद्ध ! पुरुषाप्रमाणें दिसतो मात्र हा; बाकी एखाद्या स्त्रीप्रमाणें अगदीं भित्री आहे स्वारी ! याच्या एकंदर भित्रेपणावरून याला स्त्री ह्मटलें तरी चालण्यासारखें आहे.

**पुरंदर**—अरे, असें हें प्रथम व्हायचेंच ! तूं नव्हतास का भित्रा अगोदर ? पण आतां लोकांनां ठार करण्यांत, किंवा त्यांचे हाल करण्यांत माझ्यावरहि ताण करतोस कीं नाहीं ?

**दामिनी**—( स्वगत ) आतां कुठं माझ्या जिवांत जीव आला ! या सदानंदानं मी पुरुषाप्रमाणं दिसतों मात्र असं म्हणतांच, माझं कपट याला कळलं असावं कीं काय, असं वाटून माझी भयानं गाळणच उडाली !

[ मंदार प्रवेश करून पुरंदराला नमस्कार करितो.]

**पुरंदर**—या मंदार ! इतक्या अगदीं घाईघाईनें कोणीकडे निघालां ?

**मंदार**—या चरणांखेरीज मी जाऊं तरी कोठें ? आपण माझे हितचिंतक, माझ्या सर्व सुखाची काळजी आपणाला, म्हणून आपल्याकडे धांव घेतों.

**पुरंदर**—मंदार ! अहो, हें सर्व तो जगन्नियंता आम्हांकडून करवितो झालें. आमच्या हातांत काय आहे ? आम्ही केवळ पामर आहों.

**मंदार**—ही विनयशीलता आपल्या शुद्ध साधुत्वाचीच निदर्शक आहे.

**पुरंदर**—( हंसून ) कसले साधु अन् कसले काय ? आहोंत झालें कांहीं तरी ! परमेश्वराच्या मनांतून जगाचा उद्धार करायचा असला म्हणजे तो

कोणाला तरी निमित्तमात्र करीत असतो. बरें, तें असो म्हणा—पण तुमचें काम काय आहे तें कळूं द्या आधीं.

**मंदार**––सांगतों तर—मी आज आपल्या जहागिरीच्या गांवीं जात असतां येथून जवळच वाटेंत चोरांनीं आमच्या गाडीवर हल्ला केला. माझ्या माळ्याच्या स्त्रीला त्यांनीं पळवून नेली, अन् तिच्या मुलाला तर त्यांनीं ठारच मारलें. आमचा रजनीकांत जर ऐनवेळीं तेथें आला नसता, तर त्यांनीं मलाहि खात्रीनें ठार केलें असतें.

**पुरंदर**–शिवशिव ! हें जग किती दुष्ट अन् क्रूर आहे ! बरें, पुढें काय झालें ? पण—हा रजनीकांत—हो, त्याचें काय म्हटलेंत ?

**मंदार**––रजनीकांत तेथें येतांच ते भुरटे पळून गेले. मग मी तसाच परतलों अन् वाड्यांत जाऊन सरकारांनां याबद्दल वर्दी दिली अन् हे चोर कोण असावेत, हें विचारायला आपल्या चरणांपाशीं आलों आहें.

**पुरंदर**––तुम्हांला आतांसे ग्रह बरेच अनिष्ट आहेतसें वाटतें. आणा पाहूं तुमचा हात. ( पाहून ) तरीच, आतां जुळलें.

**मंदार**––काय जुळलें ?

**पुरंदर**––माझ्यापुढें ते जातात कुठें ?

**मंदार**––म्हणजे ? चोर कोण ते सांपडले का ?

**पुरंदर**––चोर नव्हेत हो—हा प्रसंग घडवून आणणारे ते ग्रह सांपडले. पळतात कुठें ते माझ्यापुढें ?

**मंदार**––ते ग्रह कोणकोणते तें मला सांगा ! म्हणजे त्याची शांति तरी करण्याची तजवीज करूं.

**पुरंदर**—तुमच्या अष्टमस्थानीं रवि, गुरु, मंगळ आणि चंद्र आहेत. त्यामुळेंच हा सारा प्रकार झाला, यांत संशय नाहीं.

**मंदार**––अस्सें, त्यांचें फळ तर कळलेंच. पण मजवर हल्ला करणाऱ्या त्या व्यक्ती कोण असाव्यात, हें कळेल का मला ?

**पुरंदर**––हो, न कळायला काय झालें ? त्यांत काय मोठें कठिण ? (थांबून) त्या व्यक्ती दोन असाव्यात.

**मंदार**––छे, ते चोर तर पुष्कळ होते.

**पुरंदर**––चोर असतील पुष्कळ; पण त्या हल्लयाच्या मुळाशीं दोन व्यक्ती आहेत.

**मंदार**--असें का ? मग त्यांचें थोडेंसें वर्णन समजेल तर बरें होईल.

**पुरंदर**--मंगळाची आरक्तता कुंकुमाची आणि चन्द्र मृदुलत्वाची खूण दाखवितो, म्हणून त्यांतील एक स्त्री असावी.

**मंदार**--काय स्त्री ? अन् ती माझ्यावर हल्ला करवायला कारण ? मोठें आश्चर्य आहे बुवा ! बरें, पण दुसरी व्यक्ति कोण असावी ?

**पुरंदर**--दुसरी व्यक्ति एक सुंदर आणि गंभीर दिसणारा असा पुरुष आहे. हे चारहि ग्रह ज्या अर्थी एकाच स्थानीं आहेत, त्या अर्थी त्या दोनहि व्यक्ती एकाच जागीं वास करीत आहेत हें खास. आपल्या जन्मस्थलावर त्यांची पूर्ण नजर आहे; अर्थात् त्या तुमच्या सन्निधच रहाणाऱ्या असाव्यात !

**मंदार**—(स्वगत) स्त्री आणि पुरुष–तीं एका जागीं वास करणारीं–आणि माझ्या सन्निध राहणारीं ! म्हणजे ? इंदुमती आणि रजनीकांत तर नव्हे ? काय ? हो ! त्यांच्याखेरीज सतत माझ्या सन्निध रहाणाऱ्या व्यक्ती दुसऱ्या कोण असणार ? नाहींतरी इंदुमतीविषयीं कांहीं खात्री सांगतां येतच नाहीं. कारण, बोलून चालून ती बायको ! या स्त्रिया कधीं कोणाचा घात करीतील याचा नेम नाहीं. पण माझा रजनीकांत ! हाय ! माझ्या घाताला तो कधीं तरी उद्युक्त होईल काय ? छे ! ही शंकाच नको—

[ चाल–जसोदाके नंदलाल० ]

**सुखवी किती मनासि। तत्पर ममाज्ञेसि । दैवतचि मी त्यासि ॥ ध्रु० ॥ प्रिय जें मजसि होय। करि तेंचि जो कार्य। नीतिरत करि काय। ऐशा कुकर्मासि ॥ १ ॥**

**पुरंदर**—( स्वगत ) संशयानें स्वारीवर आपलें जाळें तर चांगलेंच पसरलें. याच वेळीं याच्या संशयाग्नींत आपण चांगलेंच तेल ओतलें पाहिजे. ( उघड ) काय हो मंदार ! तुमच्यावर वाटेंत नेमका अमूकच ठिकाणीं चोरांकडून हा हल्ला होणार, ही बातमी रजनीकांताला अगोदरच होती वाटतें ?

**मंदार**—छे, असें असण्याचा कांहीं संभव नाहीं बुवा ! पण आपण हें कां बरें विचारतां ?

**पुरंदर**—तसें कांहीं विशेष नाहीं. अगदीं ऐनवेळीं तो नेमका तिथेंच कसा आला, याचें जरा मला आश्चर्य वाटलें इतकेंच ! बरें, ते चोर पुष्कळ होते, असें मघांशीं तुम्ही म्हणालांत नव्हे ?

**मंदार**—होय. ते पुष्कळ होते. कां बरें ?

**पुरंदर**—कांहीं विशेष नाहीं. पण एकट्या रजनीकांताला पाहून पळून जाणारे ते चोर पुरुष होते कीं स्त्रिया होत्या, हो मंदार ?

**मंदार**—अर्थात् पुरुष होते. मी डोळे मिटून का बसलों होतों त्यावेळीं ?

**पुरंदर**—( स्वगत ) तर दुसरें काय करणार आहेस? ( उघड ) ते पुरुष जर होते तर एकट्या रजनीकांताला पाहून ते इतके चोर भिऊन पळाले हो कसे? अशी काय मंत्रशक्ति त्याच्या अंगांत आहे ?

**मंदार**—ह्मणजे ? या हल्ल्याची बातमी रजनीकांताला अगोदरच असावी, असा आपला समज दिसतो.

**पुरंदर**—नाहीं, तसेंच केवळ नाहीं; तरी पण तो त्या ठिकाणीं अकस्मात् कसा आला असावा, या शंकेचें या समजानें समाधान होतें. नाहींतर, त्याला पाहून ते अगदीं ठरल्यासारखे कसे पळून गेले हो ? मंदार ! तुह्मी अगदीं सरळ मनाचे—ह्मणून तुह्मांला त्याचा संशय न येणें रास्त आहे. पण तुमच्या जागीं दुसरा एकादा कोणी संशयी मनुष्य असता, तर रजनीकांतानेंच हा हल्ला करविला आणि ते चोर त्याचे साथीदार होते ह्मणून ते पळून गेले, असेंच त्याचें मत झालें असतें. आतां हा हल्ला रजनीकांतानेंच करविला असेल, असें ह्मणण्याचा माझा उद्देश नाहीं. एखाद्या संशयी मनुष्याला या बाबतींत कसा संशय आला असता, तें मीं सांगितलें इतकेंच !

**मंदार**—( स्वगत ) यांच्या बोलण्यावरून यांनां रजनीकांताचा चांगलाच संशय आला असावा, असें दिसतें. पण माझा रजनीकांत असें निंद्य विश्वासघाताचें कृत्य करील का ? काय सांगावें बुवा ? मनुष्याची बुद्धि कोणत्या वेळीं कशी फिरेल याचा काय नेम! छे, माझें मस्तक फिरूं लागलें. माझें कार्य झालेंच आहे–आतां जावेंच येथून. ( उघड ) महाराज ! मी येतों आतां–

**पुरंदर**—कांहो, माझ्या सांगण्याचा तुह्माला रागबीग आला कीं काय ?

**मंदार**—छेछे ! आपल्या बोलण्याचा अन् मला राग येईल ? आजच्या या त्रासानें माझें मस्तक फार दुखूं लागलें आहे. आतां घरीं जायची मला परवानगी असावी.

**पुरंदर**—हें पहा, मीं तुह्माला हें कांहीं तरी सांगितलें आहे, असें समजा. आमच्यासारख्यांनीं सांगितलेली माहिती नेहमीं खरीच असते, असें नाहीं. माझ्या सांगण्यावर तुह्मी फाजील विश्वास ठेवून भलतेंच कांहींतरी करून बसूं नका; समजलांत मंदार ?

**मंदार**—माझी चांगली खात्री झाल्याशिवाय कोणावरहि दोषारोप करायला मी मूर्ख का आहें ?

**पुरंदर**—( स्वगत ) अरे वेडया ! मूर्ख असल्याशिवाय का तूं माझ्या चांगला जाळ्यांत सांपडला आहेस ? ( उघड ) बरें या तर.

[ मंदार जातो.

**पुरंदर**—पाहिलेंस कमलाकर ! आह्मीं आपला डाव साधायला कशा युक्त्या योजतों त्या !

**दामिनी**—गुरुजी ! विचारतों त्याची क्षमा असावी–मंदारांनां विनाकारण छळून आपला फायदा काय ?

**पुरंदर**—फायदा काय तो तुला आपोआपच कळेल पुढें. (पाहून) ही पहा, माझी दुसरी शिकार येते आहे. हीं सावजेंहि मी कशीं माझ्या जाळ्यांत पक्कीं अडकवून टाकतों तीं पहा. हे केवळ तुला मी पहिले धडे देतों आहें.

[ तारिणी व चित्रांगदा येतात. ]

**तारिणी**—( नमस्कार करून कांहीं वेळानें ) चित्रांगदे ! स्वामीमहाराजांनीं मला आशीर्वादसुद्धां दिला नाहीं.

**सदानंद**—त्यांची समाधि आतांच उतरली आहे. महाराजांचा या वेळीं नित्यपाठ चालला आहे.

**पुरंदर**—(स्वगत) अहाहा ! काय हें स्वर्गीय सौंदर्य ! या सुंदरीच्या लावण्यानें मला अगदीं मोह पाडल्यासारखा झाला ! त्यामुळें मी हिला आशीर्वादहि द्यायला विसरलों. या सदानंदानें वेळ निभावून नेली, ह्मणून बरें झालें. हिला मी पाहिल्याला बरेच दिवस झाले, पण त्या काळांत या मोहिनीचें सौंदर्य पूर्वीच्या शतपटीनें वाढलें आहे. तारानाथाचा सूड उगविण्याकरितांच मी हिच्या प्राप्तीची आजपर्यंत इच्छा करीत होतों. पण आतां तर या दिव्य सौंदर्याच्या उपभोगासाठींच आपलें सारें कारस्थान चालवावें, असें मला वाटूं लागलें आहे.

**तारिणी**—तर मग आह्मी भलत्याच वेळीं आलों ह्मणायच्या. महाराजांच्या नित्य कर्माच्या वेळीं आल्यानं त्यांनां आह्मांकडून बराच उपसर्ग मात्र पोंचला.

**सदानंद**—त्रास आणि उपसर्ग महाराजांच्या स्वप्नांतहि नाहींत ! तुमच्या प्रमाणें हजारों माणसें महाराजांच्या दर्शनाला येऊन रोज यांच्या नित्यकर्मांत असेच व्यत्यय आणतात. पण महाराज कधींहि कोणावर अल्पसुद्धां न रागावतां त्यांचें वांछित पूर्ण करितात.

**चित्रांगदा**—सत्पुरुषांशिवाय हें कुणाला साध्य आहे ?

**तारिणी**—( स्वगत ) चित्रांगदेच्या सांगण्यावर विश्वास ठेऊन मी इथं आलें ह्मणून बरं झालं. अहाहा ! काय ही गंभीर मूर्ति ! महाराज केवळ शांतीचे अन् दयेचे सागर दिसतात–

**सदानंद**—( पुरंदरास ) महाराज ! या राणीसाहेब आपल्या दर्शनाकरितां आल्या आहेत.

[ पुरंदर डोळे उघडतो. तारिणी पुनः नमस्कार करते. ]

**पुरंदर**—अष्टपुत्रा सौभाग्यवती भव !

**सदानंद**—काय आपली इच्छा असेल ती महाराजांनां कळवा यावेळीं.

**चित्रांगदा**—महाराज ! आपण आतां दिलेला आशीर्वाद खरा व्हावा, अशी चरणांजवळ राणीसाहेबांची विनंति आहे.

**पुरंदर**—आशीर्वाद देण्याचें काम आमचें; पूर्ण करणार तो परमेश्वर आहे.

**तारिणी**—आपणासारखे सत्पुरुष अन् परमेश्वर कांहीं दोन नाहींत. महाराज ! आपल्या अलौकिक सामर्थ्याची तर सगळं जग वाखाणणी करीत आहे. मग माझेच हेतु पूर्ण करायला आपल्या अंगीं सामर्थ्य कसं नसेल ?

**पुरंदर**—बरें आहे बुवा ! पण तुमचें ह्मणणें काय आहे, तें मला अगोदर स्पष्ट सांगा पाहूं.

**चित्रांगदा**—वैभव, संपत्ति वगैरे सर्व सुखं सरकारांनां अनुकूल आहेत; पण दुर्दैवानं संततिसौख्य मात्र अजून बाईसाहेबांच्या नशिबीं नाहीं. आपल्या कृपाप्रसादानं त्याहि सौख्याची उणीव भरून निघावी, ह्मणून आज बाईसाहेब आपल्याकडे आल्या आहेत, महाराज !

**पुरंदर**—( विचार करून ) आणा पाहूं तुमचा हात–( हात पहात स्वगत ) अहा हा ! या सुंदरीचा असा गुलाबासारखा कोमल हात हातांत घ्यायला मिळाल्यावर माझी स्थिति वाईट कोण ह्मणेल ? ( उघड ) तुमच्या नशिबीं वैभव अन् संपत्ति तर विपुल दिसते आहे, पण संतति—

**तारिणी**—महाराज ! असे स्तब्ध कां बरं राहिलां आपण ? माझ्या नशिबीं काय आहे, तें मला कळूं द्या. आपले शब्द ऐकायला माझं हृदय कसं अगदीं अधीर होऊन गेलं आहे.

**पुरंदर**—तुह्मांला उगीच संशयांत तरी कशाला ठेऊं आतां ? तुमच्या नशिबीं कांहीं अपत्यसौख्य नाहीं, हें तुह्मांला स्पष्टच सांगतों.

पुणे ... नारायण पेठ, पुणे

**तारिणी**—अरे देवा! हेंच ऐकायला का मी इथं आलें? महाराज! माझ्या नशिबीं पुत्रसुख लिहिलेलं नसेल, पण आपल्यासारख्या साधुवर्यांचा आशीर्वाद खरा करायला तरी तो दयाघन मला पुत्रवती नाहीं का करणार? आपल्या भक्तांचं वचन सत्य करायला परमेश्वर सदासर्वदा अतिशय तत्पर असतो, असं ह्मणतात, तें खोटंच का?

**पुरंदर**—तें अक्षरशः अगदीं खरें आहे! पण आह्मी तरी नेहमीं आमच्या प्रभुरायाचें सत्व पहाणें किंवा त्याच्यावर सर्वदा संकट घालणें कसें योग्य होईल?

**तारिणी**—महाराज! या दीनेला अशी निराश नका हो करूं! आपल्याला या अभागिनीची दया कशी हो येत नाहीं? महाराज! सर्व जगाचं दुःख हरण करायला आपला जन्म आहे, मग मीच अभागिनी आपल्या अवकृपेला कशी पात्र झालें? महाराज! नका हो असे निष्ठुर होऊं.

**पुरंदर**—आतां काय करावें बुवा! हें तुह्मीं माझ्यावर संकटच घालीत आहां. बरें, मी तुह्मांला एक उपाय सांगतों; पण तुमचा मजवर विश्वास आहे का?

**तारिणी**—हें काय विचारणं, महाराज! आपल्या वचनावर ज्याचा विश्वास नाहीं, असा हतभागी या जगांत कोण असेल?

**पुरंदर**—पहा बरें! अगोदर नीट विचार करा–मी सांगतों तो उपाय करायला तुह्मांला फार कष्ट पडतील.

**तारिणी**—कितीहि कष्ट पडले, तरी ते मी सोशीन. पण सवतीच्या सान्निध्यानं होणाऱ्या यातना कांहीं मला सहन व्हायच्या नाहींत.

**पुरंदर**—पुत्रप्राप्तीकरितां तुह्माला एक यज्ञ करावा लागेल. पण तो अशा रीतीनें केला पाहिजे, कीं, त्याबद्दल कोणाला मागमूसहि लागतां कामानये.

**चित्रांगदा**—पण मी ह्मणतें, यज्ञ करावयाचा तो असा चोरून कसा होणार? आमच्या वाड्यांत तरी निदान अशी गुप्त अन् यज्ञ करायला सोईची अशी एकहि जागा नाहीं. जिकडेतिकडे माणसांचा सुळसुळाट!

**तारिणी**—हो गडे! आपल्या वाड्यांत हें कसं जमणार?

**पुरंदर**—त्याबद्दल तुह्मींच काय तो नीट विचार करा. एवढें मात्र खरें, कीं, तुह्मां दोघींखेरीज तिसऱ्याला जर यांतलें एक अवाक्षर कळलें, तर या यज्ञाचें कांहींसुद्धां फळ येणार नाहीं.

**तारिणी**—पण अशा रीतीनं यज्ञ होणार कसा? अशी एकांताची जागा आह्माला सांपडणार कुठं?

**पुरंदर**—अं: ! त्याबद्दल तुह्मीं बिलकुल चिंतेंत पडूं नका. दुसरी कुठें व्यवस्था होण्याजोगी नसेल तर आमचा मठ आहेच अशा कामाला योग्य.

**तारिणी**—पण आपल्याला आमच्यापासून कांहीं त्रास तर नाहींना होणार ?

**पुरंदर**—अहो, अशा त्रासाचें जर कांहीं आह्मीं मनावर घेतलें असतें तर परार्थ देह झिजवायचा आह्मी संकल्पच केला नसता !

**चित्रांगदा**—तर मग बाईसाहेब ! महाराज ह्मणतात तसंच करणं मला बरं वाटतं–त्यांत दुसराहि एक फायदा आहे. महाराज यज्ञाच्या वेळीं मठांत समक्ष राहून यज्ञाचा यथायोग्य विधि आपणाला सांगतील, ह्मणजे त्यांत कांहीं चूक व्हायची नाहीं अन् कोणाला नकळत यज्ञ निर्विघ्नपणं सिद्धीसहि जाईल.

**तारिणी**—पण अग वेडे ! मला अगोदर मठांत गुप्तपणं येतां कसं येणार ?

**चित्रांगदा**—अं: ! त्यांत कांहीं मोठंसं नाहीं. सरकारस्वारी कांहीं एक-दोन दिवसांत बाहेरगांवाहून येत नाहीं. आतां उरली इतर माणसांचीच धास्ती. त्याला आपण आजच्यासारखीच कांहींतरी युक्ति करूं ! चला तर, आपण आतां जाऊं या.

**पुरंदर**—ठीक आहे तर. तुमचा बेत कसा काय होतो तो मला कळवा, म्हणजे मी तयारीला लागतों. या तर–आतां माझीहि स्नानाची वेळ झाली.

**तारिणी**—चित्रांगदे ! महाराजांकरितां आणलेलं तें ताट ठेव पुढं.

[ चित्रांगदा पुरंदरापुढें ताट ठेविते. ]

**पुरंदर**— छे: छे: छे: छे: ! आह्मी निपुत्रिकाच्या धनाला स्पर्शहि करीत नाहीं.

**तारिणी**—( खिन्नपणें ) निपुत्रिक अगदीं पातकी असतात का ?

**पुरंदर**—अहो, त्यांत कांहीं शंका का आहे ? ब्रह्महत्येचें पातकहि एक वेळ पुरवलें, पण निपुत्रिकाचें तोंड पहाणें नको. अहो, आह्मीचसे काय, पण निपुत्रिक माणसें मरून नरकांत गेल्यावर यमदूतसुद्धां त्यांनां दूरूनच भयंकर रीतीनें छळतात !

**तारिणी**—( स्वगत ) यांचा एक एक शब्द माझं हृदय भेदून टाकीत आहे. ( उघड ) महाराज ! निपुत्रिकांनां भयंकर यमयातना भोगाव्या लागतात काहो ?

**पुरंदर**—तें कांहीं विचारूं नका. ते क्रूर यमदूत जेव्हां त्या अनाथ पापी प्राण्याला विस्तवाच्या जमिनीवरून चालवितात, तेव्हां त्यांचे जे भयंकर हाल होतात, त्यांचें वर्णनहि करवत नाहीं. कोणी त्याच्या डोळ्यांत तापलेल्या लोखंडी सळ्या घालतात, तर कोणी त्याला लोहशूलावर चढवितात; आणि शेवटीं त्याला

अतिशय घाणेरड्या कुंभीपाकांत लोटतात. त्या दूतांचें रूप तरी किती भयंकर अन् हिडिस असतें ह्मणतां ! काय त्यांचे ते विस्तवासारखे लाल भडक डोळे ! तसाच तो भेसूर अन् लांब तोंडाचा जबडा ! जणूंकाय पृथ्वीवरील सर्व निपुत्रिक लोकांचा घोळका त्यांच्या त्या भयंकर जबड्यांतच गडप होणार आहे असें वाटतें.

**तारिणी**—( स्वगत ) अगबाई ! हें ऐकून माझ्या अंगावर कसा कांटा उभा राहिला आहे ! केवळ सवतीच्या मत्सरामुळेंच मी आतांपर्यंत पुत्रप्राप्तीची इच्छा करीत होतें, पण आतां तर या भयंकर यमयातना चुकविणारं तें मनोहर पुत्रमुख केव्हां पाहीन, असं मला झालं आहे. ( उघड ) महाराज ! येतें तर आतां मी. दिवस ठरवून चित्रांगदेबरोबरच आपणाला निरोप पाठवीन.

**पुरंदर**—ठीक आहे, यावें राणीसाहेब.

[ तारिणी व चित्रांगदा पुरंदराला नमस्कार करतात. सर्व जातात. ]

---

## प्रवेश चवथा.

[ **स्थलः**—मंदाराच्या वाड्यांतील एक दालन. मंदार एकटाच बसला आहे. ]

**मंदार**—माझ्यावर हल्ला करणाऱ्या त्या दरोडेखोरांचा कांहीं तपास लागेल, ह्मणून मी त्या साधुमहाराजांच्या दर्शनाला गेलों, तों माझ्या स्त्रीरूपी धनावर दरोडा घालणारा अट्टल दरोडेखोर, माझ्या अत्यंत विश्वासाचा मनुष्य बनून माझ्याजवळच राहिला आहे, या संशयपिशाचानें मला घेरलें ! लोक ह्मणतात, सत्पुरुषाच्या दर्शनानें मनस्ताप नाहींसा होतो, पण माझी तर उलटच स्थिति झाली आहे !

[ चाल—दादानि तुंदिर दिरदा० ]

**हें विपरीत कैसें घडे । सुखविल मन्मन सद्दर्शन तें ।**
**ह्मणुनी धरितां तत्पद अघटित हृदयिं ताप मम केविं**
**जडे ॥ ध्रु० ॥ व्यथितहृदय जो स्मरतापानें । करिल**
**शांत विधु या भ्रांतीनें । जातां किरणीं उत्सुकतेनें ।**
**अधिक दाहिं तो जेविं पडे ॥ १ ॥**

पण महाराज तर सांगायला चुकले नसतील ना ? छेः ! असेंहि ह्मणण्याचें धाडस करवत नाहीं. आजपर्यंत त्यांनीं मला चांगलेच ठोकताळे सांगितले आहेत. मग आजच ते खोटें कां सांगतील ? बरें, महाराजांनीं मला मुद्दाम हें सांगितलें, असें ह्मणावें, तर तसें करण्याचें तरी त्यांनां कारण काय ? रजनीकांतावर आणि

तिच्यावर कुभांड रचायला त्यांचें अन् महाराजांचें कांहीं वैर नाहीं. बरें इकडे, रजनीकांताविषयीं असा दारुण संशय घ्यावा, तर तेंहि योग्य दिसत नाहीं. महाराजांनीं ज्या शंका काढिल्या त्या अगदीं बरोबर! मी अमुकच दिवशीं नक्की जहागिरीवर जाणार, हें त्या दरोडेखोरांनां काय ठाऊक? मी ह्मणतों, कदाचित् त्यांनीं ती बातमी काढली असेल. पण ऐनवेळीं त्याच ठिकाणीं रजनीकांत कसा आला? अन् ते चोर संख्येनें पुष्कळ अन् शक्तीनें दांडगे असतां एकट्या रजनीकान्ताला पहातांच कसे पळाले? तें कांहीं नाहीं; येथें कांहींतरी काळेंबेरें आहे खास! पण मला ठार मारून तरी या दोघांचा काय फायदा? कां बरें? त्या दोघांच्या सुखांत माझीच आडकाठी आहे कीं नाहीं? ती एकदा नाहींशी झाली, कीं, निर्धास्तपणें त्यांनां हवातसा धिंगाणा घालायला नाहीं का मिळणार? ( विचार करून ) ते दरोडेखोर मधूनमधून 'इंदुमती इंदुमती' असें कां बरें आपसांत कुजबुजत होते? माळीण इंदुमतीच आहे असें समजूनच त्यांनीं तिला पळविली असेल. हो, असेंच अगदीं--असेंच–आतां सर्व जुळलें. मला ठार मारून इंदुमतीला पळवायचा त्या दरोडेखोरांचा बेत ठरला असावा; पण ती माझ्याबरोबर नाहीं, हें कळवायलाच रजनीकांत ऐनवेळीं तेथें आला असला पाहिजे. ते चोर त्याचे साथीदार होते, ह्मणून तर त्याच्या खुणेनें ते हांहां ह्मणतां पळून गेले. हो, असेंच! नाहींतर इंदुमती माझ्याबरोबर जाणार आहे, हें रजनीकांतानें सांगितल्याशिवाय त्या चोरांनां कसें कळलें? वाटेंत आपल्या साथीदारांकडून परस्पर मजवर हल्ला करविला ह्मणजे आपल्यावर संशयसुद्धां येणार नाहीं, अशा हेतूनें हा सारा व्यूह या दोघांनीं रचला, हें उघड आहे. ठीकच आहे, मी रसिक नाहीं; सुंदर नाहीं—उलट कुरूप आहें. तेव्हां इंदुमतीचें वांकडें पाऊल पडणार असा कयास बांधून मी नेहमीं मोठया दक्षतेनें तिच्याशीं वागत असें. अनृताचा कूप, कपटाची खाण आणि अविश्वासाचें स्थल अशा या स्त्रिया आहेत, अशी माझी पूर्वींपासूनच ठाम समजूत असल्यामुळें मी इंदुमतीला करड्या नजरेनें वागवीत आलों आहें. या उपायांनीं तरी ती दुर्मार्गाला लागणार नाहीं, असें मला वाटत होतें. पण तो माझा भ्रमच ठरला. शेवटीं ती आपल्या जातीवर गेलीच! पण मला तिच्याविषयीं इतकें नवल वाटत नाहीं. कारण—

[ चाल—छेकत गेल० ]

**युवतिलोभ नर सुंदर त्यावरि। प्रीति जडे स्वाभाविक अंतरिं ॥ ध्रु० ॥ रागांधा करिती दुष्कृतिसी। विघ्न**

 ११४ ब, नारायण पेठ, पुणे २

**कराया बल नच विधिसी। ठेविति नर जरि विश्वा-**
**सासी। सहज फसति परि ॥ १ ॥**

पण रजनीकांता! तूं माझ्याशीं—आपल्या प्राणदात्याशीं—असा बेइमान होशील, असें मात्र मला स्वप्नांतहि वाटलें नव्हतें. तुझे मीं प्राण वांचविले, त्याची फेड तूं माझे प्राण व धर्मपत्नी घेऊन अशा रीतीनें करूं पहातोस काय? अरे कृतघ्ना!

[ चाल—तो जगभरि भरला० ]

**कां स्मरखरपाशीं गुंतसि ॥ ध्रु० ॥ स्थिति अपुली**
**कां अवचित विसरसि। निंद्य कृति करुनि उपकृति**
**फेडिसि ॥ १ ॥ नीतिपथा कां विन्मुख होसी। निंद्य**
**विषयिं कां वायां रमसी ॥ २ ॥**

पण तुला दोष देण्यांत तरी काय अर्थ आहे? अशी विलासवती तरुण सुंदर स्त्री तुझ्यासारख्या निपत्नीक सुंदर तरुणावर अनुरक्त झाली असतां तुझें तरी एकपत्नीव्रत कायम कसें रहाणार?

[ चाल—मनुजा सुगुणि० ]

**करिना वश कुणा सुंदरी? वारि कोण लोचनबाणा**
**॥ ध्रु० ॥ ज्ञानी बुध योगी जे सदा ध्याति ईशचरणा।**
**ऐसे मुनिवरहि ते भुलवुनी करिति मूढ त्यांनां ॥ २ ॥**

रजनीकान्त आणि इंदुमती यांच्या नेहमीं चाललेल्या एकान्तांतील गुजगोष्टी व परस्परांवरील निरतिशय प्रेम, यांतलें इंगित मला आतां कळलें. या घटकेपर्यंत त्यांच्या प्रेमाच्या खऱ्या स्वरूपाची मला कल्पनाहि नव्हती. रजनीकान्त अनाथ आहे, त्यावर इंदुमती सदय अंत:करणानें प्रेम करीत असेल व तोहि कृतज्ञतेनें तिच्यावर विशुद्ध प्रीति करीत असेल, असें मला वाटत होतें. त्यांच्या एकमेकां-वरील प्रेमाची मजल येथपर्यंत पोंचेल, असें मला कधीं स्वप्नांतहि वाटलें नाहीं. मीं आधीं त्या दोघांच्याहि निष्पाप दिसणाऱ्या बाह्य रूपावर विश्वास ठेविला, ही माझीच मोठी चूक! ठीक आहे. अजून काय झालें आहे? या सर्व गोष्टींचा बारीक तपास काढून, त्यांचा गुन्हा त्यांच्या पदरांत घालीन आणि जितक्या दयेनें त्याला मीं कालमुखांतून वांचविलें, तितक्याच निर्दयतेनें त्याला आणि त्याच्या प्रियकरणीला काळाच्या जबड्यांत देईन! ( पाहून ) पापिणीची—अरे, आठवण होण्याचाच अवकाश—ही कृत्या आलीच!

**इंदुमती**—( प्रवेश करून ) अगबाई ! केव्हां यायचं तें मला कळलंसुद्धां नाहीं !

**मंदार**—हो, वर्दी द्यायला विसरलों खरा राणीसाहेबांनां !

**इंदुमती**—वर्दी द्यावयाला नको हो कांहीं ! एकटंच स्वस्थ विचार करीत बसायला झालं, म्हणून म्हटलं असं. पण इकडची प्रकृति नीट आहेना ? त्या दरोडेखोरांच्या हल्ल्याच्या दगदगीमुळं फारच त्रास झाला असेल आपणाला–

**मंदार**—मला असल्या फुसक्या त्रासानें काय होणार आहे ? मी चांगला सशक्त अन् धट्टाकट्टा आहें. परमेश्वराच्या मनांतूनच जर माझा अंत करावयाचा नसेल, तर इतर माणसांनीं मला मारण्याचा कितीहि प्रयत्न केला, तरी त्यांच्यानें माझ्या केंसालाहि धक्का लागणार नाहीं.

**इंदुमती**—हो खरंच ! आज अंबाबाईनंच कृपा केली, म्हणून हे चरण पुनः सुखरूपपणं माझ्या दृष्टीस पडले. अंबाबाईच्या या कृपेबद्दल मी तिची आज पूजा बांधणार आहें.

**मंदार**—अंबाबाईची यांत कसली कृपा आली आहे ? अन् असली तरी तुला त्यांत आनंद मानण्यासारखें काय आहे ? आणि मला त्या चोरांनीं ठार मारलें असतें, तर तुझें त्यांत फारच नुकसान व्हायचें होतें ! माझ्यामागें चैनीनें कालक्रमणा करायला परमेश्वरानें तुला सर्व सुखें अनकूल ठेवलीं आहेत.

**इंदुमती**—म्हणजे ? असं काय भलतंच बोलायचं हें आज ? आपल्यापेक्षां मला या इतर सुखांचं महत्त्व जास्त आहे, असं का आपल्याला वाटतं ?

[ चाल–हां हां ये कालि० ]

**कां या वदतां कुवचाला ॥ ध्रु० ॥ दर्शनलोलुप मानस**
**मम हें । आस दुजी नच मुळीं तयाला ॥ १ ॥ योग्य न**
**वाटे किंकरी जरी । अन्य शासना द्यावें इजला ॥ २ ॥**

**मंदार**—( स्वगत ) माझ्या जागीं एखादा कोणी भोळा असता तर हिला तो महासाध्वी समजला असता ! पण मी तरी आतां हिच्या असल्या गोड गोड भाषणांला भुलणार नाहीं ! ( उघड ) मी यांत काय खोटें बोललों ? एखादा मनुष्य मेला तर इतर मनुष्यें त्याच्याकरितां प्राणत्याग करीत नाहींत. अग, ह्रा सृष्टीचा नियमच आहे ! नाहीं का ?

**इंदुमती**—पण असे हे उदासीनतेचे विचार आज कां बरं सुचले आपणाला ? आजच्या हल्ल्यामुळं? मेले एकदाचे उलथून गेले ते ! त्या गोष्टींचं आतां स्मरणच नको गडे ! त्या मेल्यांचा तपास लावून, त्यांनां चांगली शिक्षा द्यावी ह्मणजे झालं !

**मंदार**--अं:, तसें करायला कांहीं फार वेळ लागणार नाहीं. पण चोराला चोरी करीत असतां पकडण्यांत मौज आहे.

**इन्दुमती**—त्यांचा कांहीं तलास लागला वाटतं ?

**मंदार**—अग, तलासच काय ? पण एका सत्पुरुषानें माझ्या डोळ्यांत ज्ञानांजन घालतांच मला ते स्पष्टपणें दिसूंहि लागले. रवि, चंद्र, मंगळ, गुरु—हो, असेंच—

**इंदुमती**—अगबाई ! हीं का त्या चोरांचीं नांवं? किती बाई चमत्कारिक तरी हीं ! मीं नव्हतीं कधीं ऐकलीं माणसांचीं असलीं नांवं !

**मंदार**—अलीकडे जगच मोठें चमत्कारिक होत चाललें आहे. मग त्यांतील मनुष्यांच्या नांवांत थोडा चमत्कारिकपणा असला तर नवल काय ? पूर्वीच्या साध्वी स्त्रिया पतीकरितां आपले प्राणहि देत असत; पण अलीकडे पहावें तर पतीचा प्राण घ्यायलाच स्त्रिया खटपट करतात! अन् ती न साधली तर पुनः आपल्या पातिव्रत्याचा टेंभा मिरवायलाहि तयार असतात ! ( स्वगत ) कशी गोळी बरोबर लागली ! कसा चेहरा फिक्का पडला स्वारीचा !

**इंदुमती**—सर्व जग जरी अलीकडे चमत्कारिक झालं असलं, तरी त्यांत प्रत्यक्ष पतीचा घात करणाऱ्या कुलटा कोणी निपजल्या असतील, असं निदान मला तरी वाटत नाहीं.

[ चाल–ही कवण वदतां० ]

**या प्रखर दुरिता । न घेति युवति माथां । त्यां स्पर्शे न**
**कधिही पाप विमलचरितां ॥ ध्रु० ॥ असु निज मानिति**
**निज रमणा मग। करिति का स्वहस्तें त्या स्वान्ता ॥१॥**

हे पहा रजनीकांत आले. ते आणि मी आपल्या वाटेकडे डोळे लावून आपल्या येण्याची वाट पहात बसलों होतों.

**मंदार**—अग, हें मला चांगलें माहीत होतें, ह्मणून मी इतक्या घाईनें इकडे आलों. रजनीकांत ! आज तूं होतास ह्मणून माझे प्राण वांचले !

[ चाल—भजन बिन बिन० ]

**आभारी मी खचित असें तव जाण ॥ ध्रु० ॥**
**फेड न होई उपकाराची प्राण दिले जरि दान ॥ १ ॥**
**संकटकालीं धांव घेउनि रक्षियले मत्प्राण ॥ २ ॥**

**रजनीकांत**—महाराज ! ज्याप्रमाणें सूर्यापुढें खद्योत, त्याचप्रमाणें आपल्या मजवरील विशाल उपकारांपुढें माझी ही अल्प कृति आहे !

**मंदार**—अरे, तुला जगाचा तितका अनुभव नाहीं, म्हणून तूं असें म्हणतोस. जगांत कित्येक मनुष्य आपल्या प्राणदात्याचाच प्राण घेण्यास तयार असतात. त्यांच्याकडे पहातां तुझी ही कृति किती बरें उदार व मोठी आहे ? ( स्वगत ) लागली—या स्वारीलाहि चांगली गोळी लागली ! पहा कशी दोघांची नजर एक झाली !

**रजनीकांत**—दादासाहेब ! जे दुर्जनच असतात, ते प्राणदात्यावरच काय, पण आपल्या जन्मदात्यावरहि हात उचलीत असतील. पण तो कांहीं जगांतील सर्वसाधारण नियम नाहीं. जाऊंद्या तो खेदकारक विषय ! या आनंदाच्या वेळीं तो कशाला ? आज त्या प्रभूनें कृपा करून आम्हां सर्वांनां आनंदाचा दिवस दाखविला, याबद्दल त्याचे आपण सर्वजण अत्यंत आभार मानले पाहिजेत. असेंच त्या कृपाघनानें आपलें कृपाछत्र आपणां उभयतांवर नेहमीं ठेवावें.

[ चाल—नहिमाने श्याम० ]

**सुखद हो भव तुह्मांला। लेश शिवो न असुख हृदयाला ॥ ध्रु० ॥ दीर्घायु करुनि खल रिपु दंडुनि देवो प्रभु मंगल उभयांला ॥ १ ॥**

[ पडदा पडतो. ]

---

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

[ **स्थल**—मठांतील एक खोली. पुरंदर एकटाच प्रवेश करतो. ]

**पुरंदर**—मनांत धरल्याप्रमाणें येथपर्यंत तर ठीक जुळलें. आतां घाट घातल्याप्रमाणें तारिणी माझ्या मठांत आली, कीं, माझा बहुतेक कार्यभाग संपला. मग राहातां राहिलें इंदुमतीचें काम; तो बार या दोनचार दिवसांत उडविला, कीं, घेतलेल्या वेषाचें आणि रचलेल्या व्यूहाचें सार्थक झालें! परंतु बाहेरचीं हीं कामें आटपत येत चाललीं आहेत, तशी अंतर्व्यवस्थेची मात्र मला थोडीशी काळजी वाटूं लागली आहे. इतक्या आटोकाट प्रयत्नांनीं व शिताफीनें हस्तगत केलेलें सर्व द्रव्य घेऊन मी एकटा येथून पार पडणार कसा? हीच चिंता मला अलीकडे लागून राहिली आहे. न्याय ह्मटला तर सदानंदप्रभृतींला त्यांतील बराच भाग देणें रास्त आहे. परंतु न्यायान्याय जर मी पाहूं लागलों, तर आजपर्यंत हा धंदा मी कशाला चालविला? या चोरांनां तसेंच कोकलत ठेवण्याचा माझा विचार आहे. हें सारें ठीक आहे--पण हें साधणार कसें? ( थांबून ) अंः! त्यांत काय आहे? इतक्या मोठमोठया मंडळींनां पहातां पहातां ज्यानें फसविलें, तो मी पुरंदर या मशकांची का पर्वा करायला बसलों आहें? हो, असेंच करावें. आपलीं सर्व कामें यथास्थित पार पडेपर्यंत यांनां गोडगोड थापांवर झुलवीत ठेवावें आणि करावा एखादे दिवशीं संधि साधून पोबारा झालें! बोलून चालून अडाणी, अक्कलशून्य लोक हे—या शंखांनां फसवायला मला कितीसा वेळ लागणार आहे? अन् जी या चोरांची वाट तीच त्या चित्रांगदेची! त्या बिचारीला वाटतें आहे, कीं, मीं सांगितलेलीं कामें तिनें फत्ते केलीं, कीं, मी तिला धनाच्या राशीवर लोळत ठेवणार आहें! वेडी कुठली! मी जर असा कर्णाचा अवतार असतों, तर जीव धोक्यांत घालून मीं इतके उपद्व्याप केले असते कशाला? बाकी, या सर्व नंदीबैलांचा माझ्या-वरचा हा गाढ विश्वासच मला पुष्कळ कामांत उपयोगी पडतो आहे! चित्रां-गदेच्या तोंडाला मधाचें बोट लावून तिच्याकडूनच आपली कार्यसिद्धि करून घेतली पाहिजे. काय मजा आहे! हा वेष घेतांना मला मुहूर्त फार चांगला

मिळाला होता असें दिसतें. या वेषाच्या योगानें मनांत धरलेले हेतु कसे हां हां ह्मणतां पार पडत आहेत ! जणूं काय हा वेष ह्मणजे कार्यसिद्धीचा चुंबकमणीच! मीं नवीन सुरू केलेल्या या व्यापाराला भांडवलहि फारसें नको ! फक्त दोन दमड्या किंमतीचा भगवा वेष अंगभर पसरून दिला कीं झालें ! साखरेंत घोळलेली मधुर वाणी मात्र तोंडांत मुबलक असावी ! ( पाहून ) हें कोण ? हं–हा मंदार आला वाटतें ? राजश्रीच्या डोक्यांत मीं भरविलेल्या संशयाचें बीजारोपण बरेंच झाल्यासारखें दिसतें. ( उघड ) मंदार ! यावेळीं कां हो आलांत ? अन् असे कां दिसतां अहां तुम्ही ?

**मंदार**—( प्रवेश करून ) सहज, कांहीं विशेष नाहीं.

**पुरंदर**—आज तुमची प्रकृति ठीक नाहीं वाटतें ?

**मंदार**—प्रकृतीला काय धाड झाली आहे माझ्या ? प्रकृति ठीक आहे, पण मन मात्र ठिकाणावर नाहीं, हें खरें.

**पुरंदर**—कां ? तें कुठल्या आकाशांत गिरक्या खातें आहे ?

**मंदार**—गुरुमहाराज ! आपणांला सर्व ठाऊक असतां या दासाच्या तोंडूनच वदविण्यांत काय अर्थ ? महाराज ! माझा आतां अंत कां पहातां ?

[ चाल–फगुवा ब्रिज० ]

**स्थिरता न मनीं, ये भ्रम मतिला । मुळिं चैन नसे, हें**
**संशयविष दे ताप, विकल करि मम तनुला ॥ ध्रु० ॥**
**सुमति करिल तो निंद्य कृति अशी साच न वाटे हें**
**मजला ॥ १ ॥**

**पुरंदर**—असें असें–मीं त्या दिवशीं सांगितलेल्या गोष्टीविषयीं ह्मणतां अहां वाटतें ? मंदार, तुह्मी वेडेच आहांत झालें ! अहो, तुमच्यासारख्या शहाण्यासुरत्या जबाबदार माणसांनीं ज्योतिषासारख्या अनिश्चित शास्त्रावर भरंवसा ठेवून रहाणें बरें नव्हे. आमचें ज्योतिष काय घेऊन बसलां आहां ? अहो, ती भोळ्या बाया–बापड्यांनां फसवायची एक विद्या आहे, झालें.

**मंदार**—महाराज ! काय ह्मणतां हें ? आपल्या जागीं एखादा कोणी पोटभरू भोंदु साधु असता, तर त्याच्यावर माझा कधींच विश्वास बसला नसता अन् मीं त्याच्या बोलण्याचें तादृश महत्त्वहि मानलें नसतें. पण आपली निरिच्छपणानें परोपकार करण्याची वृत्तीच आमचा विश्वास आपल्याकडे सहज

 १३७ ब, नारायण पेठ, पुणें

ओढून घेत आहे. महाराज! कृपा करून या आपल्या दासाची संशयनिवृत्ति करा अन् त्याला या दारुण मनोयातनांतून मुक्त करा.

**पुरंदर**—मंदार! काय वेडेपणा हा तुमचा! अहो, ज्योतिषानें येत असलेलें तुमच्या प्रश्नाचें उत्तर सांगावयाचें काम माझें, तें मीं केलें आहे. आतां तें उत्तर खरें आहे कीं खोटें, तें पडताळून पहाणें तुमच्याकडे आहे. यांत संशय कसला अन् निवृत्ति कसली?

**मंदार**—महाराज! अशी एकदम माझी वासलात लावूं नका. मी आपला शिष्य ह्मणून शिष्यवत्सलतेनें माझें हें काम आपणच करावें, अशी गुरुचरणांपाशीं माझी विनंति आहे. अन्यायाचें वर्तन तर आपल्या हातून कांहीं झालें नाहीं ना, अशी पुढें मनाला हुरहुर लागून राहूं नये, ह्मणून आपणाला हा मुद्दाम त्रास द्यावा लागत आहे.

**पुरंदर**—शाबास! शाबास! उत्तम युक्ति काढलीत मंदार! ह्मणजे दोषाचें खापर फुटलें तर परस्पर मजवर फुटावें, आणि आपण स्वत: मोकळेच! अशीच कीं नाहीं तुमची ही क्लृप्ति?

**मंदार**—छे छे! काय ही भलतीच शंका? आपल्या हातून कांहीं गैर व्हायचेंच नाहीं, अशी माझी पक्की खात्री आहे.

**पुरंदर**—होय ना? माझ्या हातून गैर व्हायचें नाहीं हें जर खरें, तर कोणत्याहि मनुष्याचें विनाकारण नुकसान करण्यांत माझा काय फायदा?

**मंदार**—पण गुरुमहाराज! त्या अपराधी मनुष्याचें नुकसान न करण्यांत आपण माझें नकळत भयंकर अहित करीत आहां, याचाहि नको का कांहीं विचार करायला? शिष्याच्या हिताहिताची काळजी सद्गुरुमाउलीलाच असली पाहिजे.

**पुरंदर**—मंदार! तुमच्या हिताची मला किती काळजी आहे, तें एक परमेश्वरच जाणतो आहे—दुसरें काय सांगूं मी?

**मंदार**—तर मग आतां माझी संशयनिवृत्ति करायला आढेवेढे कां?

**पुरंदर**—ठीक आहे तर—तुमचा इतका आग्रहच आहे, तेव्हां यासंबंधीं मला काय वाटतें तें मी तुह्मांला सांगतों. पण मीं तुह्मांला या बाबतींत माहिती दिल्यापासून तुह्मांला कसकसा अनुभव येत चालला आहे, हें तुह्मी मला आधीं सांगा; मग पुढचा विचार करतां येईल.

**मंदार**—मी आपल्याजवळून गेल्यापासून त्या दोघांच्या वर्तनावर सारखें बारीक लक्ष्य ठेवलें आहे. काय सांगूं गुरुमहाराज! त्यांची प्रत्येक कृति आपल्या सांगण्याची साक्ष देत आहे.

**पुरंदर**—मग त्यावरून होत नाहीं का तुमच्या संशयाचा आपोआप उलगडा? अहो, या सरकारांत वर्दी आणि न्हा या नसत्या त्रासांतून मोकळे! आहे काय अन् नाहीं काय?

**मंदार**—सरकारांत वर्दी द्यायला कांहींच हरकत नाहीं. पण महाराज! ज्याला मीं सख्या भावाप्रमाणें आजपर्यंत वागविलें, ज्याला या हातानें वांचविलें, त्याचाच नाश करायला मी कसा तयार होऊं?

**पुरंदर**—तर मग आपल्या बंधूंच्या चालू असलेल्या प्रेमलीला–छे, लीला–कौतुकानें पहात रहा ह्मणजे झालें. मला कशाला विचारायला आलांत उगीच?

**मंदार**—( स्वगत ) महाराज 'प्रेमलीला' असें कां ह्मणाले बरें? छेः–पण नको–( उघड ) तसें तर केंव्हांहि होणार नाहीं.

[ चाल–चापा स्मर धरी० ]

**मानी प्राण मी जरि तयाला॥ध्रु०॥ विश्वसुनि आजवरि।**
**राहिलों मी जरी। अनुचिता कृति करीं। करित अशि**
**तो जरी। दाखविन यमपुरी खचित त्याला॥ १॥**

**पुरंदर**—वः मंदार! तुम्हीं तरी मला मोठे चमत्कारिकच दिसतां बुवा! मीं सांगितलेल्या दोन्ही गोष्टी जर तुम्हांला कबूल नाहींत, तर मी तरी तुम्हाला काय सांगणार? अन् तुम्ही तरी मला कशाला विचारतां?

**मंदार**—महाराज, या दासावर असे रागावूं नका. मी आपणाला विचारतों, कीं, माझी पक्की खात्री झाल्याखेरीज मी कोणता दोष त्यांच्यावर ठेवूं? माझ्या बायकोच्या जारकर्माबद्दल जर म्हणाल, तर एक वेळ मला तें शक्य वाटतें; कारण, 'क्वचित् साध्वी भवेन्नारी' असें माझें प्रथमपासूनच स्पष्ट मत आहे. पण ही गोष्ट जाहीर रीतीनें जगापुढें आणणें म्हणजे आपणच आपला दुर्लौकिक केल्यासारखें होणार आहे. त्यांच्यावर खुनाचा आरोप शाबीद झाला पाहिजे, म्हणजे न बोलतां दोन्ही तऱ्हेचा सूड त्यांच्यावर आपोआप उगविल्यासारखें होईल.

**पुरंदर**—तें आपोआप कसें शाबीत होणार, तें मला कळत नाहीं. ती बिलंदर जोडी आपण होऊन तुमच्या स्वाधीन होणार आहे वाटतें?

**मंदार**—मग गुरुमहाराज ! या प्रसंगीं मी काय करूं तें सांगा. आपण सांगाल त्याप्रमाणें मी अक्षरशः वागायला तयार आहें. पण कृपा करून त्या दुष्टांच्या कपटजालामध्यें गुरफटून मात्र मला फार दिवस ठेवूं नका.

**पुरंदर**—( विचार करून ) तर मग असें करा. तुह्मी एकदा आपल्या घराचा झाडा कसून घ्या. त्यांनीं तुह्माविरुद्ध इतकीं कारस्थानें केलीं आहेत, तेव्हां कांहीं तरी तसाच मुद्दा त्यांच्याजवळ तुह्माला मिळालाच पाहिजे. तो मिळाला तर ठीकच झालें, आणि नाहीं मिळाला तर शेवटीं सरकारांत जाऊन तुह्मी बेलाशक वर्दी द्या, ह्मणजे तुमच्या सर्व संशयाचें हांहां ह्मणतां निरसन होईल.

**मंदार**—हो, ही युक्ति ठीक आहे. आपल्या आज्ञेप्रमाणेंच करतों. सरकार-स्वारी आणखी दोन दिवसांनीं येथें परत येणार आहे. ते आले ह्मणजे प्रथम हेंच काम करतों. ही दोन दिवसांची सवड मिळाली, हें एका अर्थी ठीक झालें. या दोन दिवसांत त्या दोघांच्या वर्तनावर चांगलें लक्ष्य ठेवायला संधि मिळेल. बरें, घेतों तर आतां गुरुमहाराजांची आज्ञा.

**पुरंदर**—या. ( मंदार नमस्कार करून जातो. ) काय वेडापीर आहे हा ! नुसता फूं करण्याचा अवकाश, कीं, भडका उडाला !

[ जातो.

---

## प्रवेश दुसरा.

[ **स्थल**—मंदाराच्या वाड्यांतील एक दालन. रजनीकांत बसला आहे. ]

**रजनीकांत**—दैवविलासानें प्राप्त झालेल्या या माझ्या स्थितीबद्दल हंसावें, कीं, रडावें हेंच मला कळेनासें झालें आहे.

[ चाल—नानु कानदले० ]

**मति मावळे मुळिं ना कळे हें दुःख कीं सुख जाहलें ॥ ध्रु० ॥ कांतावियोगें मन पोळतां भगिनी शांतवि वचन-जलें ॥ १ ॥ कांता मुकें मी ज्या संकटीं भगिनीसुख त्या व्यसनिं मिळे ॥ २ ॥**

मी प्रियेसह जहाजांत बसलों, तेव्हां पुढें असा दुर्धर प्रसंग ओढवणार, याची मला लवमात्रहि कल्पना नव्हती. ध्यानींमनींहि नसलेला तो प्रसंग अकस्मात् येऊन माझ्या सर्व सुखाची एका क्षणांत होळी झाली, त्यावेळीं हें भार-

भूत जीवन नष्ट होईल तर बरें, असें वाटून निराशेनें मी जे डोळे मिटले, ते कालांतरानें उघडून पहातों तों हा अपूर्व देखावा! त्या वेळीं मीं चांगला शुद्धी-वर होतों ह्मणून बरें झालें. त्याप्रसंगीं मला जर का ग्लानि असती, तर मी पूर्ण वेडाच झालों असतों! बाकी, तसें झालें असतें तर फार बरें झालें असतें. मग या दारुण विरहयातना तरी मला भोगायला नको होत्या!

[ चाल—परलोक साधनमें० ]

**नयनांतलें जल हें न खळे। विरहाग्निनें तनु ही जळे ॥ ध्रु० ॥ स्थिरता नसे हृदया कदा। प्रिय मूर्ति ती नयनीं सदा। हृदयांतुनि सुख मावळे ॥ १ ॥ गमतो बरा भ्रम याहुनी। मम शुद्ध ही मति ठेवुनी। दे दुःख कां प्रभु नाकळे ॥ २ ॥**

आतां जरी मला सायंत वर्तमान कळल्यामुळें त्याचें तितकें मला महत्त्व वाटत नाहीं, तरी त्यावेळीं हीं परिचयाचीं व अत्यंत निकट संबंधाचीं मनुष्यें दृष्टीस पडतांच मी स्वप्नांत आहे कीं काय, असा मला क्षणभर भास झाला. इंदुमतीला पाहून जरी मला बरेच दिवस झाले होते, तरी मीं तिला तेव्हांच ओळखली. मला त्या वेळीं श्रमांमुळें चांगलें बोलतां येत नव्हतें ह्मणून बरें झालें; नाहीं तर प्रेमाच्या भरांत हांक मारून मीं त्यावेळीं तिला खास ओळख दिली असती. मग मात्र इहलोकीं किंवा परलोकीं प्रियेची भेट होईपर्यंत सर्व सुखोपभोगांचा पूर्णपणें त्याग करण्याची मीं शपथ घेतली आहे, तशी मला वहातां आली नसती. अलीकडे इंदुमतीला माझी ओळख थोडथोडी पटत चालली आहे असें वाटतें. ती माझा वृत्तांत विचारायला लागली, ह्मणजे मोठ्या युक्तीनें तो प्रसंग मला टाळावा लागतो. त्या बिचारीची ती दीन स्थिति पाहून तिला ओळख द्यावी, असें एक-वार वाटतें. पण मग माझ्या शपथेप्रमाणें वागायला ती मला मोठाच अडथळा होणार आहे. परमेश्वरा! माझ्या लाडक्या दीन भगिनीशीं मी या प्रसंगीं कप-टानें वागतों, याची मला क्षमा कर. माझ्या इंदुमतीला जगांत मायेचीं माणसें काय तीं आह्मी तीन–तारिणी लहान, तिच्याकडून हिचें शांतवन हवें तसें कसलें होणार? मी तिचा सखा भाऊ खरा, पण तिच्या संनिध असूनहि माझ्या शपथे-मुळें माझ्याजवळून तिला उघडपणें प्रेमाचा लाभ होत नाहीं. रहातां राहिले तिचे पतिराज! पण त्याच्याकडून त्या बिचारीला दिवसांत एखादा तरी सुखाचा

शब्द मिळत असेल कीं नाहीं, याची शंकाच वाटते! काय आश्चर्य आहे पहा, मंदाराचें इतरांशीं अत्यंत जिव्हाळ्याचें अन् प्रेमाचें वर्तन असतें; पण त्याचें आपल्या धर्मपत्नीशीं वर्तन पहावें तर विलक्षणच! अथवा यांत आश्चर्य तरी कसलें?

[ चाल—जाने न देउंगी० ]

**होइ जगता सुखकारी। उदय इंदुचा परि तापद तो**
**विगलित पद्मिनीसीं करी॥ ध्रु०॥ वस्तु एक असते**
**परि भिन्नानुभवासि घेति जन दोष न हा ही रीति**
**जगतीं जरी॥ १॥**

मंदाराचा स्वभाव जर संशयी आणि चंचल नसता, तर खरोखर त्याच्यासारखा लाख मनुष्य सांपडणें अशक्य होतें. पण ते अवगुण त्याच्यांत इतके प्रखरपणें वास करीत आहेत, कीं, त्यांनीं त्याला अगदीं मातीमोल करून टाकिलें आहे! धन्य त्या इंदुमतीची! ती साध्वी म्हणूनच अशा पतीच्या हाताखालीं संसार करीत आहे! त्या पतिपत्नींच्या स्वभावांत पाहूं गेलें तर जमीनअस्मानाचें अंतर आहे.

[ चाल—चुंबुनियां त्यांसि० ]

**कोपाचा क्षुब्ध जलधि गमत हा मला। शांतीची सरि-**
**ता ती जणुं सुनिर्मला॥ ध्रु०॥ चंचल हा पवनापरि।**
**जलधिसीमा ती खरि। विधिनें हा विषम करीं जोड**
**जमविला॥ १॥**

तो पहा, आपल्याशींच कांहीं विचार करीत बसला आहे. असेल कसल्या तरी संशयांत सांपडलेली स्वारी! [ जातो.

---

## प्रवेश तिसरा.

[ **स्थल**—मंदाराच्या वाड्यांतील एक दालन—मंदार एकटाच बसला आहे. ]

**मंदार**—हें जग चार दिवसांपूर्वी मला जितकें सुंदर आणि प्रिय वाटत होतें, तितकेंच आतां मला तें घाणेरडें आणि अप्रिय वाटूं लागलें आहे. तोंपर्यंत या जगांतील मनुष्यें मला सहृदय, निर्मल मनाचीं आणि शुद्ध वाटत होतीं. पण आतां मला तींच नीच, दगलबाज, दुष्ट आणि अनीतिमान् वाटूं लागलीं आहेत.

खरें ह्मटलें तर या चार दिवसांत माझा स्वतःच्या मनावरचाहि विश्वास उडाला आहे ! हें मनच स्वतःशीं बेइमान होऊन खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें भासवितें. ( थांबून ) पुष्कळ विचार केला. साधुमहाराजांनीं जवळजवळ स्पष्ट शब्दांनीं माझी संशयनिवृत्तिहि केली. पण तें दुष्ट कृत्य रजनीकांताचें असेल, असें माझ्या मनाला खात्रीपूर्वक कां बरें वाटूं नये ? हं–लागलें ! लागलें माझें मन पुनः मोहाच्या चक्रांत गिरक्या खायला ! पण मना, मी असा आतां फसला जाणार नाहीं, ही तुझी खात्री असूं दे. महाराजांच्या सांगण्यावर माझा पूर्ण विश्वास आहे आणि त्यांच्या सांगण्याप्रमाणें मी आतां लवकरच या सर्व प्रकरणाचा अन् त्याच्याबरोबरच या दोघांचाहि निकाल लावून मनाची तळमळ शांत करणार ! इंदुमती ! राक्षसणी ! तुझें सुखाचें सर्वस्व आतांच्या आतां–या क्षणीं जगांतून नाहींसें करून तुलाहि त्याच्या मागोमाग मला पाठवितां येणार नाहीं का ? अशा पापी चांडाळांनां जीवंत ठेऊन पृथ्वीवर पापाचा भार वाढविण्यापेक्षां सरकार येतांच साधुमहाराजांनीं सांगितल्याप्रमाणें तडकाफडकी त्यांचा निकाल लावून टाकणेंच बरें. तोंपर्यंत पापिष्टांनों ! हवीतशी घ्या चैन करून ! कोण आहेरे तिकडे ? जा, तिला मी बोलावलें आहे ह्मणून सांग.

**इंदुमती**—( प्रवेश करून ) कां बोलवायला झालं ?

**मंदार**—अशी माझ्यासमोर येऊन उभी रहा पाहूं. मी कोण आहें असें तुला वाटतें ?

**इंदुमती**—अगबाई ! असं काय हें आज ? हें काय बाई भलतंच विचारणं ? आपण या इंदुमतीचे स्वामी अहांत हो ! झालं मनाचं समाधान ?

**मंदार**—मला असलीं नाटकी अन् नखऱ्याचीं भाषणें ऐकायला नको आहेत. मी तुझा पति आहें आणि पतीची आज्ञा मानणें हें स्त्रियांचें कर्तव्य आहे. आहे कीं नाहीं ?

**इंदुमती**—हो आहे–पण माझ्या या कर्तव्याला मी कधीं चुकलें आहें का ?

**मंदार**—अशी उडवाउडव नको आहे मला–मी विचारतों त्याचें सरळ उत्तर दे. पतीची आज्ञा मान्य करणें हें स्त्रियांचें कर्तव्य आहे कीं नाहीं ?

**इंदुमती**— हो, आहे.

**मंदार**—तर मग मला सांग, तूं आपलें कर्तव्य नीट बजावते आहेसना ? तुझ्या हातून आजपर्यंत स्त्रीधर्माला अनुचित असें कांहीं पातक झालें आहे कीं नाहीं ?

**इंदुमती**—या चरणांची सेवा एकनिष्ठपणानं करणं अन् पतिव्रताधर्मानं वागणं यालाच जर इकडून पातक असं ह्मणायचं असेल, तर अशीं पातकं माझ्या हातून दररोज शेंकडों घडत आहेत, हें मी कबूल करतें.

**मंदार**—अशीं छद्मी भाषणें मला नको आहेत. तुझी पतिनिष्ठा अन् पातिव्रत्य हीं किती प्रखर आहेत, तें मला चांगलें कळून चुकलें आहे. मी तर असें ह्मणतों, कीं, पतीशीं एकनिष्ठपणानें वागत आहों असें त्याला व जगाला दाखवून मनांतून त्याचा गळा कापण्याची इच्छा, इच्छा कसली? प्रत्यक्ष तयारी–करणाऱ्या कुलटेपेक्षां उघडपणानें जारकर्म करणारी स्त्री शतपट सद्गुणी! तिच्यावर तिच्या पतीचा विश्वासच मुळीं नसतो; अर्थात् तिच्याकडून त्याचा विश्वासघात होण्याचें कांहींच भय नसतें. त्याला सुखानें झोंप तरी घेतां येते.

**इंदुमती**—ह्मणजे? काय मी ऐकतें हें? इकडचा गळा कापायला–नको ग बाई ते शब्द! मी तयार झालें आहें, असं का इकडचं ह्मणणं आहे? महाराज, काय ह्मणतां हें आपण?—

[ चाल–संयाको संदेसा० ]

**सख्या न वदा कटु भाषणा। माना ही प्रार्थना ॥ ध्रु० ॥**
**दोष न गमतें प्रखर विषचि हें विकल करित मन्मना ॥१॥**
**श्रवण न करवे कठिण वचन हें द्रव हृदया लवहि ना ॥२॥**

**मंदार**—इंदुमती! तूं कितीहि कांगावा केलास, कितीहि नाटकी भाषणें बोललीस, तरी तुझें कपट मला कळलें आहे, ही तुझी खात्री असूं दे. आपला अपराध छपविण्याकरितां माझ्यापाशीं असे डांवपेंच लढविण्यापेक्षां जें तुझ्या हातून घडलें असेल तें कबूल कर. यांतच शहाणपण आहे.

**इंदुमती**—महाराज! असं नका हो निष्ठुरपणानं बोलूं! माझ्या हातून असा घोर अन्याय तरी काय झाला? कोणत्या अपराधाबद्दल अशा हृदयभेदक शब्दांनीं मला असं कठोर शासन भोगावं लागतं आहे?

**मंदार**—तुझ्या हृदयाचा भेद करतां येईल असे शब्द भाषेंत कोणते आहेत? कुलटे! हृदयाचा भेद व्हायला तुला हृदय आहे कुठें? अन् असलें तरी तें तुझ्या स्वाधीन कुठें आहे? प्रत्येक मनुष्याचें हृदय जर त्याच्या स्वाधीन असतें, तर पृथ्वीचा स्वर्ग बनला असता!

**इंदुमती**—खरंच, माझं हृदय माझ्या स्वाधीन नाहीं. तें आपल्या ठिकाणीं जडलं आहे. मग असं कां बरं मला व्यर्थ दुःख द्यायचं ?

**मंदार**—माझ्यामुळें तुला दुःख होत असेल, तर सुखाचा मार्ग पहाणें तुझ्या हातांतच आहेना ?

**इंदुमती**—माझा सुखाचा मार्ग–माझं सुखसर्वस्व–केवळ या चरणांवरच अवलंबून आहे.

**मंदार**—इंदुमती ! तूं समजतेस इतका मी भोळा नाहीं, समजलीस ? एकदा नीतीची भीति दूर केली, जगाची लाज सोडली, ह्मणजे शेंकडों चरण तुला सुख द्यायला तयार आहेत.

**इंदुमती**—महाराज ! आपण असं बोलून माझ्या हृदयाला घरे पाडावे असा माझ्या हातून अपराध तरी काय झाला ?

**मंदार**—अपराध काय झाला ? विचारायला लाज नाहीं वाटत ? जारिणी ! तुझीं एकएक अघटित निंद्य कृत्यें पाहून आकाशांत तेजोमय चंद्रसूर्यहि काळे ठिक्कर पडतील !

**इंदुमती**—महाराज ! हा देह आपल्या स्वाधीन आहे. आपण त्याला वाटेल तशा घोर यातना द्या. पण 'जारिणी' या शब्दानं मला संबोधून माझं हृदय विदारण करूं नका.

**मंदार**—वाहवा ! केवढी मोठी पतिव्रता ही ! सीतामंदोदरी वगैरे पूर्वीच्या साध्वी स्त्रिया तुझें हें अलौकिक पातिव्रत्य पाहून आश्चर्यानें अगदीं थक्क होऊन गेल्या असतील !

[ चाल–मन सुकरक मानिनी० ]

**वच नच वद पापिणी स्वधर्मत्यागिनी ससी ॥ ध्रु० ॥**
**निंद्य कृतिसि करुनि अशा उभय कुलां दूषविसी ॥ १ ॥**
**स्त्रीवृंदा लांछविण्या निर्मित कां विधि तुजसी ॥ २ ॥**

चल नीघ येथून—

**इंदुमती**—महाराज ! इथून निघून मी जाऊं तरी कुठं ? आपल्या चरणांचा आश्रय—माझ्या प्राणांचा आधार—सुटल्यावर ते या देहांत रहातील तरी कसे ?

**मंदार**—आणि रहावे, अशी माझी तरी कुठें इच्छा आहे ?—

[ चाल–हा संया तोरे पंयां० ]

**निष्पापा भू होई हो देह असा गत जरी ॥ध्रु०॥ कठिण करी जो मृदु हृदयाला । अनय शिकवि जो न्याय-पराला ॥ देह जरि न तो नष्ट जहाला । घडविल अमित दुरित नरकरीं ॥ १ ॥**

**इंदुमती**—आपणाला जर या दासीचा इतका कंटाळा आला असेल, तर महाराज! आपल्याच हातानें हिचा अंत करावा. ही घ्या आपली मान मी आपल्या चरणांवर ठेवितें. आपल्यासाठींच निर्माण झालेल्या या देहाचा शेवट आपल्याच हातून जर झाला, तर मी मोठ्या आनंदानं स्वर्गाला जाईन.

**मंदार**—तुझा हा सुंदर देह माझ्याचसाठीं, कीं, जगांतील प्रत्येक विलासी, रसिक मनुष्यांच्या उपयोगाकरितां निर्माण झाला आहे, हें, जारिणी, तुझें तुलाच चांगलें ठाऊक आहे ! कुलटे ! निर्लज्जे ! याक्षणींच तुझा अंत करायला पाहिजे होता–पण माझ्या हातून हें पुण्यकृत्य झालें, तर जगांतील हा प्रचंड पापभार मीं कमी केला, ह्मणून मला जें पुण्य लागेल, त्याचा कांहींतरी अंश तूं माझी धर्मपत्नी ह्मणून तुला मिळेल आणि तितक्याच पुण्याईच्या जोरावर तूं स्वर्गाला जाशील. पण तुझ्यासारख्या पापिणीच्या वास्तव्यानें तें पवित्र स्थल पापमय बनून जाऊं नये ह्मणूनच तुला मी जीवंत ठेवतों. पापिणी! अनेक तऱ्हेचे भयंकर हाल भोगूनच तुला शेवटीं मरण आलें पाहिजे. चल, सोड–सोड माझे पाय—

**इंदुमती**—नकाहो–असे मजवर निष्ठुर होऊं नका !

[ चाल–अदा जान लेती है० ]

**न कां हृदयिं ममता। कसे अदय होतां । अशी गांजितां कां वृथा दीन कांता ॥ ध्रु०॥ अशा निंद्य कृतिसी कधीं नाचरीलें । वृथा संशया कां मनीं ठाव देतां ॥ १ ॥ धरा मनिं सदयता न व्हा वश कलीला । नका पात्र करुं ही स्वकोपासि नाथा ॥ १ ॥**

ज्या कोणी मांगानं, चांडाळानं आपल्या मनांत मजविषयीं असा संशय भरविला असेल, त्या मेल्याचा सत्यानाश होईल; तो मेला रौरव नरकांत पडेल !

**मंदार**—शाबास शाबास ! तुमचें घोर कर्म त्यानें उघडकीस आणलें, म्हणून त्याचा सत्यानाश ! तुला आणि तुझ्या प्रियकराला लवमात्र दुःख होऊं नये, म्हणून त्याला नरकयातना !

**इंदुमती**—मला याहिपेक्षां यातना झाल्या तरी चालतील, पण माझे प्रियकर निरंतर पूर्ण सुखांत असोत.

**मंदार**—निर्लज्जे! नीतीची अन् पापाची भीति अगदींच कशी सोडलीस ही? एका क्षणापूर्वी पातिव्रत्याबद्दल मोठी घमेंड मारून माझ्या समक्ष आपल्या प्रियकराचें कल्याण चिंतितेस? जा–हो चालती येथून–तुझी ती पापमूर्ति माझ्या दृष्टीसमोरहि नको. (लाथेनें झिडकारितो.)

**रजनीकांत**—हां, हां, दादासाहेब काय करतां हें?

[ चाल–मेंडेरे यार हां० ]

**छळुं नका वृथा कांता, कां हें मन कठिन होइ सदय असुनि ॥ ध्रु० ॥ मृदुला मधुरा नव कलिका ही, कोपानलिं या जाइ जळुनि ॥ १ ॥ मुकतां वायां भवसौख्याला अर्धांगासी विकल करुनि ॥ २ ॥**

**मंदार**—तुला आली वाटतें आतां या कुलटेची दया? तरी मला वाटलेंच! सगळा चोरांचा अन् फसव्यांचा बाजार!

**रजनीकांत**—बाईसाहेबांचीच गोष्ट कशाला? कोणत्याहि अनाथ प्राण्याचा निष्कारण छळ होऊं लागला म्हणजे माझें मन द्रवून जातें.

**मंदार**—निष्कारण छळ? म्हणजे? तूं मलाच मूर्ख ठरवूं पहातोस काय? अरे, हिच्या घोर निंद्य कृत्यांबद्दल हिला योग्य शासन करण्याचें म्हणजे ही शिक्षा कांहींच नाहीं!

**रजनीकांत**—पण दादासाहेब! यांनीं असें अघोर पातक तरी काय केलें आहे?

**मंदार**—हिच्या पातकांचा उच्चार करणेंहि महापातक आहे. पण ती तुला चौकशी कशाला? मी हिचा पति आहें. स्त्रीच्या अपराधाबद्दल तिला शासन करण्याला पतीला अधिकारच आहे.

**रजनीकांत**—पण दादासाहेब! पत्नी खरोखर अपराधी असेल, तर तिला शासन करणें हें पतीचें कर्तव्य आहे. पण ती निरपराधी असतां केवळ पतिसत्ता गाजवायलाच निष्कारण तिचा छळ करणें हें आपल्यासारख्या विचारी आणि शहाण्या मनुष्याला योग्य आहे का?

**मंदार**—माझ्या कृतीच्या योग्यायोग्यतेचा विचार करायला मी समर्थ आहें. तूं मला तें शिकवायला नकोस. या पापिणीचा कैवार घेऊन मला लांब लांब उपदेशाच्या गोष्टी सांगतोस ?

**रजनीकांत**—अशा अनाथ दुर्दैवी प्राण्याचा कैवार कोण घेणार नाहीं ?

**मंदार**—अरे, ही दुर्दैवी नाहीं, चांगली सुदैवी आहे! मी हिचा नाथ जीवंत असतांहि ही जर 'अनाथ' असेल, तर हिला 'सनाथ' करायला वाटेचा चोरहि तयार होईल.

**रजनीकांत**—शिव शिव ! काय हें भलतेंच बोलणें दादासाहेब ? आपणाला ही दारुण शंका आली तरी कशी ?

**मंदार**—आतां शंका नाहीं; चांगली खात्री झाली आहे.

**रजनीकांत**—कसली खात्री झाली ?

**मंदार**—हीच कीं, माझ्यासमोर उभ्या असलेल्या निर्लज्ज जारिणीलाहि पातिव्रत्याचा टेंभा चांगला मिरवितां येतो.

**इंदुमती**—महाराज ! आपलेच का शब्द हे ? असले अभद्र शब्द बोलून आपल्या पवित्र जिव्हेला विटाळूं नका.

[ चाल–दरवजवामें० ]

**दूषवि निजकुल अनुचित कृति अशि मम करिं जरि**
**घडली ॥ ध्रु० ॥ मघवा ताडिल मम शिरिं चपला,**
**दंडिल यमही निजायुधें। निज नयनानलिं भस्म करुनि**
**मज शासिल शशिमौळी ॥ ४ ॥**

**मंदार**—अंः ! देवांत जर देवपण असतें, तर तुझ्यासारख्या पापिणी स्त्रियांनां त्यांनीं अगोदर जन्मालाच कां घातलें असतें ?

**रजनीकांत**—दादासाहेब ! आपण कांहीं ह्मणा, पण बाईसाहेबांच्या हातून असलें निंद्यकर्म झालें असेल, असें मला स्वप्नांतहि वाटत नाहीं.

**मंदार**—नाहींच वाटायचें ! ( स्वगत ) चोराला कधीं दुसऱ्या चोराच्या चोरीचें पातक वाटलें आहे ?

**रजनीकांत**—दादासाहेब !

[ चाल–हो सुन श्याम० ]

**होतां कोपवश कां तरी। कांहिं करा सुविचार हृदंतरिं ॥ ध्रु० ॥ कोणि न तिज आधार असे जनिं कोणि न आंवरि आश्रयदाता दूर करि जरी ॥ १ ॥ कोण देइ तिज सौख्य जगीं या कोण वांचवी प्राणसूत्रधर नाश जरि करी ॥ २ ॥**

**मंदार**—सर्व स्त्रीवर्गाला भयंकर कलंक लागेल, अशीं कर्में हिनें करावीं आणि मोठया कळवळयानें हिच्या दोषांवर पांघरूण घालण्यास तुह्मीं मला उपदेश करावा, हा मोठा चमत्कार आहे ! स्त्री स्वेच्छाचारी निघाली असतां, पुनः तिला 'प्रिया', 'प्रिया' ह्मणून लाळ घोटणारांपैकीं मी नाहीं!

**रजनीकांत**—आपल्या कानांत कोणीतरी संशयरूपी प्रखर विष ओतलें आहे हें खास ! दादासाहेब ! मी सांगतों याच्यावर विश्वास ठेवा.

**मंदार**—माझा आतां कोणावरहि विश्वास राहिला नाहीं;

**रजनीकांत**—काय ? मजवरहि आपला विश्वास नाहीं ?

**मंदार**—अलीकडे माझाच माझ्यावरचा विश्वास नाहींसा झाला आहे. मग इतरांबद्दलच्या विश्वासाची गोष्ट कशाला ?

**रजनीकांत**—मी जर आपल्या विश्वासाला अपात्र झालों असेन, तर मग आपल्या आश्रयाला राहून आपणाला सर्वदा संकटांत आणि संशयांत ठेवण्यांत काय अर्थ ?

**मंदार**—ठीक आहे. तुझा रस्ता तुला मोकळा आहे.

**रजनीकांत**—मजवरचाहि आपला विश्वास उडाला हा आपला दोष नव्हे. याला कारण माझें खडतर दुर्दैव ! ठीक आहे. आपल्या सूचनेप्रमाणें मी निघून जातों. आपल्या या अविचारी कृत्याचा आपल्याला पुढें पश्चात्ताप न होवो ह्मणजे झालें. ( जाऊं लागतो. )

**मंदार**—( विचार करून ) पण हो, चाललास कुठें ? त्या हल्ल्याचा अन् माझ्या चोरीचा तपास लागेपर्यंत माझ्या घरांतून कोणीहि हलतां कामा नये. चल, जा इथून—( रजनीकांत जातो. ) सगळा चोरांचा बाजार ! याला न जाऊं देण्याविषयीं मला अगोदर चांगला बंदोबस्त केला पाहिजे. [ जातो.

**इंदुमती**—देवा ! सदोदित दुःख भोगण्याकरितांच कां रे मला जन्माला घातलंस ?

[ चाल–गोरि कां चली० ]

**मदीय हें विफल जनन जाहलें ॥ ध्रु० ॥ नसुनी अन्याय कांहिं । अनुचित हा दोष येइ । विमल शील निंद्यतेसि पावलें ॥ १ ॥ मित्र मी खरी जयांसि । वैरिणी गमे त-यांसि । सौख्य भालिं का न मुळिंहि लिहियलें ॥ २ ॥**

[ तारिणी व चित्रांगदा येतात. ]

**तारिणी**—ताई ! किती वेळ ग मला तिष्ठत ठेवलंस? आतां येशील, मग येशील असं ह्मणून मी किती वेळ तरी तुझी वाट पहात होतें. शेवटीं मग कंटाळून इथं आल्यें.

**इंदुमती**—खरंच, वाड्यांत यायचं मी कबूल केलं होतं, पण त्याचं मला स्मरणच राहिलं नाहीं.

**तारिणी**—तें असो–पण ताई ! तुझी अलीकडे काय ही दशा झाली बाई ? तुला असं होतं आहे तरी काय ?

**इंदुमती**—माझं कर्म !

**तारिणी**—मंदारांच्या छळानं का तुझी अशी दशा झाली ही ? फारच बाई निर्दय मंदार !

**इंदुमती**—तिकडे कां बरं दोष देतेस ? मीं जर मागल्या जन्मीं कुणाला सुख दिलंच नसेल, तर मला तरी तें आतां कसं मिळेल ?

**तारिणी**—तूं कितीहि टाळाटाळ केलीस, तरी माझ्या लक्ष्यांत सारं कांहीं आलं आहे हो ! ताई, मंदारांचं ह्मणणं तरी काय आहे ?

**इंदुमती**—अग, शांतपणानं मला जर कांहीं सांगायला झालं असतं, तर माझ्या भाग्याला पारावार नव्हता !

**तारिणी**—त्यांच्या मनाप्रमाणं वागत जा.

**इंदुमती**—वेडे, मला काय सांगतेस हें ? आणखी कसं मनाप्रमाणं वागायचं तें मला कळत नाहीं.

**तारिणी**—तर मग मी तिकडून तरी मंदारांनां दोन उपदेशाच्या गोष्टी सांगवितें. खरंच ताई ! मला कांहीं गडे, तुझे हे हाल पहावत नाहींत.

**इंदुमती**—छे छे ! तारिणी, तूं या भानगडींत पडूं नकोस. त्याचा परिणाम तर चांगला व्हायचा नाहींच, पण मीं तुझ्याजवळ आपली निंदा केली, असं निमित्त लावून तिकडचा रोष मात्र मजवर अधिक होईल.

**तारिणी**—मग तूं मुकाट्यानं अशीच का हाल सोशीत राहणार ?

**इंदुमती**—पति ठेवतील तसं रहाणं हें आह्मां स्त्रियांचं कर्तव्यच आहे.

**तारिणी**—आणि स्त्रियांचा निष्कारण छळ करणं, हेंहि पुरुषांचं कर्तव्यच असेल ?

**इंदुमती**—पुरुषांच्या कर्तव्याची चर्चा आपण करणं बरं नाहीं. कांहीं झालं तरी आपणांला आपलं कर्तव्य केलंच पाहिजे. तारिणी, खरेंच सांगतें तुला—मला माझ्या जीवाचा अगदीं कंटाळा आला आहे.

**तारिणी**—चल, असं अभद्र बोलूं नये ताई !

**इंदुमती**—अग, यांत अभद्र काय आहे ?

[ चाल—महवारिया० ]

**तनुभार हा वाटे जगीं लेश सुख ना तरी। पुरवेल होई मदंत जरी। साहे न हें दुःख अंतरीं॥ध्रु०॥ स्त्रीपुरुषांची प्रीति-तरी ही तरावया भव-सिंधु सुखें। निर्मितसे प्रभु फुटे ती तरी विफलायु मानव जगावरी ॥ १ ॥**

तारिणी, माझं प्रेमाचं मनुष्य कोण आहे, ह्मणून मी त्याच्याकरितां जगण्याची इच्छा करावी ?

**तारिणी**—कोण आहे ह्मणजे ? मी नाहीं का तुझी प्रेमाची पाठीस पाठ लावून आलेली बहीण ?

**इंदुमती**—तारिणी ! तूं माझी प्रेमाची बहीण खरी, पण माझ्या दुःखाची वांटेकरीण तूं व्हावंस असं मी कसं ह्मणूं ? तूं पतीसह अक्षय सुख भोग; पण कायग तारिणी, माझ्याकरितां जर तूं वाटेल तें दुःख सोसायला तयार आहेस तर माझं एक काम करायला तूं नाहीं ह्मणणार नाहींस, अशी माझी खात्री आहे.

**तारिणी**—हें काय बाई तुझं विचारणं ताई ? तुझं वाटेल तें काम मी मोठ्या आनंदानें करीन.

**इंदुमती**—तारिणी, या हालांत मी एक दिवस परलोकीं गेलें तर—

[ चाल–खेलत नंदकुमार० ]

**हेतु हृदंतरिंचा। भगिनिचा पूर्ण करी अंतिंचा॥ ध्रु०॥**
**शुद्ध चरित मम पटवुनि पतिला संशय निरसीं तन्मतिचा॥ १॥**

**तारिणी**—ताई! असं निष्ठुरपणानं बोलून माझ्या हृदयाला कां बरं घरे पाडतेस? तुझ्याशिवाय मला मायेचं मनुष्य कोण आहे बरं?

**इंदुमती**—तारिणी! अगदींच ग कशी तूं वेडी ही? अग, या राज्याचे स्वामी तुझे प्रेमाचे आधार असतां, दुसरा आणखी कोणता आधार तुला पाहिजे? तारिणी, अशी रडतेस कां बरं? मी आजच का तुला टाकून जाणार आहें?

**तारिणी**—रडूं नको तर काय करूं? तूं असं आज हें भलभलतंच काय बोलते आहेस? तुझ्या मनांत आहे तरी काय ताई?

**इंदुमती**—खरं सांगूं तुला, तुला मुलगा झालेला केव्हां पाहीन असं मला झालं आहे. बरं, चलतेस ना आतां त्या साधुमहाराजांच्या मठाकडे?

**तारिणी**—चल.

[ जातात.

---

## प्रवेश पांचवा.

[ **स्थल**—रस्ता. दामिनी, सदानंद, विश्वानंद, प्रेमानंद येतात. ]

**दामिनी**—फार चांगलं! तुह्मी तिघे इतके पटाईत असतां त्या रजनीकांतानं एकाव्यानंच तुह्माला पळवून लावावं?

**सदानंद**—अरे, आह्मांला त्या वेळीं कांहीं चमत्कारिक भुरळ पडली ह्मणून, नाहीं तर त्या रजनीकांताला का आह्मी भीक घालणार होतों? खरें ह्मणशील तर आमचेच लोक मारे आरडाओरड करीत होते. पण त्या रजनीकांताला पाहिल्याबरोबर आह्मांला वाटलें, कीं, त्याचेच असंख्य साथीदार ओरडत येत आहेत.

**दामिनी**—कां विश्वानंद! तुह्मी नेहमीं मोठया बहादुरीच्या गप्पा ठोकीत असतां; पण ऐनवेळीं फोडलात कीं नाहीं भ्रमाचा भोंपळा?

**विश्वानंद**—अरे जा, तूं निवळ पोर आहेस! अरे, असले छपन्न रजनीकांत आले असते तरी मीं त्यांनां दाद दिली नसती; पण हा सदानंद आपला त्यावेळीं सारखा पळतच सुटला, ह्मणून मी त्याच्या मागून सहज गेलों इतकेंच!

दा. गा. ३३८८

**प्रेमानंद**—अन् माझीसुद्धां तुमच्याप्रमाणेंच स्थिति झाली. तुह्मी दोघे पळतां आहां असें पाहून काय प्रकरण आहे तें पहावें, ह्मणून मीहि सहज पळत सुटलों. नाहींतर तेव्हांच त्या रजनीकांताला स्वर्गाची वाट दाखविली असती !

**दामिनी**—त्याला तुह्मी स्वर्गाची वाट दाखविली असतीत कीं नाहीं कोण जाणे ! पण तुह्मांला तो स्वर्ग दाखवील ह्मणून तुह्मीं मात्र आपली वाट धूमधडाक सुधारलीत !

**विश्वानंद**—बरें बुवा ! तसें कां होईना ! पण त्या बाईला ठार करून द्रव्य किती लुंगावलें ? हा तरी आमचा पराक्रम तूं कबूल करशील ?

**प्रेमानंद**—अन् मीं त्या पोराला उडविला कीं नाहीं पार ?

**दामिनी**—त्या निर्बल प्राण्यांवर हात चालविलात यांत काय मोठा पुरुषार्थ केलात ? बरं, पण रजनीकांत हा कोणाचा कोण ? आहे तुह्माला माहिती ?

**प्रेमानंद**—अरे, त्याची चौकशी कोण लेक करायला बसला आहे ? असल्या चौकशाबिवकशा करण्याचें काम गुरुजींचें ! त्यांनीं छूं ह्मटलें कीं आह्मी तुट्टून पडलों !

**विश्वानंद**—रजनीकांत कोण आहे तें मी सांगतों तुला. त्याच्याबद्दल गुरुजींच्या गोष्टी चाललेल्या मीं त्या दिवशीं सहज ऐकिल्या. तुला ते मंदार माहित आहेत कीं नाहीं ? रजनीकांत त्यांनां समुद्रांत बुडत असलेला सांपडला. त्याला आप्त मित्र कोणी नाहीं. त्याला काय ती एक बायको होती, तीहि ह्मणे त्याचें जहाज फुटलें तेव्हां समुद्रांत बुडाली !

**दामिनी**—( स्वगत ) देवा, हे रजनीकांत माझे प्रियकर नसतीलना ? ( उघड ) तो रजनीकांत दिसण्यांत कसा आहे हो ?

**विश्वानंद**—चांगला धिप्पाड आहे.

**दामिनी**—तसें नव्हे हो, तो स्वरूपानें कसा काय आहे ?

**प्रेमानंद**—कमलाकर ! तूं अगदीं वेडगळच दिसतोस मला. अरे, आह्मी का बायका आहोंत, ह्मणून त्याच्या स्वरूपाकडे आमचें लक्ष्य जाणार ? पण कायरे, याची तुला चौकशी कशाला ?

**दामिनी**—( हंसून ) अहो उगीच—तुमच्यासारख्या शूरांनां पोबारा करायला लावणारा मनुष्य कसा आहे, हें सहज विचारलं तुह्मांला इतकंच.

... ३१८ स, नारायण पेठ, पुणे

**विश्वानंद्**—तूं कांहीं आह्मांला इतकें हिणवूं नकोस. आमचा बेत ढांसळून पाडल्याबद्दल त्याला चांगलें शासन होणार आहे.

**दामिनी**—कोण करणार त्याचें शासन ?

**विश्वानंद्**—अरे, आपले गुरुजी ! ते मंदाराच्या मनांत कसकसा संशय भरवीत आहेत, तें ऐकलें नाहींस वाटतें ?

**दामिनी**—त्यामुळं त्याचं शासन काय होणार आहे ? फार झालं तर मंदार त्याला घरांतून घालवील.

**प्रेमानंद्**—अरे, घरांतून घालवून देऊन बरा स्वस्थ बसेल ? आह्मीं जे खून केले, ते रजनीकांतानेंच करविले असें सिद्ध करायचा गुरुजींचा घाट आहे. मग खुनाचा आरोप नाहीं का त्याच्यावर शाबीत होणार ?

**दामिनी**—गुरुजींच्या अन् तुमच्या युक्त्या तर मोठ्या अघटित खऱ्या ! पण त्या बिचाऱ्याचा प्राण घेऊन तुमचा फायदा काय ?

**विश्वानंद्**—अरे, गुरुजींनां मंदाराच्या कनककांतेची प्राप्ति !

**दामिनी**—शाबास ! तुमचे गुरुजी मोठे साधु खरे ! इकडे तारिणीला फसवून ते तिच्यावर दुर्धर प्रसंग आणणार आहेत; आणि इंदुमतीसाठीं त्या बिचाऱ्या रजनीकांताचा नाहक प्राण घ्यायचाहि त्यांनीं बेत केला आहे, असं तुह्मीं सांगतां ! अरेरे !

[ चाल—मेरे दर्दे इदरकी० ]

**मुळिं दया हृदया शिवे न कशी । कोमलता लोहास**
**जशी ॥ ध्रु० ॥ दीन करितसां जगीं कितिक योषितां-**
**सीं । वधितां बहुलां मृदुलां शिशुंसी ॥ १ ॥ करुण**
**शोक आणि न या द्रव कसा मनासी । विटलांत न**
**काय अशा कृतिसी ॥ २ ॥**

**प्रेमानंद्**—अरे, आह्मी चोर झालों तरी मनुष्यच आहोंतना ? एखादवेळ तरी आह्मांला वाईट वाटल्याखेरीज राहील का ? पण त्या धनाकडे पाहून आह्मांला दयामाया सर्व विसरावी लागते.

**दामिनी**—आजपर्यंत तुह्मीं धन तरी किती जमा केलं आहे ?

**प्रेमानंद्**—आह्मीं रगड धन जमविलें असून त्याची आतां वांटणी होणार आहे. ती झाली, कीं, एकेकाच्या वांटणीला सपाटून पैसे येतील. मग हा सुळाव-

रच्या पोळीचा धंदा करतो कोण ? वांटणीला आलेलें भरपूर द्रव्य घेऊन त्याच्या साहाय्यानें आह्मी बडे लोक बनणार आहों.

**दामिनी**—काय हें तुमचें वेड ? अहो—

[ चाल–मने साहाय्य करसे० ]

**जगिं निंद्य पथ असा आक्रमुनी। पद थोर मिळविलें कोणीं। मुळिं विष-तरु जो मधु-रस कैसा येइ तया-पासोनी ॥ ध्रु० ॥ वसनीं अग्नि करीं रवितेज न लपत कदाही जेवीं। प्रकट होतां दुरित तेवीं काय धना मग मान जनीं ॥ १ ॥**

**विश्वानंद**—खरें सांगायाचें ह्मणजे आतां आह्मांला या धंद्याचा अगदीं वीट येऊन गेला आहे. गुरुजींनीं आमच्या द्रव्याचा भाग आह्मांला दिला, कीं, याला ठोकलाच आह्मीं रामराम !

**दामिनी**—तुमचे बिलंदर गुरुजी तुह्मांला तुह्मीं जमविलेल्या द्रव्याचा भाग देतील कीं नाहीं याची मला जबरदस्त शंका आहे. आपल्या पातकाचा भाग मात्र तुह्मांला ते यथास्थित देतील.

**प्रेमानंद**—छेरे ! गुरुजीहि या धंद्याला विटले आहेत. आतां ही भानगड काय ती शेवटचीच आहे. कारण, पुनः या स्त्रीविषयक लचांडांत पडायचें नाहीं असा गुरुजींनींहि निश्चय केला आहे.

**सदानंद**—काल तर ते निक्षून ह्मणाले, कीं, तारिणीचें व इंदुमतीचें हें योजलेलें काम आटोपलें, कीं, पुनः कोणत्याहि स्त्रीचें मुखावलोकन ह्मणून करायचें नाहीं !

**दामिनी**—अहो, तुमच्या गुरुजींचा हा बकासारखा साधुपणा एखादी मीनाक्षी दिसली नाहीं तोंपर्यंतच टिकायचा ! कामिजनांच्या इंद्रियनिग्रहाबद्दलच्या आणि द्रव्यलोभी माणसांच्या निरिच्छतेसंबंधाच्या कोणत्याहि भाषणावर कधींहि विश्वास ठेऊं नये. तुमचं धन तुमच्या दृष्टीस तरी पडतं कीं नाहीं याचीच मोठी शंका आहे.

**सदानंद**—ह्मणजे ? गुरुजी आह्मांला फसवतील असें का तुला वाटतें आहे कमलाकर ? छट्–अरे, हा तुझा निव्वळ भ्रम आहे, भ्रम !

**दामिनी**—भ्रम आहे खरा, पण तो माझा नव्हे–तुमचा आहे !

**प्रेमानंद**—तुझें हें बोलणें आह्मांला पटावें कसें? आंधळ्याला जसें सगळें जग आंधळें दिसतें, तसें लबाडाला आपल्याप्रमाणेंच सर्व माणसें लबाड दिसतात; यांत काय तें समज.

**दामिनी**—तुह्मीं मला लबाड ह्मटलंत, तरी त्याचं मला वाईट वाटत नाहीं. पण तुह्मी त्या अस्सल लबाडावर विश्वास ठेवून भोळेपणानं फसतां आहां, ह्मणून मात्र मला फार वाईट वाटतं.

**विश्वानंद**—इतक्या सहजासहजीं फसायला आह्मी कांहीं वेडे नाहीं समजलास? गुरुजींची जरा लबाडी आमच्या नजरेला येऊं दे, कीं, दाखवूं त्यांनां त्यांच्याच शिकवणीचा प्रताप! गुरूची विद्या गुरूलाच फळविली नाहीं, तर काय सांगशील तें ऐकूं.

**दामिनी**—मला नाहीं हें तुमचं ह्मणणं खरं वाटत! तुह्मांला तसें करतां येणं अगदीं अशक्य आहे.

**प्रेमानंद**—कां बरें? आह्मीं कांहीं गुरूजींजवळ मोक्षसाधनाकरितां राहिलों नाहीं.

**सदानंद**—द्रव्याकरितां तर आह्मी त्यांनां मधमाशांप्रमाणें चिकटून आहों. आमचा भाग गुरुजी देत नाहींत कोठपर्यंत तें तरी पाहूं! चांगलें चोपून घेऊं त्यांच्यापासून आमचें द्रव्य!

**दामिनी**—बरं, मी विचारतों, तुमची त्या भामट्यानं पूर्ण निराशा केली तर तुह्मी त्याचं काय शासन कराल?

**विश्वानंद**—पण तुझें हें ह्मणणें खोटें झालें, तर आधीं तूं काय करशील तें आह्मांला सांग.

**दामिनी**—जगांतील नीति ठार झाली असें समजून तुमच्यासारखा अट्टल गळेकापू हरामखोर चोर बनेन!

**सदानंद**—ठीक आहे. आणि तुझें ह्मणणें खरें झालें तर आह्मीहि हा धंदा सोडून तुझ्या आज्ञेप्रमाणें वागूं. मग तर झालें?

**प्रेमानंद**—पण काय रे कमलाकर! तुला गुरुजींविषयीं इतका संशय कां येतो?

**दामिनी**—तुह्मांला ते कुत्र्यासारखे कामाला पिटाळून लावतात आणि मी असतों त्यांच्याजवळ; ह्मणून त्यांचे बेत तुमच्यापेक्षां मलाच सर्व कळतात.

**विश्वानंद**—काय ह्मणतोस? आह्मांला फसवायचा त्यांनीं खराच बेत केला आहे? ठीक आहे बच्चाजी! आतां त्यांच्या चांगलाच पाळतीवर रहातों! पण जर का हें खोटें झालें, तर तूं त्यांच्याविरुद्ध आमचे कान फुंकलेस हें त्यांनां सांगून तुला चांगलें शासन करवूं.

**दामिनी**—ठीक आहे, कबूल-पण त्या पहा राणीसाहेब मठांत आल्या. ( स्वगत ) मला आतां माझ्या कामाला सावधपणानं लागलं पाहिजे.

[ सर्व जातात.

---

## प्रवेश सहावा.

[ **स्थल**—पुरंदराचा मठ. पुरंदर, तारिणी, इंदुमती व दामिनी बसलीं आहेत. ]

**पुरंदर**—तुह्मांला बराच वेळ लागला, तेव्हां मला वाटलें, कीं, तुमचा बेत बदलला असावा. हो, बोलूनचालून तुह्मीं बायका! पहिल्या प्रतीच्या भित्र्या आणि अगदीं चंचल!

**तारिणी**—आह्मांला किंचित् उशीर झाला खरा. दुसरं एखादं काम असतं तर माझ्या भित्रेपणामुळं बेत बदलण्याचा संभव होता. पण या सवतीमत्सरानं मला धीट केलं आहे.

**पुरंदर**—तसें होणें अगदीं स्वाभाविक आहे. बायकांचा स्वभाव ह्मणजे अगोदर मत्सरी; त्यांतून सवतीचा मत्सर करण्यासारखी त्यांनां जगांत दुसरी सुखाची गोष्ट नाहीं! सवतीचा स्त्रियांनां एवढा मत्सर कां वाटावा, तें त्यांचें त्यांनांच ठाऊक!

**तारिणी**—आपल्या मालकीच्या वस्तूचा उपभोग दुसऱ्याला घेतांना पाहून कोणाच्या अंगाची लाही व्हायची नाहीं?

**पुरंदर**—वाहवा! अशी दुसऱ्यांनां मोह पाडणारी सुंदर वस्तु आपणाजवळ आहे, या गोष्टीचा बायकांनां अभिमान वाटावा कीं मत्सर?

**इंदुमती**—महाराज मोठे विनोदी दिसतात हो!

**पुरंदर**—तुमच्यासारख्या संसृतिमाग्न जनांचें मनोरंजन करण्याकरितां आह्मांला असा विनोद कधीं कधीं करावा लागतो. तुह्मां श्रृंगारसरितांपुढें जर आह्मी गहन वेदांत सांगूं लागलों, तर तुह्मांला त्याचा कंटाळा येईल आणि अर-

सिक व खाष्ट पतीपुढें अशा तरुणींच्या लीला व्यर्थ होतात, तसा तुह्मांपुढें आमचा वेदांतहि व्यर्थ होईल! तुह्मी येथल्याच रहाणाऱ्या वाटतें?

**इंदुमती**—मी हिची वडील बहीण. याच शहरांत आह्मी रहातों.

**तारिणी**—इथं मंदार ह्मणून सरदार आहेतना? त्यांची ही पत्नी. हिचें नांव इंदुमती.

**पुरंदर**—होय का? तर मग फार चांगली गोष्ट मला समजली. मंदार तर आमचे परम मित्र. त्यांच्या या अर्धांगी! तेव्हां आह्मालाहि या मित्रस्थानींच आहेत! मंदारांचें आमच्या मठांत नेहमीं येणेंजाणें असतें.

**तारिणी**—होय का? तर मग ताई आज इथं आली होती, हें त्यांनां कळवायचं नाहीं हो! त्यांनां हें कळलं तर ते उगीच रागावतील ताईवर!

**पुरंदर**—मी कशाला मंदारांनां कळवायला जातों आहें? तुह्मीं काय, या काय आणि मंदार काय, आह्मांला सर्व सारखेच! पण या गोष्टींत यांनां इतकें भिण्यासारखें काय आहे? आमचे मंदार कांहीं साधुसंतांच्या दर्शनालाहि जाऊं नको, असें ह्मणणाऱ्या धर्मद्वेष्ट्यांपैकीं नाहींत.

**तारिणी**—आपणासारख्या साधुपुरुषापाशीं उघड सांगायला कांहीं हरकत नाहीं. नव्हे, मुद्दाम मी ताईला यासाठींच माझ्याबरोबर इथं आग्रहानं आणलं आहे. मंदार इतरांशीं जसे सदय अंतःकरणानं वागतात, त्याच्या अगदीं उलट आपल्या पत्नीशीं त्यांचं वर्तन आहे. त्यांच्याकडून माझ्या ताईचे जे हाल होतात, ते माझ्यानं सांगवतहि नाहींत. आपण या गोष्टीला कांहीं तरी उपाय सुचवाल या आशेनं मी आज ताईला आपणांकडे आणलं आहे. माझी एवढीच इच्छा आहे कीं, मंदारांनीं आपल्या धर्मपत्नीशीं प्रेमानं वागावं. महाराज! माझ्या ताईबद्दल त्यांच्या मनांत गाढ प्रेम उत्पन्न होईल अशी एखादी त्यांनां मोह पाडणारी वस्तु हिला द्या किंवा या गोष्टीला कांहीं उपाय तरी आह्माला सांगा.

**पुरंदर**—याच स्वतः प्रत्यक्ष मोहिनी असतांना दुसरी मोह पाडणाऱ्या वस्तूची यांनां जरूर काय?

**इंदुमती**—आपल्यासारख्या सरळ अन्तःकरणाच्या महात्म्याला असं वाटणं साहजिकच आहे. पण खरा प्रकार अगदीं याच्या उलट आहे. मी तिकडे अगदीं वैरिणीप्रमाणं वाटतें.

**तारिणी**—लग्न झाल्यापासून ताईवर मंदारांचं आधीं बेताचंच प्रेम होतं म्हणा! पण अलीकडे तर त्यांच्या प्रेमाचा झरा अगदींच शुष्क झाला आहे.

**इंदुमती**—अलीकडे तर मी तिकडे अगदीं दृष्टीसमोर नकोशी झालें आहें. आतांशीं माझ्याशींच असं चमत्कारिक वर्तन झालं आहे असें नाहीं. पण अलीकडे तिकडचा स्वभावच कांहीं चमत्कारिक झाला आहे. माझा कैवार घेऊन ते रजनीकांत केव्हां केव्हां तिकडे शब्द टाकतात, म्हणून त्यांनांहि घरांतून जायाला आज सांगणं झालं.

**पुरंदर**—(स्वगत) असें तर झालेंच पाहिजे. नाहीं तर मग माझें कौशल्य तें काय? (उघड) रजनीकांत हे कोण?

**इंदुमती**—कांहीं दिवसांपूर्वी वादळांत सांपडलेलं एक जहाज फुटून समुद्रांत बुडत असतां एका अनाथ प्राण्याला तिकडून वांचविणं झालं, ते हे रजनीकांत.

**पुरंदर**—मंदारांनीं सदया अन्तःकरणानें ज्यांनां जीवदान दिलें, त्यांच्याशीं आतां असें कठोर वर्तन करण्याचें कारण काय?

**इंदुमती**—कारण माझं दुर्दैव! दुसरें काय? नुकतीच आमच्या इकडे मोठी चोरी झाल्यापासून तिकडची चित्तवृत्ति अगदीं चमत्कारिक झाली आहे. माझ्याबद्दल मला कांहीं इतकं वाईट नाहीं वाटत—पण त्या रजनीकांतांबद्दल मला फार कींव येते. ते बिचारे आधींच पत्नीच्या विरहानं दुःखी असतात, त्यांत आणखीं या यातना!

**पुरंदर**—(स्वगत) काय विलक्षण स्त्रीचरित्र हें! हिला खरोखर रजनीकांताविषयीं कळकळ वाटत आहे; पण पतिप्रेमासाठीं आपण अगदीं उत्कण्ठित होऊन गेलों आहों, असेंहि ही दाखविते! (उघड) मी तुह्माला असें विचारतों, मंदारांचें जर तुमच्यावर प्रेम नाहीं, तर तुह्मी तरी त्यांच्याविषयीं इतकें अगत्य अन् प्रेम कां बाळगतां, तें मला कळत नाहीं!

**इंदुमती**—हें काय बाई भलतंच विचारणं? ते माझे पति आहेत. त्यांच्या प्रेमाचं मी अगत्य बाळगूं नये, तर बाळगावं तरी कुणाच्या प्रेमाचं?

**पुरंदर**—वहावा! मंदार तुह्मांला अगदीं कस्पटाप्रमाणें तुच्छ मानतात आणि तुह्मी त्यांनां देव मानून, त्यांच्याकडून होणारे हाल सोसून त्यांच्या प्रेमलाभाची इच्छा करतां, यांत कांहीं मला फारसें शहाणपण दिसत नाहीं बुवा! पुरुषांनीं जर आपला धर्म सोडला, तर स्त्रियांनीं तरी तो पाळलाच पाहिजे असें

कांहीं धर्मशास्त्र नाहीं. मनुष्यानें नेहमीं जशाला तसें वागलें पाहिजे ! "बिल्वं बिल्वेन ताडयेत्" असें धर्मशास्त्र सांगतें.

**इंदुमती**—छेग बाई ! आह्मांला ज्या कांहीं पुराणांतरींच्या पतिव्रता स्त्रियांच्या गोष्टी ठाऊक आहेत, त्या तर धडधडीत आपल्या ह्मणण्याच्या विरुद्ध आहेत. नलानं दमयंतीचा अन् रामानं सीतेचा त्याग केला, पण त्या महासाध्वींनीं पतिव्रताधर्म यत्किंचित्‌हि सोडला नाहीं. ह्मणूनच त्यांची आज शेकडों वर्षे पृथ्वीवर कीर्ति गाजत आहे.

**पुरंदर**—हेंच तें तुह्मा बायकांचें अज्ञान ! पुराणांतल्या स्त्रियांच्या चरित्रांचें खरें रहस्य तुह्मांला काय कळणार ? अहो, या पतिव्रतांचे पति त्यांच्या मनाप्रमाणें होते. तुमच्यासारखी त्यांची स्थिति असती, तर त्यांनींहि त्यांच्याशीं असें वर्तन खास केलें नसतें !

**दामिनी**—( स्वगत ) बाई ! त्या सती स्त्रियांची गोष्ट या पापी चांडळापुढं कशाला काढतेस ? हा अधमाधम आपल्या ह्मणण्याच्या पुष्टीसाठीं त्या साध्वींवरहि वाटतील ते दोष लादायला कमी करायचा नाहीं. पुराणें खोटीं ठरवील, काय वाटेल तें करील. काय लबाड आहे ! हिच्या पतीच्या मनांत आपणच तसा संशय भरवून पुनः हिला असा उपदेश करण्याचीहि याची तयारीच !

**इंदुमती**—महाराज ! आपण माझ्या मनाची परीक्षा पहात अहां, असं मला वाटतं; नाहींतर आपणांसारख्या महात्म्यांच्या तोंडांतून असले घाणेरडे शब्द निघतेना !

**दामिनी**—( स्वगत ) शाबास ! चांगले कान उपटलेस गाढवाचे !

**पुरंदर**—( स्वगत ) अरे, ही तर बिथरल्यासारखी दिसते. जरा आतां बेतानें घेऊन आपण भाषणाचा ओघ बदलावा, हें बरें. ( उघड ) इंदुमतीबाई ! धन्य आहे तुमच्या पातिव्रत्याची ! मंदार तुमचा संशय घेतात, तो कितपत खरा आहे, हें पहाण्याकरितां मुद्दाम मी असें बोललों. पण तुमच्या पातिव्रत्याबद्दल आतां माझी पूर्ण खात्री झाली. आतां कांहीं काळजी करूं नका. तुमच्यासाठीं मंदारांनां मी चार उपदेशाच्या गोष्टी सांगून पहातों. तुमची पतिनिष्ठा पाहून मी तुमच्यावर प्रसन्न झालों आहें. मागा आतां तुह्माला काय पाहिजे तें.

**तारिणी**—( स्वगत ) आतां कुठं माझ्या जीवांत जीव आला. तरी ह्मटलं महाराज आज असं भलतंच काय बोलत आहेत !

**इंदुमती**—महाराज ! मला दुसरं कांहीं नको. केवळ पतिप्रेमाची भिक्षा मला घाला.

**पुरंदर**—ठीक आहे. तुमची इच्छा सफल होण्याकरितां मी तुह्मांला एक भस्म देतों. तें पाण्यांत घालून मंदारांनां प्यायला द्या. ह्मणजे तुमची कार्यसिद्धि हटकून झालीच ह्मणून समजा. मात्र यांतलें अवाक्षरहि कोणाला कळतां कामा नये हो ! जर तुमच्याकडून कळलें, तर तत्क्षणीं तुमच्यावर भयंकर प्रसंग गुदरेल. बरें, आतां तुह्मी जा. राणीसाहेबांच्या यज्ञाला आतां प्रारंभ करावयाचा आहे. तुमचें भस्म मी चित्रांगदेबरोबर पाठवून देतों.

**इंदुमती**—आपल्या आशीर्वादानं तरी ह्यिच्या मनासारखं होऊं द्या ! तारिणी, येतें हं मी. [ जाते.

**पुरंदर**—राणीसाहेब, तुह्मी त्या पलीकडच्या खोलींत चला—हा मी आलोंच तुमच्या मागोमाग.

[ दामिनी व पुरंदर जातात.

**तारिणी**—चित्रांगदे, मला बाई एकटीला तिथं जायला भीति वाटते. तूं चल माझ्याबरोबर.

**चित्रांगदा**—बाईसाहेब ! भय वाटायला हें का चोराभामट्याचं घर आहे ? इथं चांगली साधुसंतांची वस्ती. चला, आपण जरा पुढं व्हावं; इंदुमतीबाईचा प्रसाद घेऊन ही मी आलेंच. [ तारिणी जाते. पुरंदर येतो.] कां गुरुमहाराज, झालंना तुमचं काम ? आतां बक्षिसाचं कसं काय ? आणा पाहूं झटपट !

**पुरंदर**—बक्षिस काय, वाटेल तेव्हां तयार आहे. सांग पाहूं, काय काय दागिने तुला पाहिजेत ? हो, ह्मणजे मागाहून उगीच नको—ठुशी, सरी, टिका—

**चित्रांगदा**—मला नाहीं तें कुत्र्याप्रमाणं गळ्यांत पट्टे घालणं आवडत ! त्यापेक्षां आपला मोत्यांचा कंठाच बरा !

**पुरंदर**—अन् तो नाहीं वाटतें कुत्र्याचा पट्टा ? बरें, ठीक आहे. मला काय ? एक मोत्यांचा कंठा ! ( लिहितो. )

**चित्रांगदा**—पण त्याच्याबरोबर एक तन्मणीहि पाहिजे हो.

**पुरंदर**—अस्सें. ठीकच आहे ! तुझी मान जरा उंच आहे, तीहि या दागिन्यांनीं भरली ह्मणजे बरी दिसेल आणि त्या दागिन्यांनां तुझ्या बगळ्यासारख्या गळ्यांत जागाहि मुबलक मिळेल. बरें, तनमणी. अन् कानांत सुंदर वेलांचे काप—

**चित्रांगदा**—इश्श ग बाई! मला नकोत ते काप! गौरीपुढं लामणदिवे ठेवल्यासारखे दिसतात ते! त्यापेक्षां कानांत कुडीं, बुगड्या, बाळ्या तरी कांहीं बऱ्या दिसतात.

**पुरंदर**—माझें काय जातें? तेंहि घालतों यादींत—कुडीं, बुगड्या, बाळ्या. आतां बिंदीबिजवरा, मुदकेवडा—

**चित्रांगदा**—बिंदीबिजवरा ह्मणजे पारध्यांचा तिरकमठाच तो! त्यामुळं मस्तक सुशोभित न दिसतां तिरकमठयाच्या कैचींत सांपडून विशोभित मात्र दिसतं. मला हे दागिने मुळींच आवडत नाहींत. त्यापेक्षां सुबकसं गुलाबाचं फूलच—

**पुरंदर**—गुलाबाचीं फुलें इथल्या बागेंत का कमी आहेत? पण अस्सलापेक्षां नक्कलच तुह्मां बायकांनां प्रिय! बरें, माझें काय जातें? गुलाबाचें फूल. आतां हातांत काय? वांकी, बाजूबंद, पाटल्या, तोडे, बांगड्या-

**चित्रांगदा**—इश्श मेलं! हे दागिने घालण्यापेक्षां सोन्यानं हातच मढवून काढावे! मला आपले तुह्मी सर्व दागिने जडवाचे करून द्या. हो, पण अगदींच विसरलें! या दागिन्यांबरोबर एक काजळी बुट्याचा शालूहि पाहिजे मला.

**पुरंदर**—ह्मणजे जवळजवळ तारिणी राणीच बनून राजाला भुलवायचा विचार आहे वाटतें तुझा?

**चित्रांगदा**—काय तरी हें बोलणं? मी नांवाची चित्रांगदा आहें हो–पण हे सर्व दागिने आणि शालू तुह्मी मला कधीं देणार?

**पुरंदर**—अग, मी आतांसुद्धां दिले असते. आहे काय त्यांत? पण या चोरांची भीति आहे ना? मी आतां तुला दागिने दिले अन् यांनीं तुझ्याकडून ते हिसकावून घेतले, मग तूं काय करणार? तूर्त ही यादी असूंदे तुझ्याजवळ.

**चित्रांगदा**—होयग बाई! खरंच! पण ही लफंगी मंडळी आपल्याजवळ असेपर्यंत ही भीति नेहमीं आहेच कीं! त्यांनां एकदा त्यांची वांटणी देऊन त्यांची ब्याद कां टाळीत नाहीं?

**पुरंदर**—त्यांनां वांटणी दिली ह्मणजे तुझ्या वांटणीला या दागिन्यांपैकीं कांहीं यायचें नाहीं, त्याची काय वाट? या चोरांनां कोंकलत ठेवून आजपर्यंत जमविलेल्या सर्व धनाचे आपण दोघेंच भागीदार होऊं या. यांत वाईट काय आहे?

**चित्रांगदा**—तसं कांहीं वाईट नाहीं. पण हें सारं जमणं मात्र कठिण दिसतं. कारण, कसे झाले तरी ते आपल्याच सहवासांत तयार झालेले आहेत !

**पुरंदर**—त्याचा मीं विचार काय तो पूर्वीच करून ठेवला आहे. मंदाराला जें मीं हें जालीम विष दिलें आहे, त्याचाच उपयोग तिकडे करणार, यांत काय तें समज ! धनावर लोळण्याची त्या गुलामांची इच्छा, धन ठेवलेल्या तळघरांत त्यांनां लोळवून मी पूर्ण करणार ! तूं मात्र मला या कामांत अंतःकरणापासून मदत केली पाहिजेस, चित्रांगदे !

**चित्रांगदा**—मी काय मदत करणार आहें आपणाला ?

**पुरंदर**—हें विष इंदुमतीला नेऊन दे. पण याबद्दल कसला थांग मात्र लागूं देऊं नको हो ! मग पुढें त्यांनां कसकसें गोत्यांत आणायचें, तें मी तुला सांगेन.

[ जातात.

---

## प्रवेश सातवा.

[ **स्थल**—तेंच. दामिनी, सदानंद, प्रेमानंद येतात. ]

**प्रेमानंद**—सोड, सोड मला; आतां जाऊन त्याला दाखवतों चांगला हात !

**दामिनी**—अरे हो ! जरा धीरानं घे. इतका उतावीळपणा कां ?

**प्रेमानंद**—कां ह्मणजे ? स्वतःची मान नेहमीं तरवारीच्या धारेखालीं ठेवून आह्मीं निढळाच्या घामानें द्रव्य मिळविलें असून, हा बदमाष आह्मांला विष घालून तें सर्व लाटणार ? हा अन्याय आह्मांला कसा सहन होईल ?

**विश्वानंद**—अरे, पण असा मोठ्यानें ओरडूं नको. त्या चांडाळाच्या कानांवर हें गेलें तर द्रव्य राहील बाजूलाच, पण आह्मांला तो भयंकर गोत्यांत मात्र घालील !

**सदानंद**—अरे जा ! त्याची काय माय व्याली आहे आह्मांला गोत्यांत घालायची ! आह्मी कांहीं मेलेल्या आईचें दूध प्यायलों नाहीं समजलास ? तुझ्या अंगांत करामत अन् हिंमत नसेल तर पाहिजे तर त्याची तूं भीति धर !

**विश्वानंद**—अरे, मी त्याला तिळमात्र भीत नाहीं. पण एकदम एकेरीवर यायचें कारण नाहीं. मी ह्मणतों, प्रथम आपण सामोपचारानें त्याच्याजवळ

आपला हिस्सा मागूं या. त्यानें तो नीटपणें दिला नाहीं, तर शेवटचा उपाय हा आहेच.

**प्रेमानंद**—पण मी ह्मणतों, इतकी त्याची मिनतवारी पाहिजे कशाला? आह्मीं भयंकर यातना सोसून स्वतःच्या श्रमानें तें द्रव्य मिळविलेलें आहे. आमचें आह्मांला तें मिळालेंच पाहिजे!

**दामिनी**—मिळालं पाहिजे हें तर उघड आहे–पण अशी हुपटघाई करून तें मिळेल असं तुला वाटतं का प्रेमानंद!

**सदानंद**—ह्मणजे? आमचें द्रव्य मागायला आह्मांलाच चोरी?

**दामिनी**—अरे, तें तुमचं द्रव्य खरं–पण तें तुह्माला देणं त्या भामट्याच्या हातांत आहे. ह्मणून तें युक्तियुक्तीनंच त्याजकडून काढून घेतलं पाहिजे, हें कसं नाहीं तुमच्या लक्ष्यांत येत?

**प्रेमानंद**—त्यानें आमचें द्रव्य मुकाट्यानें नाहीं दिलें, तर आह्मीं तें बलात्कारानें त्याच्याकडून घेऊं. तसा त्याला आह्मी सोडतों कीं काय?

**दामिनी**—त्यानें तें मुकाटयानें नाहीं दिलें, तर जबरदस्तीनें घ्या, पण विश्वानंद ह्मणतो त्याप्रमाणं प्रथम त्याच्यापाशीं सामोपचारानं मागून पहा. माझी मसलत ऐका.

**सदानंद**—तुझा विचार आह्मांला बिलकुल पसंत नाहीं. तुझ्या मसलतीची आह्माला जरूर नाहीं.

**दामिनी**—वः! फार चांगली कृतज्ञता! तुह्मीं त्या बिलंदरावर पूर्ण विश्वास ठेविल्यामुळं फसत होतां. तुह्माला मीं वेळींच सावध केलं अन् तुह्मीं माझ्यावरच उलट घसरतां?

**प्रेमानंद**—आह्मांला तूं वेळींच सावध केलेंस, याबद्दल आह्मी तुझे फार आभारी आहों. पण आतांचा तुझा हा विचार मात्र आह्मांला साफ पसंत नाहीं.

**दामिनी**—पण जरा विचार करा. समजा, तुह्मी त्याच्याकडून बलात्कारानं आपलं द्रव्य घेतलंत. पण तो कारस्थानी बहाद्दर कांहीं तरी भयंकर कारस्थान रचून तुमचा भयंकर सूड अन् सूडाबरोबरच तुमचं द्रव्यहि नाहीं का घेणार? यापेक्षां त्याला एखाद्या भयंकर पेंचांत अडकवून त्याचा कायमचा बंदोबस्त करणं बरं नाहीं का?

**सदानंद्**—वः, ठीक! आह्मीं का त्या अस्सल बिलंदराला पेचांत अडकावणार? तो आमच्या पेंचांत सांपडणार कसा?

**दामिनी**—कसा तें मी सांगतों. त्याच्याबद्दल तुमची खात्री करून दिल्यावर माझ्या ह्मणण्याप्रमाणं वागण्याचं मला तुह्मीं वचन दिलं आहे, त्याचं स्मरण आहेना तुह्मांला?

**प्रेमानंद्**—होय, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें वागायला आह्मी तयार आहों.

**दामिनी**—तर मग सदानंद, मी हें पत्र देतों तें मंदाराला नेऊन द्या; परंतु तें कोणीं दिलें, वगैरेसंबंधानें त्याला कांहींहि पत्ता लागूं न देतां तुह्मी ताबडतोब निघून या. अन् तुह्मी दोघे माझ्याजवळ इथं राहून, त्याला आतांच पेंचांत अडकवायचा मीं एक व्यूह रचला आहे, त्यांत मला मदत करा. [ सर्व जातात. ] या भामट्यांच्या कटामध्यें फूट पाडण्यांत ईश्वरकृपेनं मला यश आलं ह्मणून ठीक झालं! नाहीं तर माझे बेत तडीला जाणं अशक्य होतं. आह्मी चौघे असून तो जरी एकटा आहे, तरी आमच्या बेताचं एक अक्षर त्याच्या कानांवर जातांच तो कोल्हा आह्मांला भयंकर संकटांत घातल्याखेरीज कधींहि रहाणार नाहीं. माझा हा प्रयत्न ह्मणजे कालसर्पाच्या मस्तकावरील मणि काढण्याइतकाच भयंकर आहे! ईश्वरकृपेनं मला त्यांत यश येवो ह्मणजे झालं.

[ चाल—पानिया जो भरन गई० ]

**पडला किति अवजड कृतिचा भार शिरीं हा। मम हेतु हृदयिंचे पूर्ण व्हावया येई समय पहा॥ ध्रु०॥ हीन अनाथा मी जरि अबला। दीन करिन त्या रिपुसी प्रबला। विफल करिन तद्धेतुंसि सकलां। तो जरि कपटि महा॥ १॥**

[ जाते.

---

## प्रवेश आठवा.

[ **स्थल**—पुरंदराच्या मठांतील एकांत खोली. पुरंदर आणि तारिणी उभीं आहेत, असा प्रवेश.]

**तारिणी**—( स्वगत ) आतां करूं तरी काय? हा माझा प्रत्यक्ष दीर असून चांडाळानं विकारवश होऊन मला या भयंकर संकटांत घातलं आहे. ( उघड ) पुरंदर! तूं आपलं तोंड बंद करतोस कीं नाहीं?—

**पुरंदर**—तुझ्या तोंडानेंच माझें तोंड बंद कर, तुझ्याच हाती–नव्हे तोंडीं–हें आहे.

**तारिणी**—मूर्खा ! तूं माझ्या राज्यांत आहेस, हें विसरलास काय ?

**पुरंदर**—अन् सुंदरी ! तूं माझ्या मठांत असून शिवाय माझ्या हृदयांतहि आहेस, हें तूं विसरलीस का ?

**तारिणी**—मी तुझी राझी आहें—तुझ्या या भयंकर कृत्यांबद्दल तुला कठोर शासन द्यायचं माझ्या अंगीं सामर्थ्य आहे, समजलास ?

**पुरंदर**—तारिणी, तुझ्या राझीपणाची तुला जर घमेंड असेल, तर तूं आपल्या सर्व प्रजाजनांनां येथें बोलाव. आपली राझी परपुरुषाबरोबर एकांतांत असलेली पाहून त्यांनां अत्यंत आनंद होऊन ते तुजवर स्तुतीचा वर्षावच करतील !

**तारिणी**—( स्वगत ) चांडाळानं कसा अगदीं वर्मावरच डाग दिला ! तोंड दाबून बुक्यांचा मार ह्मणतात तो असा ! (उघड) तूं मला मुकाट्यानं जाऊं देतोस कीं नाहीं पुरदर ?

**पुरंदर**—जाऊं देईन, पण आतां नाहीं.

**तारिणी**—तर केव्हां ?

**पुरंदर**—माझी इच्छा पूर्ण करून तूं खुशाल जा. तारिणी ! तूं जर मला असें झिडकारून टाकलेंस तर माझे प्राण मला खास सोडून जातील !

**तारिणी**—तर मग चांडाळा, तूं अजून जीवंत कसा ? तुझा अंत इतक्या सोप्या साधनानं होईल, तर माझ्यासारख्या अनेक भोळ्या अबलांवरचीं संकटं तरी टळतील !

**पुरंदर**—तारिणी, मी तुझ्या विनवण्या करतों ह्मणून तूं शेफारून गेलीस काय ? तूं काय समजली आहेस ? जर संतोषानें तूं माझ्या इच्छेला कबूल झाली नाहींस, तर बलात्कारानें माझा हेतु मी पुरवून घेईन.

**तारिणी**—मूर्खा ! बलात्कारानं कुठं स्त्रिया वश होत असतात का ?

**पुरंदर**—तारिणी ! तुझी सुटका होणें आतां अशक्य आहे ! तुला येथून जातां येऊं नये अशी मीं पूर्वीच तजवीज करून ठेविली आहे !

**तारिणी**—या चांडाळाच्या हातून मला सोडविणारा कोणीच नाहीं कां इथं ?

**पुरंदर**—ओरड ओरड–खुशाल ओरड. तूं कितीहि शंखध्वनि केलास तरी इथें माझ्या हातून तुला सोडविणारा कोणीहि नाहीं.

**तारिणी**—ठीकच आहे. खाटकाच्या घरांत दयाळु सज्जन कोण असणार? देवा, माझी लज्जा सर्वस्वीं आतां तुझ्या हातीं आहे. पुरंदर! माझ्यावर दया कर आणि पातिव्रत्याची भिक्षा मला घाल.

**पुरंदर**—तारिणी! अशी रडूं नकोस. तुझ्या डोळ्यांत अश्रु पाहून मला कसें अगदीं भडभडून येतें. ये, मीच तुझे अश्रु पुसून टाकतों.

**तारिणी**—चांडाळा! हो दूर. मला स्पर्श करशील तर इथल्या इथं तुझ्या पायांजवळ डोकं आपटून मी प्राण देईन.

**पुरंदर**—तारिणी! तुझ्या या दरडावणीला हा पुरंदर भीक घालीत नाहीं! तुला माहित नाहीं, कीं, तूं मस्तक आपटूं लागतांच मी असा धांवून तुला हृदयाशीं अशी धरीन. [ तारिणीला धरूं लागतो, तों मठांत अग्निप्रलय होऊन त्याचा कांहीं भाग कोसळून पडतो. ] घात! घात! हें काय? ही आग कशी लागली!

[ सदानंद, प्रेमानंद व विश्वानंद धांवत येतात. ]

**सदानंद**—गुरुजी, धांवा, धांवा–मठाला आग लागली!

**पुरंदर**—मूर्खांनो! मठ कोसळून पडेपर्यंत तुम्ही काय करीत होतां? चला, पळा–आधीं आग विझवूं या. [ जातात.

**दामिनी**—( प्रवेश करून ) राणीसाहेब, एका क्षणाचाहि विलंब न लावतां माझ्याबरोबर झटकन् चला.

**तारिणी**—तूं कोण आहेस? आतांच मी एका काळसर्पाच्या तोंडांतून सुटलें, तों दुसऱ्या भयंकर संकटांत मला नेऊन तूं घालणार आहेस कीं काय?

**दामिनी**—बाईसाहेब! मी आपला एक परम हितचिंतक आहें, इतकंच या वेळीं मी आपणाला सांगतों. मजवर विश्वास ठेवून माझ्याबरोबर चला. इथं आतां एक क्षणभर रहाल, तर भयंकर संकटांत पडाल!

**तारिणी**—तूं कोणीहि ऐस. तुझ्या या आश्वासनावर विश्वास ठेवून आणि ईश्वराचं स्मरण करुन मी तुझ्याबरोबर येतें. चल– [ दोघी जातात.

**पुरंदर**—( प्रवेश करून ) अरे, पळा लवकर; जळूं द्या तो मठ; तो पहा कमलाकर तारिणीला घेऊन पळून गेला! गेला–बराच दूर गेला. जा–धांवा लवकर. छे! गेलाच तो–काय करूं?–मलाहि जातां येत नाहीं. ए मूर्खांनो!

[ तिघे शिष्य येतात. ]

**सदानंद**—काय ह्मणतां गुरुजी ?

**पुरंदर**—तो पहा तुमचा बाप तारिणीला घेऊन पळून जातो आहे. त्या दोघांनांहि पकडून आणा आधीं–

**प्रेमानंद**—तोंड सांभाळून बोला गुरुजी ! आह्मी कांहीं तुमचे नोकर नाहीं.

**पुरंदर**—नोकर नाहीं ? तर तुह्मांला मीं इथें बाळगले आहेत कशाला ? दोन तीन वेळ भाताचे डोंगर गिळायलाच कीं काय ?

**विश्वानंद**—स्वतःचा मतलब साधायला ! आमच्यावर उपकार करायला नव्हे ! गुरुमहाराज ! आह्मी मिळविलेले धनाचे डोंगरच आपण गिळीत होतां ! आपले डोळे आतां फिरले काय ?

**पुरंदर**—असें काय ? चोरांनों ! माजलांत वाटतें ? व्हा तर चालते इथून !

**प्रेमानंद**—तो विचार तर आह्मीं अगोदरच केला आहे. आह्मीं मिळविलेल्या द्रव्याचा योग्य भाग आह्मांला मिळाला, कीं, हे आह्मी निघालोंच !

**पुरंदर**—( स्वगत ) पुरा घात झाला ! हे तर अगदींच बिथरल्यासारखे दिसतात. (उघड) अरे, आज तुह्मी सारे असे भ्रमिष्ट कसे झालांत ? नेहेमींची भांग आज जास्त नाहीं ना झाली ? मूर्खांनो ! हें भलतेंच काय चालविलें आहे तुह्मीं यां वेळीं ? मघाशींच तारिणीला पकडून आणली असतीत तर पुढें येणारा भयंकर प्रसंग टळला नसता का ? आतां वाड्यांत पोहोंचतांच शिपाई पाठवून ती आह्मांला चतुर्भुज करून नेल्याशिवाय राहील काय ? गाढवांनो ! तुमची अक्कल कुठें गेली ?

**विश्वानंद**—गप्प बसा गुरुजी ! आह्मी दुसरेंतिसरें कांहीं जाणत नाहीं. आह्मी आमच्या द्रव्याचा हिस्सा घेऊन जाणार, एवढें मात्र खरें !

**पुरंदर**—( स्वगत ) खास यांनां त्या कमलाकरानेंच फितूर केलें असलें पाहिजे ! यांनां आतां आपलें खरें स्वरूप दाखविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ( उघड ) कायरे, तुह्मी जो हिस्सा मागतां तो कसला ?

**विश्वानंद**—कसला ह्मणजे ? आह्मीं मिळविलेल्या द्रव्याचा !

**पुरंदर**—कोठलें द्रव्य ? मूर्खांनो ! तें द्रव्य कोणीं मिळविलें ?

**प्रेमानंद**—कां बरें ? आह्मीं.

**पुरंदर**—तुह्मीं खरें, पण कोणाच्या हिंमतीवर मिळविलेंत ?

**विश्वानंद**—स्वतःच्या! आमच्या मनगटाच्या जोरावर!

**पुरंदर**—असें काय? तर मग माझा आश्रय तुह्मांला नव्हता, तेव्हां तुमचा मनगटाचा जोर अन् हिंमत कुठें गेलीं होतीं? तुह्मीं मिळविलेल्या द्रव्याला कारण मी! ह्मणून सर्व द्रव्य माझ्याच मालकीचें आहे. चला, चालते व्हा—तुमचा त्याच्यावर कांहीं हक्क नाहीं!

**प्रेमानंद**—ह्मणजे? आह्मीं आजपर्यंत जिवापाड श्रम केले, ते व्यर्थच काय?

**विश्वानंद**—आमच्या जीवांवर पोळाप्रमाणें चैन मारून आतां आमच्याशींच कृतघ्न होऊं पहातोस काय चोरा?

**पुरंदर**—मूर्खांनो! तुह्मीं कसले श्रम केलेत? मी सूत्रधार चांगला होतों, ह्मणून तुह्मी बाहुलीं नाचलां! आतां मुकाट्यानें चालते होतां, कीं, माझा प्रताप तुह्मांला दाखवूं?

**सदानंद**—तुझा प्रताप कौतुकानें पहायला आह्मी आतां तुझे पूर्वींचे मित्र राहिलों नाहीं. फुकट, फुकट तुझ्यासारख्या नीच चांडाळावर विश्वास ठेवून आह्मी फसलों!

**पुरंदर**—ठीक आहे—मी नीच आणि तुह्मी उंच! अहो उंच गृहस्थ! आतां तरी सावध झालां कीं नाहीं?

**सदानंद**—आह्मी तुझ्या मोहिनीनें आजपर्यंत निद्रितच होतों; परंतु त्या महात्म्या कमलाकरानें आमच्या डोळ्यांत वेळींच अंजन घालून आह्मांला सावध केलें. त्यानें जर आह्मांवर हे उपकार केले नसते, तर तुझ्या कपटाच्या फांसानें आमची यमपुरीला केव्हांच रवानगी झाली असती!

**पुरंदर**—कुठें आहे तो कृतघ्न चांडाळ? [ दामिनी येते, तिला उद्देशून. ] दुष्टा, चांडाळा, कृतघ्ना! बोल—मठाला आग कोणीं लावली? आणि तारिणीला कोणीं पळविली?

**दामिनी**—मीं गुरुजी! मीं—तिला तूं चांगल्या उद्देशानं आणली नसावीस, अशी मला पूर्वींपासूनच शंका होती. अन् ह्मणूनच तूं इथं येण्यापूर्वींच मीं मठाला आग लावून ठेविली होती. तुझ्या नीच मगरमिठींतून त्या अबलेची मुक्तता करायला याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. अंदाजाप्रमाणं कठिण प्रसंग बेतलाच, तर आगीची बातमी तत्क्षणीं तुला देण्याचा माझा बेत होता—पण तुझें निंद्य कर्म देवाला पहावेना; ह्मणून ऐनवेळीं तुझा मठच कोसळला!

**पुरंदर**--नीचा ! मीं तुझ्या विपत्कालीं तुला आश्रय दिला, त्याचें हें फळ तूं मला दिलेंस काय ? तर मग भोग आपल्या कर्मांचीं फळें ! ( त्याला मारावयाला धांवतो. )

**प्रेमानंद**—हं खबरदार, त्याला हात लावशील तर ! इथल्या इथें तुला ठार करून टाकूं.

**दामिनी**--अरे, पाहतां काय, बांधा या हरामखोराच्या मुसक्या अन् हा तुझांला ठेवणार होता, त्याच तळघरांत याला कोंडून ठेवा ! ( ते पुरंदराला बांधतात. )

**पुरंदर**--विश्वासघातक्या, हरामखोरा ! तुझ्या त्या कवंडळाप्रमाणें वरून सुंदर दिसणाऱ्या चेहऱ्यावर विश्वास ठेवून मीं स्वतःचा घात मात्र करून घेतला !

**दामिनी**—तुझ्यासारख्या नीच लोकांच्या दुष्ट कृत्यांनां जर सदोदित यशच येत गेलं, तर ही पृथ्वी पापभारानं केव्हांच नाहींशी होईल ! नीच कृत्य प्रारंभीं जरी यशस्वी होत गेलं, तरी त्याचा शेवट हा असाच व्हायचा !

[ पडदा पडतो. ]

# अंक चवथा.

## प्रवेश पहिला.

[ **स्थल**—तारिणीचा महाल. तारिणी बसली आहे. ]

**तारिणी**—झालेला सारा प्रकार सांगून केव्हां एकदा तिकडची क्षमा मागेन, असं मला झालं आहे. पण तिकडून मला क्षमा करायला होईल ना? कीं माझा अव्हेर करायला होईल? तिकडून माझा अव्हेर करणं झालं, तर त्यांत तिकडचा कांहींसुद्धां दोष नाहीं. मजविषयीं तिकडच्या हृदयांत किती गाढ प्रेम! मलाच अभागिनीला त्या प्रेमाची खरी किंमत समजली नाहीं. झालेला प्रकार ऐकून तिकडे किती बरं वाईट वाटेल? सवत आल्यामुळं मला जितकं वाईट वाटलं असतं, त्यापेक्षां माझ्या चांडाळणीच्या या कृतीमुळं महाराजांनां शतपट दुःख होईल. खरंच, एखादी स्त्री माझ्या सुखाची वांटेकरीण झाली, तर त्यांत मनाला अगदीं लावून घेण्यासारखं आहे तरी काय? सर्व सुखाचं भांडार केवळ मलाच एकटीला लाभावं, अशी निवळ आपलपोटेपणाची इच्छा मी तरी कां म्हणून धरावी? महाराजांनां ज्यांत आनंद, त्यांत मलाहि आनंद नको का व्हायला? पण तो मेला मत्सर आम्हां स्त्रियांच्या सुखाच्या नेहमीं आड येऊन आमची सारी विचारशक्ति नाहींशी करतो! खरोखर, हे विचार जर मला त्यावेळीं सुचते, तर मी त्या मेल्या चित्रांगदेच्या फसवेगिरीला फसून त्या धाडसाला प्रवृत्त झालेंच नसतें. बरं, त्या मेलीच्या उपदेशांमुळं एकदा त्या मेल्याच्या मठांत मी गेलें; पण दुसऱ्या वेळीं तरी मीं कांहीं विचार करावा कीं नाहीं? पण छे, तसं कसं होणार? म्हणतात ना, बुडत्याचा पाय खोलांत! अगदीं ऐन प्रसंगीं तो महात्मा माझ्या हांकेला धांवला म्हणून—अगबाई! नाहीं तर माझी स्थिति त्यावेळीं काय झाली असती, त्याची कल्पनाहि करवत नाहीं. तो उदार महात्मा कोण असावा बरं? कोणी कां असेना? सरकारस्वारी येतांच सर्व खरी खरी हकीकत तिकडे कळवून, त्या पुरुषाच्या उपकारांतून मला मुक्त झालं पाहिजे. तिकडची आठवण होतांच पुनः हृदयांत कशी धडकी भरली! हीं कुणाचीं पावलं ऐकूं येत आहेत? आलीच वाटतं स्वारी! अगबाई! शहरांत येऊन पुरती अर्धी घटकाहि लोटली नसेल, तों माझ्या महालाकडे धांव घेतली, इतकं तिकडचं मजवर निःसीम प्रेम! नाहीं तर माझं मत्सरपूर्ण प्रेम! पण आतां कोणत्या

तोंडानं मी तिकडे सामोरी जाऊं? पूर्वी नाथांची रम्य मूर्ति पहातांच प्रेमानं फक्त माझ्या हृदयालाच कंप सुटत असे. पण आतां कृतकर्माच्या भीतीमुळं माझं सर्वांग कसं थरथर कांपत आहे! आतां माझ्या कंप पावणाऱ्या शरीराला खऱ्या प्रेमाचा आश्रय मिळाला तरच—[ तारानाथ येतो, त्याला आलिंगून ] अगबाई! केव्हां येणं झालं तरी?

**तारानाथ**—हा आतांच येतों आहें. गांवांत येतांच ग्रामदेवतांचें दर्शन घ्यायचा कांहीं मंडळींचा परिपाठ असतो. पण मी आपला गांवांत पाऊल टाकतांच मला अत्यंत पूज्य असलेल्या गृहदेवतेचें दर्शन घ्यायला धांवतच आलों.

**तारिणी**—खरं का हें? पण मी विचारतें, दोघींपैकीं खरी गृहदेवता कोण?

**तारानाथ**—दोन गृहदेवता? ह्मणजे? माझ्या हृदयमंदिरांत आपल्या सन्निध बसवायला ही दुसरी पाहुणी कोण आणलीस बुवा?

**तारिणी**—मी कशाला आणूं त्या सटवीला? इकडूनच तर तिला घरांत आणायची योजना करायला झाली आहे.

**तारानाथ**—मीं योजना केली? मला वाटतें तारिणी! माझ्या वियोगाचे दिवस तूं असेच कांहीतरी कुतर्क लढविण्यांत घालविले असावेस! असलीं तिरकटी तारवें बांधण्याशिवाय तुह्मा बायकांना दुसरा कांहींच का उद्योग नसतो? अग वेडे!

[ चाल—पकर कर लंगर० ]

**नयनशरिं न कुणिं तुजविण हन्मृग मम वेधिला ॥ध्रु०॥**
**क्रीडावनिं रमतांना। सुखवितसे इंदु मना। अवलोकित**
**ह्मणुनि तया। प्रिय गमत न तुजविण परि। तुजविण**
**मग विधुवदना। रुचति का मला ॥ १ ॥**

**तारिणी**—वहावा! आतां ही असली साखर पेरायला होते आहे वाटतं? पण मी नाहीं हो अशानं आतां फसायची! सुंदर सुंदर तरुण कुमारिकांच्या तसबिरी मागवून आणून त्यांतील एक अत्यंत सुंदर तसबीर पसंत झाल्यावर तिथं आपणच ना सचिवांनां जमवायला सांगितलं होतं?

**तारानाथ**—हं हं हं! आलें आतां लक्ष्यांत! मी त्या वेळीं असें कांहींसें बोललों होतों खरा—पण वेडे, ती थट्टा तूं इतका वेळ खरी का समजलीस? शाबास!

**तारिणी**—हो, बरी असेल थट्टा! दरबारांत आलेल्या एका साधूनं ' निपुत्रिकाकडचा धर्म घेत नाहीं,' असं ह्मटलं, तीदिखील थट्टाच वाटतं?

**तारानाथ**—अग, नाहींतर काय ? आपल्या राज्यांत अलीकडे वारंवार पडत असलेल्या दरोड्यांमुळें माझें मन अतिशय उदास झालें होतें; ती उदासीनता घालविण्याकरितां पुष्कळ दिवसांनीं वेळांत वेळ काढून मी तुझ्या महालांत आलों, तों येथेंहि तीच कर्मकटकट निघून दोघांच्याहि मनाला त्रास होईल, ह्मणून तुला अगोदर चिडवून नंतर प्रसन्न करून घ्यायच्या हेतूनें मी तें थट्टेंत कांहीं तरी बोललों झालें ! तारिणी ! तुझ्या भोळ्या स्वभावाची मात्र कमाल आहे ! इतक्या वर्षांच्या निकट परिचयानें सुद्धां तुला माझा स्वभाव कळला नाहीं ना ? शर्थ आहे तुझ्या बायकांच्या मत्सरी स्वभावाची !

**तारिणी**—खरंच का पण हें सारं ?

**तारानाथ**—अगदीं खरें–खरें–खरें ! अजूनसुद्धां तुला संशय वाटतो ?

[ चाल–हमारो निरधनको० ]

**न करीं शंकित मानस अपुलें ॥ ध्रु० ॥ या हंसा हें**
**मानस सोडुनि स्थान दुजें नच रुचलें ॥ १ ॥ विश्वास**
**धरीं मम वचनावरि ठेवीं दोष न विमले ॥ २ ॥**

**तारिणी**—हें सारं मला पूर्वीच कळतं, तर किती अनर्थ टळला असता !

**तारानाथ**—ह्मणजे ? माझ्या या थट्टेमुळें असा अनर्थ तरी काय झाला ? तरी मला वाटलेंच, कीं, तूं असें कांहींतरी करून बसली असशील ह्मणून !

**तारिणी**—ती हकीगत सांगण्यापूर्वी मी अगोदर आपली क्षमा मागतें. आपल्या विश्वासाला, आपल्या प्रेमाला मी अगदीं अयोग्य आहें, असं समजून कांहीं झालं तरी मला या चरणांपासून दूर करूं नये. नाहींना करणार ?

**तारानाथ**—कधींहि नाहीं. तारिणी ! तूं माझा प्राण आहेस. पण या तुझ्या बजावणीनें तर ती हकीकत ऐकण्याची मला अतिशयच उत्कंठा लागून राहिली आहे.

**तारिणी**—आपण स्वतः माझ्या प्रेमाला व सुखाला दुसरी वांटेकरी आणणार, हें आपलं भाषण ऐकल्यापासून मला अगदीं चैन पडेनासं झालं. केवळ पुत्रप्राप्तीकरितां इकडून दुसरा विवाह करायला होणार होता–हें आपलं कारण नाहींसं करावं, या हेतूनं आपण जातांच चित्रांगदेच्या सांगण्यावरून मी एका साधूच्या दर्शनाला त्याच्या मठांत गेलें.

**तारानाथ**—काय ह्मणतेस तारिणी ?

**तारिणी**—महाराज ! दासीला क्षमा करा. इतक्यांतच हिच्यावर इतकं रागावूं नये. या चांडाळणीचं धाडस यापेक्षांहि पुढं गेलं आहे. पण कांहीं झालं तरी आपल्या अर्धांगीविषयीं भलतीच शंका कधींहि मनांत आणूं नये.

**तारानाथ**—तुझ्या निर्मल चरित्रावर माझा इतका दृढ विश्वास आहे, कीं, तुझा अपराध ऐकण्याच्या अगोदरच मी तुला क्षमेचें वचन देतों. बरें पुढें ?

**तारिणी**—या संकटाच्या निवारणार्थ त्या साधूनं मला एक कसलासा यज्ञ कोणालाहि न कळतां करायला सांगितला. अन् पुत्रप्राप्तीकरितां वेडी झालेली मी तो करण्यासाठीं ही गोष्ट कोणालाहि न कळवितां, त्याच्या मठांत चित्रांगदे-बरोबर गेलें.

**तारानाथ**—अस्सें ! या पुत्रप्राप्तीच्या वेडामुळें तुझ्या अंगीं बराच धीट-पणा अन् कर्तबगारी आली ह्मणायची !

**तारिणी**—आह्मी मठांत गेल्यावर त्या मेल्या चांडाळणीनं–चित्रांगदेनं–कांहीं तरी निमित्त दाखवून मला एकटीला एका बाजूच्या खोलींत पाठविलं अन् आपण कुठं नाहींशी झाली. तिथं जातांच ताबडतोब मला त्या दोघांचं कपट कळून चुकलं–पण त्या असहाय स्थितींत माझा काय इलाज चालणार ? थोड्याच वेळांत त्या एकांत जागीं तो मेला साधु येऊन त्यानें जेव्हां आपली पापवासना मजपाशीं प्रगट केली, तेव्हां मीं त्याला पुष्कळच शिव्याशाप दिले–त्याची अतिशय निर्भ-र्त्सना केली, तरी त्याचा लघळपणा सारखा वाढतच चालला. शेवटीं, अगदीं इलाज नाहींसा होऊन मी रागानं कपाळमोक्ष करून घेणार होतें, इतक्यांत माझ्या सुदैवानं मठाला आग लागून तो कोसळूं लागला अन् त्या मेल्या मान-भावी भोंदू साधूच्या हातून त्याच्या एका शिष्यानंच माझी सुटका करून मला वाड्यांत सुखरूप आणून पोंचविलं.

**तारानाथ**--( संतापून ) काय ह्मणतेस तारिणी ? माझ्या राज्यांत मा-झ्याच धर्मपत्नीच्या पातिव्रत्यावर घाला घालूं पहाणारा तो साधु आणि ती चित्रांगदा कुठें आहेत ? सांग–त्या दोघांच्या नरडीचा या क्षणीं घोट घेतों !

**तारिणी**—रामतीर्थाजवळ त्या चांडाळाचा मठ आहे. ती राक्षसीण चित्रां-गदा जी त्यावेळीं कुठं नाहींशी झाली, ती पुनः कांहीं माझ्या दृष्टीस ह्मणून पडली नाहीं ! महाराज ! सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही, कीं, तो साधु दुसरा कोणी नसून आपलेच बंधुराज आहेत !

**तारानाथ**—कोण ? पुरंदर ? तो साधु पुरंदर आहे ? साराच चमत्कार ! पण तूं त्याला कसा ओळखलास ?

**तारिणी**—पहिल्यानं कांहीं मीं त्याला अर्थात् ओळखलं नाहीं-मीं जेव्हां 'तुझ्या वेषांत अन् भाषणांत कांहीं साम्य आहे का ?' असं त्याला संतापून विचारलं, तेव्हां 'तुझ्याचकरितां घेतलेला हा वेष तुझ्याकरितां दूर करतों,' असं ह्मणून आपला तो साधूचा वेष त्यानं फेंकून दिला, तेव्हां मला त्याची तत्क्षणीं ओळख पटली. आपण त्याला राज्यांतून हद्दपार केलं, त्याबद्दल आपणांवर हा सूड उगविला, असंहि तो मेला कायसं ह्मणत होता.

**तारानाथ**—असें काय ? तर मग या प्रकरणाची आतांच मला पुरी चौकशी केली पाहिजे. [ जातात.

---

## प्रवेश दुसरा.

[ **स्थल**—मंदाराच्या वाड्यांतील एक दालन. इंदुमती व रजनीकांत बसलीं आहेत. ]

**इंदुमती**—रजनीकांत ! तर मग तुह्मी मला सोडून जाणारचना ?

**रजनीकांत**—इंदुमतीबाई ! माझी इच्छा नसतांहि दुर्दैवानें तो प्रसंग मजवर आणला आहे, याबद्दल मला क्षमा करा. दादासाहेबांचें मन माझ्याबद्दल अत्यंत कलुषित झालें असतां मीं येथें रहाणें तुह्माला तरी बरें दिसतें का ?

**इंदुमती**—रजनीकांत ! तिकडचा स्वभाव तुह्माला माहीत आहे ना ? रागाच्या भरांत तिकडून तुह्माला टाकून बोलणं झालं असेल, पण खरोखर तिकडचं तुमच्यावर फार प्रेम आहे. माझ्या दुर्दैवामुळं माझ्याशीं कसंहि वागायला होवो, पण तिकडचा स्वभाव फारच प्रेमळ आहे.

**रजनीकांत**—बाईसाहेब, दादासाहेबांकडून तुमचा इतका छळ होत असतांहि त्यांच्याविषयीं तुमचें मन इतकें शुद्ध पाहून मला फार आनंद होतो. पण माझा झालेला निश्चय आतां ढळणें अशक्य आहे.

**इंदुमती**—संतापाचा झटका नाहींसा झाल्यावर तिकडून जर तुमच्याशीं पूर्वीप्रमाणं प्रेमानं वागायला झालं, तर मग तुह्माला इथून जायचं कांहींच कारण नाहीं.

**रजनीकांत**—इंदुमतीबाई ! मनुष्याला एकदा संशयपिशाचानें झपाटलें, कीं, ज्याबद्दल त्याच्या मनांत प्रखर संशय आलेला असतो, त्याविषयीं त्याचें पूर्व-

वत् वर्तन होणें शक्य नसतें. दादासाहेबांवर तो हल्ला झाल्यापासून त्यांचें वर्तन माझ्याशीं फारच चमत्कारिक आणि संशयी झालें आहे. त्या प्रसंगीं तर कळसच झाला. असें असतां मी आतां येथें रहाणें सर्वथैव अनिष्ट आहे.

**इंदुमती**—तुमचं ह्मणणं मी एकवार कबूल करतें. पण तिकडला संशय नाहींसा झाल्यावर तिकडून तुमच्याशीं पूर्वीप्रमाणं प्रेमानं वागणं होईल, अशी माझी खात्री आहे. तिकडच्या स्वभावांत प्रेम उत्पन्न व्हायला मीं एक उपाययोजना केलीहि आहे. त्याचा गुण लवकरच दिसून येईल.

**रजनीकांत**—कोणता तो उपाय ?

**इंदुमती**—तें आतांच सांगतां येण्याजोगं नाहीं. गुण आला ह्मणजे सर्व कळेल.

**रजनीकांत**—खाऱ्या समुद्राला जेव्हां मधुरता येईल, तेव्हांच असल्या उपायांनीं मनुष्यस्वभावांत अंतर पडेल. तुमच्या उपायानें दादासाहेबांच्या स्वभावांत फरक पडून तुह्मी सुखानें नांदत आहां, असें मला कळलें, ह्मणजे मी येथें पुनः येईन, मग तर झालें ?

**इंदुमती**—पण आतां जाणार, असेंच ना ? रजनीकांत !

[ चाल—प्यारे छब ते हारि० ]

**त्यजुनि जाल तरि गति न दिसत बरि। हा विरहवि-**
**षय हरुनि मम शांति विकल हृदय करि ॥ ध्रु० ॥ व्या-**
**कुल होइन मी जायिं अंतरिं। देउनि मजला धैर्य परो-**
**परि। बोध कोण करि ॥ १ ॥**

**रजनीकांत**—इंदुमतीबाई ! हें असें काय बरें ? दुःखानें आधींच पोळून गेलेल्या आपल्या हृदयाला उगीच आणखी कष्ट कां बरें देतां ?

[ चाल—तुमसे बचन मैतो० ]

**करुण अशा वदुं नका वचना। परिसाया बल नसे श्र-**
**वणां ॥ ध्रु० ॥ मोहबंधनीं अधिक पडें मी अश्रुपूर्ण ब-**
**घुनि या नयनां ॥ १ ॥ निश्चयमेरुसिं शोकवज्र हें भेदि**
**करा निज सुशांत मना ॥ २ ॥**

परिस्थितीकडे लक्ष्य देऊन आपला शोक आंवरून मला जाण्याला आनंदानें परवानगी द्या. ईश्वरानें ठेविलेल्या स्थितींत समाधान मानून आजपर्यंतचे दिवस

तुह्मी धैर्यानें काढलेत, तसेच मी गेल्यानंतर जीवाला कांहीं अपाय करून न घेतां तुह्मी धैर्यानें दिवस काढाल ना? एकदा होय ह्मणा, ह्मणजे माझें समाधान होईल.

**इंदुमती**—रजनीकांत! तुह्मी दुःखांत माझं समाधान करायला इथं होतां ह्मणून मी हे दुःखाचे दिवस कसे तरी कंठले! पण तेंहि समाधान मला आतां तुह्मी ठेवीत नाहीं. मी खरंच सांगतें, माझ्या या प्रयत्नाला यश आलं, तर ठीकच आहे–नाहीं तर या दुःखांतून मी कशीतरी आपली कायमची मुक्तता करून घेईन.

**रजनीकांत**—काय? आत्मघातानें मुक्तता करून घेणार? काय हें ऐकतों मी? माझ्या आजपर्यंतच्या बोधाचा तुमच्यावर हाच का परिणाम झाला? इंदुमतीबाई! माझ्यावर तुमचें खरें प्रेम असेल, तर असला अविचार मनांतहि आणूं नका–

[ चाल–चिरिया चौंचबानि० ]

**न करा मनीं खंत। बघतो जरी अंत। निवटील भगवंत। सुख अंतिं खास॥ ध्रु०॥ निवटा दुर्दिनांस। न करा तनुविनाश। खचित तो अविनाश। पुरविल आस॥ १॥**

[ कोतवाल, शिपाई, व मंदार येतात. ]

**मंदार**--कोतवालसाहेब! याच कुलटेनें या नराधमाच्या साहाय्यानें मला विष घातलें!

**रजनीकांत**--काय? यांनीं माझ्या मदतीनें आपणाला विष घातलें? काय भयंकर आरोप हा? कोतवालसाहेब, हें आह्मांवर कांहींतरी बालंट आहे.

**मंदार**—काय बालंट? भयंकर गुन्हा करून पुनः मलाच खोटा ठरवूं पहातोस काय? मी ह्मणतों तें पूर्णपणें सिद्ध करायला माझ्याजवळ भक्कम पुरावा आहे. कायग ए चांडाळणी! बोल, तूं या अधमाच्या साहाय्यानें मला विष घातलेंस कीं नाहीं?

**इंदुमती**--अगबाई! काय ह्मणायचं हें? असं घोर कर्म करून मी नरकाचा मार्ग धरीन, असं इकडे खरंच वाटतं का?

**मंदार**--त्या शास्त्रार्थांच्या गोष्टी मला सध्यां नको आहेत. कोतवालसाहेब, त्या गृहस्थानें जर हें पत्र मला आणून दिलें नसतें, तर या दोघांचा दुष्ट बेत सिद्धीस जाऊन माझी केव्हांच गठडी वळली असती!

४१०७, ...

**कोतवाल**--इंदुमतीबाई, काय असेल तें खरें बोला. या पत्रावरून तुह्मा दोघांवर दोष सिद्ध होत आहे.

**इंदुमती**--तुह्मीही असं ह्मणतांना? माझ्या दुर्दैवानं सर्वांच्याच बुद्धि कशा फिरल्या?

**मंदार**--दुर्दैव तर खरेंच. त्या गृहस्थाला तुमचें कपट फोडण्याची बुद्धि व्हायला तुझें दुर्दैवच कारण झालें ह्मणायचें!

**रजनीकांत**—दादासाहेब! मला सारी हकीगत अगोदर पूर्णपणें कळली पाहिजे. इंदुमतीबाईंनीं आपणाला विष केव्हां घातलें? तें पत्र तुह्माला कोणीं आणून दिलें? तसेंच, त्यांत काय लिहलें आहे? या सर्व गोष्टी मला इत्थंभूत कळल्या पाहिजेत. मला तुह्मी या प्रकरणांत गोंवतां आहां, ह्मणून मला हें विचारणें भाग पडत आहे.

**मंदार**—विचार, खुशाल विचार. तुझ्या प्रत्येक प्रश्नाला माझ्याजवळ पक्क्या मापाचीं, भरपूर पुराव्याचीं, सणसणीत उत्तरें तयार आहेत. हें पत्र नीट वाचून पहा. मला पत्र आणून देणारा मनुष्य कोण होता, तें मात्र मला माहित नाहीं. ‘तुमच्या पत्नीनें दिलेला प्रत्येक पदार्थ नीट तपासून पहा—त्यांपैकीं एखाद्यांत तरी तुह्माला विष आढळून येईल,’ असें या पत्रांत स्पष्टपणें लिहिलें आहे. या पत्रानें वेळींच सावध होऊन हिनें मला दिलेला प्रत्येक पदार्थ मी बारकाईनें तपासून पाहूं लागलों, तों दुधांत हा गाळ मला आढळून आला. त्याची परीक्षा करण्याकरतां मीं तसाच तो वैद्याकडे पाठवून दिला. तें विष आहे, असा त्याचा अभिप्राय पडतांच मी सरकारांत वर्दी देऊन कोतवालसाहेबांनां घेऊन तसाच तुह्मांला नेण्याकरितां आलों. समजली आतां सारी हकीगत?

**कोतवाल**—रजनीकांत, हा विषप्रयोग करायला तुह्मीं इंदुमतीबाईनां मदत केलीत कीं नाहीं?

**रजनीकान्त**—तुह्मी येण्यापूर्वी मला या प्रकरणापैकीं एक अक्षरहि माहीत नव्हतें, हें मी परमेश्वराला व सत्याला स्मरून सांगतों. मीं यांनां या कामांत साह्यय केलें, असा या पत्रांत कोठेंहि उल्लेख नाहीं. शिवाय हें पत्र तरी कोणा दुष्टाचें कौटिल्य नसेल कशावरून?

**मंदार**--तें-तें—त्याबद्दल माझी पुरी खात्री आहे. कोतवालसाहेब, हें एक असो ह्मणा—पण, मागें जो माझ्यावर दरोडेखोरांचा हल्ला झाला, तो या रजनीकांतानेंच करविला, अशी माझी पक्की खात्री आहे.

**रजनीकांत**--या भाषणानें तर माझ्यावर वज्राघातच झाला! दादासाहेब,

[ चाल—इंतुम्याडिको० ]

**अपराध हा न करीं कदा। घडला असे विनती पदा।**
**कटु भाषणा न पुन्हां वदा॥ ध्रु०॥ पशुहि स्मरे स्वासु-**
**दातें सुज्ञ नर कसा करि तद्वधा॥ १॥**

**मंदार**—अरे हो, आहेस ठाऊक मोठा वेदांती आहेस तो! असलीं भाषणें ऐकायला मी यावेळीं येथें आलों नाहीं.

**इंदुमती**—( स्वगत ) आतां यावेळीं आपलं गौप्य उघड केलंच पाहिजे; नाहीं तर याहिपेक्षां भयंकर अनर्थ कोसळेल. ( उघड ) कोतवालसाहेब, मी या गोष्टीचा उलगडा करितें. मी इकडे दुधांतून एक भस्म दिलं होतं खरं, पण तें विष नव्हतं हें खास!

**कोतवाल**—पण मी विचारतों, भस्म तरी घालण्याचें कारण काय?

**इंदुमती**—इकडचं मजवर लोपलेलं प्रेम पूर्ववत् मजवर बसावं, म्हणून तें भस्म एका साधूनं मला इकडे द्यायला सांगितलं होतं.

**मंदार**—काय तरी माझ्या प्रेमाचें अगत्य हें? गृहिणी असावी तर अशी असावी! भस्माचें म्हणे विष झालें! कलियुगांतला हा मोठाच विलक्षण चमत्कार! कोतवालसाहेब, काय ऐकतां ही बाष्कळ बडबड?

**रजनीकांत**—इंदुमतीबाईचें म्हणणें मला खरें दिसतें. अशाच कांहीं हेतूनें आपण कांहीं उपाय करून पाहिला आहे, असें या मलाहि सांगत होत्या.

**मंदार**—कोतवालसाहेब, थोड्या वेळापूर्वी आपणाला यापैकीं एक अक्षरहि माहित नाही, असें हाच म्हणत होताना?

**कोतवाल**—इंदुमतीबाई, तुम्ही मंदारांनां दुधांतून भस्म दिल्याचें कबूल करतां; पण तें विष नव्हतें असें म्हणतां-पण तें विषच होतें, असें वैद्य ठरवितात! असले दैविक खेळ या काळांत तरी कांहीं होत नाहींत हें खास! तुमचा हा बेत पूर्वींच ठरलेला होता, असें या पत्रावरूनच सिद्ध होत आहे. रजनीकांतांनीं तुम्हाला या कामीं साहाय्य केलें असावें, असाहि मंदारांनां बळकट संशय आहे. म्हणून तुम्हा दोघांनांहि मला सरकाराकडे नेलें पाहिजे.

**इंदुमती**—कोतवालसाहेब, तुम्हीहि मजवर निष्ठुर झालांत ना? या दीन कन्येची तुम्हालाहि नाहीं ना कींव येत?

**कोतवाल**—बाईसाहेब! मी हुकुमाचा ताबेदार नोकर आहें!

**मंदार**—कोतवालसाहेब, हिच्या अशा मोहक नाटकी भाषणांला भुलून उगीच वेळ घालवूं नका. चला या चांडाळणीला अन् या बेरडाला घेऊन!

**इंदुमती**—आपले चरण सोडून मी जाऊं तरी कुठं!

[ चाल—केली अपार माया० ]

**स्वमना करा विशाला। वितरा मला दयेला। वाली**
**कुणी न उरला। अपुल्याविणें दयाला ॥ १ ॥ तनुसी**
**तदीय छाया। पतिसी तशीच जाया। अपवाद यासि**
**व्हाया। त्यजितां कशी इयेला ॥ २ ॥**

**मंदार**—पण मी कुठें तुला अपवाद होऊं देतों? तुझ्या प्रियकराबरोबरच तुझी रवानगी करून देतों. त्याच्या छायेप्रमाणेंच तूं त्याच्याबरोबर खुशाल रहा!

**रजनीकांत**—हे शब्द उच्चारल्याबद्दल आपणाला पुढें खात्रीनें पश्चात्ताप होईल.

**मंदार**—ठीक आहे. होऊं दे पश्चात्ताप!

**इंदुमती**—देवा, माझ्या पतिदैवताप्रमाणं तूंहि मजवर निष्ठुर झालास ना?

[ चाल—विनवणि करि० ]

**कवण काजि गुंतलास। विसरलास म्हणुनि दास-**
**पालनास यदुविलास ॥ध्रु०॥ मजसि असे ज्यांचि आस।**
**लाविति मज तेचि फांस। तूंहि अदय जाहलास ॥ १ ॥**

**रजनीकांत**—इंदुमतीबाई, लवमात्र धीर सोडूं नका. आलेल्या प्रसंगाला धैर्यानेंच तोंड दिलें पाहिजे. परमेश्वर सर्वसाक्षी आणि परम न्यायी आहे. शेवटीं 'सत्यमेव जयते' ही महदुक्ति खरी ठरलीच पाहिजे. दादासाहेब, कोतवालसाहेब,

[ चाल—आस तेरे कर० ]

**हा अपराधि तुझा जरि गमला। बांधियलें या व्यसन-**
**पाशिं जरि मम निर्मलता सत्यनिष्ठा पूर्वजांचि सुप्र-**
**तिष्ठा न पावे जरि नाश पावुनि तीच सोडवील याला॥**

[ जातात.

---

## प्रवेश तिसरा.

[ **स्थल**—रस्ता. दामिनी प्रवेश करते. ]

**दामिनी**—विश्वानंद वगैरे मंडळींच्या साहाय्यानं पुरंदराला बंदोबस्तानं कोंडून ठेवून मंदाराच्या घरीं मी जातें, तों तो आपल्या पत्नीला अन् रजनीकांतांनां कोतवालाकडून कैद करवून दरबारांत घेऊन गेल्याचं मला समजलं. वाहवा! काय मौज आहे! कारस्थानं करणारा बहाद्दर रहातो बाजूला अन् भलत्याच मनुष्यांनां त्याबद्दल प्रायश्चित्त मिळतं! मलाहि आतांच्या आतां दरबारांत जाऊन या सर्व प्रकरणाचा ताबडतोब उलगडा केला पाहिजे, नाहीं तर त्या बिचाऱ्यांवर निःसंशय कांहीं तरी भयंकर प्रसंग ओढवेल. या प्रकरणाचा निकाल लावून आपण आपल्या मुख्य कामाला लागलं पाहिजे. मध्यंतरीच्या या भानगडींमुळं प्राणनाथांच्या शोधाचं काम तसंच दिरंगाईवर पडलं खरं, पण त्यामुळं एका नीच भयंकर अधमाधमाचीं कृष्णकारस्थानं उघडकीला आणून कांहीं अनाथ निरपराध प्राण्यांची त्याच्या राक्षसी पकडींतून मुक्तता केल्याचं श्रेय तरी पदरीं पडेल. अगबाई! पण मी विचाराच्या भरांत अगदीं दरबाराजवळ आलें म्हणायची! प्रथम दरबारांत न जातां तेथील सर्व प्रकार आपण दुरूनच पाहूं या. रागरंग पाहून नंतर योग्य प्रसंगीं प्रगट होणं बरं. हे या उच्चासनावर विराजमान झालेले येथले अधिपति दिसतात. हे तर आमच्या पुरंदररूपी राक्षसाच्या भजनीं लागलेले भोळे पशुपति मंदार. त्याच्या भयंकर कृष्णकारस्थानामुळं संकटाच्या फेऱ्यांत सांपडलेल्या या इंदुमतीबाई अन् तारिणीराणीसाहेब. अन् हे कोण बरं? हें मीं काय पहातें? ज्यांचा मला रात्रंदिवस ध्यास लागून ज्यांच्या दर्शनाकरितां मी इतकी उत्कंठित झालें आहें, तेच का हे माझे हृदयवल्लभ? छे, पण हा कांहीं तरी मला भास होतो आहे झालं! रजनीकांत म्हणून म्हणतात ते हे असतील; पण माझ्या प्राणनाथांनीं हें नांव धारण केलं नसेल कशावरून? शंका कशाला? पण मी स्वप्नांत तर नाहींना? हा सारा भ्रम तर नव्हे? नाहीं, भ्रमहि नव्हे अन् हें स्वप्नहि नव्हे. हे माझे प्राणनाथच!

[ चाल--परदेसी संया० ]

**मत्प्रेमपरागा सेवी सदा तो अलि या स्थलीं ये धांवुनी। भास न हा मूर्ति जी वसली सदा हृदया-**

**सनीं ॥ ध्रु० ॥ व्यसनराहु हा ग्रासी। या निष्कलंक चंद्रासी। परि तेज उणें नच झालें। दिसतसे पूर्ण भरलेलें। ओळख पटवी स्वप्रणयाची अपुलया पदीं मन वेधुनी ॥ १ ॥**

नेत्रांनों! फार दिवस या प्रिय मूर्तीच्या दर्शनाविषयीं तुह्मी तृषित झाला होतां; घ्या आपली आतां यथेच्छ तृप्ति करून. पण मी अशी भांबावलें कां बाई? आतां तर मला अधिक त्वरेनं अन् दुप्पट नेटानं माझ्या कामाला लागलं पाहिजे. जें कार्य मी आतांपर्यंत निष्कामबुद्धीनं केवळ परोपकार ह्मणून करीत आलें, त्या कार्यांत आतां परमेश्वराच्या कृपेमुळं स्वार्थपरताहि आली आहे! देवा, या प्रसंगीं तूंच मला सहाय हो.

[ चाल—नादिरदानी तदानि० ]

**प्रभुवरा वितरिं। बल मम अंतरिं। पाडुनी व्यसनिं घोर जो दुःखि वल्लभ मम करि। दंडुनि तो अरि। मुक्त करिन मी प्रियतनु झडकरि ॥ ध्रु० ॥ तोडिन संकटपाश पतीचे। परी तयांसी त्वरें करिं धरुनि। सुबाहुबंधांनीं। बद्ध करिन ह्मणिं। भिजविन अश्रुंनिं। धीर न अणुभरि ॥ १ ॥**

[ जाते.

---

## प्रवेश चवथा.

[ **स्थल**—दरबार. तारानाथ, मंदार, रजनीकांत, तारिणी, इंदुमती, कोतवाल, शिपाई वगैरे योग्य जागीं बसलीं व उभीं आहेत, असा प्रवेश. ]

**तारानाथ**—रजनीकांत! तुमचें या विषप्रकरणांत इंदुमतीबाईनां साहाय्य आहे; तसेंच, कांहीं दिवसांपूर्वी मंदारांवर दरोडेखोरांकडून झालेला हल्लाहि तुह्मींच करविलात, असा मंदारांचा तुमच्यावर उघड आरोप आहे, तो खरा आहे काय? खरें असेल तें परमेश्वराला स्मरून या न्यायासनासमोर कबूल करा.

**रजनीकांत**—कोतवालसाहेब आह्मां दोघांनां न्यायला येण्यापूर्वी मला या विषप्रकरणांतील एका अक्षराचीहि माहिती नव्हती. केवळ मंदारांचें आपणावर

पूर्ववत् प्रेम बसावें ह्मणून आपण कांहीं उपाययोजना केली आहे, असें इंदुमती बाई मजजवळ एकदा बोलल्या होत्या. ह्या विषप्रकरणाचा आरोप मजवर जसा खोटा आहे, तसाच त्या हल्ल्याबद्दलचा मजवरचा आरोपहि अगदीं असत्य आहे. दादासाहेबांवर हल्ला झाला, त्यावेळीं मी हल्ल्याच्या ठिकाणीं दैववशात् गेलों होतों खरा—परंतु मी दररोज त्यावेळीं गांवाबाहेर सहल करण्यास जात असतों, त्याप्रमाणें त्या दिवशींहि मी त्या बाजूला सहज गेलों होतों. दररोज सायंकाळीं मी शहराबाहेर सहल करायला जात असतों, याबद्दल इंदुमतीबाई साक्ष देतील.

**मंदार**—पण यांत हिची साक्ष काय उपयोगाची? चोराला चोर सामील असणारच!

**तारानाथ**—मंदार, तुह्मी असे मध्येंमध्यें बोलूं नका. त्यानें न्यायाच्या कामाला उगीच व्यत्यय येतो. रजनीकांत, तुह्मी दोघेंहि एकाच अपराधासंबंधीं आरोपी आहां, तर इंदुमतीबाईची साक्ष न्यायाच्या कामीं कशी चालणार?

**रजनीकांत**—तर मग दुसरा पुरावा मला काय देतां येणार? सरकार! आपण माझ्या शब्दावरच या बाबतींत विश्वास ठेविला पाहिजे, त्याशिवाय इलाज नाहीं. मी परमेश्वराला स्मरून सांगतों, कीं,

[ चाल—हमसे नजरिया० ]

**प्रमाद असा न करीं झाला। स्वकुलनामदीपा कुमति**
**धरुनि हीं न मालविला ॥ ध्रु० ॥ लोटिल रौरविं**
**पितरां ऐसा मार्ग कधिं न मीं आक्रमिला ॥ १ ॥**

**मंदार**—अंः! प्रत्यक्ष प्राणदात्याच्या जीवावर जो उठला, तो स्वर्गस्थ पितरांची थोडीच पर्वा करणार आहे!

**तारानाथ**—रजनीकांत! तुमच्या शब्दावर आह्माला कसा विश्वास ठेवितां येईल? आरोपीचा शब्द हाच पुरावा मानायला हें जग ह्मणजे कांहीं पवित्र सत्यलोक नव्हे किंवा हें सत्ययुगहि नव्हे. इंदुमतीबाई, या बाबतींत तुमचें काय ह्मणणें आहे?

**इंदुमती**—मी अगदीं निरपराध आहें, हें मी सत्य स्मरून सांगतें. मात्र मीं इकडे दुधांतून एक भस्म दिलं होतं, हें खरं आहे.

**तारानाथ**—मग त्या भस्माचें विष कसें झालें?

**इंदुमती**—माझ्या दुर्दैवानं! दुसरं काय सांगूं?

**तारानाथ**—तें तर उघडच दिसतें आहे. तें भस्म मंदारांनां द्यायला रजनीकांतांनीं तुह्माला सांगितलें होतें का ?

**इंदुमती**—छे, मुळींच नाहीं. रजनीकांतांनां यांतली कांहींसुद्धां माहिती नाहीं.

**तारानाथ**—तर मग तुह्मी एकटयानेंच का हें सगळें काम उरकलेंत ?

**इंदुमती**—महाराज ! या हतभागिनीच्या आधींच पोळलेल्या अंतःकरणावर आपण असं बोलून आणखी कां बरं चरके देतां? इकडचं प्रेम मजवर पूर्णपणं बसावं ह्मणून माझ्या विनंतीवरून तें भस्म एका साधूनं इकडे द्यायला मला सांगितलं होतं. आपल्या अर्धांगीनंच मला त्या साधुवर्यांच्या मठांत नेलं.

**तारिणी**—ह्मणजे ? त्या मेल्यानं दिलेलं तेंच का हें भस्म ? तर मग महाराज, त्याच–त्याच कसाबाचं हें सारं कृत्य !

**मंदार**—महाराज, या चांडाळणीच्या बोलण्यावर आपण मुळींच विश्वास ठेवूं नये. मला विषप्रयोग करून ठार मारण्यांत त्याला काय फायदा ? ही ह्मणते हें सारें थोतांड आहे !

**तारानाथ**—त्या साधूनें भस्म ह्मणून यांनां विष दिलें नाहीं, असें ह्मणायला तुमच्याजवळ तरी काय आधार आहे ?

**मंदार**—आधार माझी खात्री !

**तारानाथ**—तुमची खात्री ह्मणजे कांहीं पुरावा नव्हे. पुराव्याला तशींच सबळ कारणें लागतात. इंदुमतीबाई, त्या साधूचें नांव काय बरें ?

**इंदुमती**—नांव मला माहीत नाहीं. पण रामतीर्थाजवळ त्यांचा मठ आहे.

**मंदार**—सरकार ! त्या साधुमहाराजांवर या चांडाळणीनें हें निव्वळ कुभांड रचलें आहे ! ते साधुवर्य खरोखर एक महात्मे आहेत.

**तारानाथ**—तुमच्यासारखी भोळीसांब मंडळी आहे ह्मणूनच अशा बदमाषांचें जगांत चाललें आहे ! कोण आहेरे तिकडे ? रामतीर्थांजवळच्या मठांतील त्या बिलंदर साधूचा तपास करायला गेलेलीं माणसें परत आलीं कीं नाहीं ?

**सेवक**—( प्रवेश करून ) होय सरकार.

**तारानाथ**—कुठें आहे तो हरामखोर दगलबाज ?

**सेवक**—आह्मी त्याला पकडून आणायला गेलों, तों त्याचा जळून कोसळलेला मठ मात्र आह्मांला दिसला. तेथें कुणी चिटपांखरूंहि आह्माला आढळलें नाहीं.

**तारानाथ**—शाबास शाबास ! माझ्या अधिकाऱ्याचा काय हा दक्षपणा ! काय भयंकर अंधाधुंदी ही ! थांबा, त्या बदमाषाबरोबरच आतां तुझा सर्व अधिकाऱ्यांचाहि योग्य बंदोबस्त मला केला पाहिजे ! इंदुमतीबाई, त्या साधूचा शोध लागेपर्यंत आलेल्या आरोपांतून तुमची मुक्तता होत नाहीं; ह्मणून तोंपर्यंत आमच्या नजरकैदेंत तुह्मांला राहिलें पाहिजे. तुमच्या आजपर्यंतच्या निष्कलंक वर्तनावरून व या निष्कपट मुद्रेवरून तुह्मीं अशीं नीच कृत्यें केलीं नसावींत, अशी माझी खात्री आहे. पण या दोन्हीं प्रकरणांचा योग्य उलगडा होईपर्यंत तुह्मांला आमच्या कैदेंतच राहिलें पाहिजे. रजनीकांत, तुह्मालाहि आमच्या कैदेंत राहिलें पाहिजे.

**रजनीकांत**—महाराज, केवळ संशयावरून मला आपण हें कठोर शासन कसें करतां ?

[ चाल–तेरा मन भायो० ]

**दया मनिं वरा नृपालवरा ॥ ध्रु० ॥ धाडुं नका हो का-**
**रागारीं दोषरहित या नरा ॥ १ ॥ दोषी गणुनी लां-**
**छन नच द्या न्यायनीतिपथ वरा ॥ २ ॥**

**तारानाथ**—माझ्या न्यायबुद्धीला जें योग्य वाटलें, तेंच मीं केलें आहे. हं, न्यारे या दोघांना !

**दामिनी**—(एकदम प्रवेश करून) हां ! खबरदार, कोणी यांनां हात लावाल तर. ( राजास ) महाराज ! काय हा भयंकर अन्याय ?

[ चाल—संयांको जानेन० ]

**न्यायदेवता पवित्र दूषिता करीतसां ॥ ध्रु० ॥ घोर समय**
**हा असा आणिला जयें तो असुनि मुक्त निरपराध**
**योग्य शासना कसा ॥ १ ॥ नयपर बहु ऐशी कीर्ति**
**विमल जी जगीं करुनि समल दोष हाच पदरिं काय**
**घेतसां ॥ १ ॥**

**तारानाथ**—अरे, हा आणखी कोण बैरागी ? आमच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळें आमच्या राज्यांत अलीकडे बैराग्यांचाच चहूंकडे सुळसुळाट झालेला दिसतो. तरुण गोसाव्या ! हा सरकारी दरबार असतां बिनपरवानगीनें आंत येऊन तूं मर्यादेचें उल्लंघन करण्याचें धाडस कसें केलेंस ?

**दामिनी**—एखादा निरपराध मनुष्य निष्कारण संकटांत सांपडला असतां, त्याची मुक्तता करण्याच्या हेतूनं जर असं मर्यादेचं उल्लंघन झालं, तर तें अगदीं क्षम्य आहे.

**मंदार**—कोण कमलाकर ? तूं महाराजांकडून का आलास? माझ्यासाठीं या प्रकरणाचा उलगडा करायला साधुमहाराज स्वतः दरबारला येत आहेत वाटतें!

**दामिनी**—होय, साधुमहाराज याच प्रकरणाचा उलगडा करायला स्वतः इकडे येत आहेत; पण ते आपल्यासाठीं येत नसून स्वतःच्या दारुण पापकृतींचा या न्यायासनासमोर उलगडा करायला अन् हे रजनीकांत अगदीं निर्दोष आहेत, असं सिद्ध करायला चतुर्भुज होऊन येत आहेत !

**तारिणी**—महाराज, याच महात्म्यानं माझी त्या चांडाळाच्या कचाटींतून मुक्तता केली.

**तारानाथ**—कमलाकर, रजनीकांत निर्दोष आहेत असें तूं कोणत्या आधारानें ह्मणतोस ?

**दामिनी**—आपल्यासमोर मूर्तिमंत आधारच आणून उभा करतों. सदानंद, या त्याला झटकन् घेऊन. [ शिष्यमंडळी पुरंदराला आणते. ] सरकार, या सर्व अनर्थाला हाच नराधम सर्वस्वीं कारण आहे.

**तारानाथ**--कोण पुरंदर ? अरे, तुझेच का हे सारे खेळ ?

**पुरंदर**—होय, हे सारे माझेच खेळ आहेत. तुझ्या या कान्तिपुर शहरांत आणि तुझ्या राज्यांत वाटेल तीं घोर कृत्यें करायला मी आजपर्यंत कुणाचीच लवमात्र क्षिति बाळगली नाहीं. त्याचप्रमाणें माझीं सर्व कृत्यें तुझ्या तोंडावर सांगायलाहि या प्रसंगीं मी डरत नाहीं. तुला माझें काय शासन करायचें असेल तें खुशाल करून घे-तुला मी बिलकुल भीत नाहीं.

**तारानाथ**—पुरंदर, तुझ्या हातून अशीं घोर व नीच कर्मे घडतील, असें मला कधींहि वाटलें नव्हतें. हा सर्व अनर्थ घडवून आणायला तुला कारण तरी काय झालें ?

**पुरंदर**—तारानाथ ! याला कारण तूं स्वतःच ! तुझ्यावर पुरता सूड उगविण्यासाठींच मला हें सर्व करावें लागलें. तूं माझा कसा भयंकर उपमर्द केलास, हें तुझ्या ध्यानांतून आतां गेलें काय ? मी तुझा बंधु तुझ्यापाशीं आश्रयाची याचना करायला आलों, तेव्हां तूं मला निष्ठुरपणें राज्यांतून हद्दपार न करतां

सदय अंतःकरणानें मला आश्रय दिला असतास, तर आजचा हा प्रसंग तुझ्यावर कधींहि आला नसता!

**तारानाथ**—पुरंदर, मीं तुला त्यावेळीं हद्दपार केलें, तें केवळ तुझ्या हितासाठीं–केवळ तुझें वर्तन सुधारावें ह्मणून. संकटपरंपरेनें तरी तुझे दुर्दमनीय दुर्गुण जातील अशी माझी कल्पना होती. पण तूं माझा अशा रीतीनें सूड उगवायला तयार होशील, असें मला वाटलें नव्हतें.

**पुरंदर**—काय करूंरे! या कमलाकराच्या संदर मुखकमलावर विश्वास ठेवून मी फसलों! नाहीं तर आज जसा मी तुझ्यासमोर उभा आहें, तसाच या प्रसंगीं तुला माझ्यासमोर उभा केला असता; पण या चांडाळानें माझा घात केला!

**मंदार**—अहो साधुमहाराज ऊर्फ पुरंदरबुवा! मला ठार मारण्यासारख मी तुमचा अपराध तरी काय केला होता?

**पुरंदर**—मला हद्दपार करण्याची युक्ति तारानाथाला तूंच सांगितलीस. तसेंच, आह्मीं ठिकठिकाणीं घातलेल्या दरोड्यांचा शोध लावायला तुझेच श्रम विशेष कारणीभूत झाले, ह्मणून तुला प्रायश्चित्त देण्यासाठीं तुझ्यावर हल्ला करवून मी या माझ्या पूर्वींच्या मित्रांकडून, पण सध्यांच्या वैऱ्यांकडून तुला नाहींसा करून तुझ्या कनककांतेचा लाभ करून घेणार होतों. पण रजनीकांतानें त्या प्रसंगीं माझा घात केला! तेव्हां त्यालाहि सुडाच्या यादींत गोवणें मला भाग पडलें; आणि तुह्मा दोघांचा सूड उगविण्यासाठीं मला हें विषप्रकरण उपस्थित करावें लागलें.

**तारानाथ**—रजनीकांत आणि इंदुमतीबाई, तुह्मी उभयतांहि दोषमुक्त झालां आहांत. काय मंदार! तुमच्या मनांत आतां कांहीं प्रकाश पडला का?

**मंदार**—( खालीं मान घालून ) मला आतां बोलायला तोंडच नाहीं सरकार!

**सर्व शिष्य**—कमलाकर, आह्मीतर पुरे नीच आहोंत, पण आपल्या वचनाला जागून आतां आमचें रक्षण करणें सर्वस्वीं तुझ्या हातीं आहे.

**दामिनी**—सरकार, पुरंदराच्या या तिघां साथीदारांनीं त्याच्या शिकवणीनं आजपर्यंत अनन्वित कृत्यं केलीं आहेत. पण आतां त्यांनां कृतकर्मांचा पूर्ण पश्चात्ताप झाला आहे. या तिघांनां आपण पूर्ण क्षमा करावी, अशी सरकारला माझी नम्र विनंति आहे.

**तारानाथ**—कमलाकर, पुरंदराच्या साधुपणाचें पटल दूर करून आपलें साधुत्व तूं पूर्णपणें सिद्ध करून दाखविलें आहेस. तुझे आमच्यावर इतके मोठे उपकार झाले आहेत, कीं, तुझा कोणताहि शब्द आम्हाला अमान्य करणें अशक्य आहे. या तिघांनांहि आम्हीं क्षमा केली आहे. पुरंदर! तूं जरी माझा प्रत्यक्ष बंधु असलास तरी माझ्या प्रजेच्या हिताकरतां व तुझ्या घोर अपराधांचें तुला न्याय्य शासन मिळावें, म्हणून सर्व दयामाया बाजूला ठेवून तुला जन्मठेप कैदेची शिक्षा मी फर्मावतों. तुझी हस्तक, ती चांडाळीण चित्रांगदा–तिलाहि हीच शिक्षा भोगावी लागेल. मंदार, तुमच्या या पूज्य गुरुमहाराजांची योग्य बरदास्त ठेवण्याचें काम मी तुम्हावरच संपवितों. चला यांनां घेऊन–

**पुरंदर**—तारानाथ! मी तुझी ही शिक्षा कधींहि भोगणार नाहीं, ही तुझी खात्री असूं दे–( पुरंदर, मंदार व सेवक जातात. )

[ पडद्यांत—" अरे, हा काय चमत्कार! या पुरंदरानें बोटांतील आंगठीची हिरकणी चावून आत्महत्या केली!" असा शब्द होतो. रजनीकांत व दामिनी यांशिवाय सर्वजण आश्चर्यचकित होऊन लगबगीनें जातात. ]

**दामिनी**—रजनीकांत, आपली निर्दोषता आतां पूर्णपणं स्थापित झाली असतांहि आपल्या मुद्रेवर अजून अशी खिन्नता कां बरं?

**रजनीकांत**—या दोषमुक्ततेनें माझ्या हृदयांत सदोदित वास करीत असलेल्या दारुण यातनांतून माझी मुक्तता कशी होणार? कमलाकर, मजवर आलेल्या या भयंकर आरोपांतून तूं मला मुक्त करण्याची कृपा केलीस याबद्दल मी तुझा जन्माचा ऋणी आहें, पण जें दुःख—

**दामिनी**—असं कोणतं दुःख आपल्या हृदयांत वास करीत आहे, तें जर मला कळेल, तर त्याहि दुःखांतून आपणाला मुक्त करायचा मी मनःपूर्वक प्रयत्न करीन.

**रजनीकांत**—कमलाकर! माझ्या दुःखाची तुला यथार्थ कल्पना नाहीं, म्हणून तूं असें म्हणतोस. कालानें माझ्या बाहुपाशांतून हिरावून नेलेली माझी प्रिया मला परत भेटवून माझें दुःख नाहींसें करणें, हें आतांच्या तुझ्या उपकाराइतकें सोपें काम नाहीं!

**दामिनी**—( हंसून ) अंः! हें काम तर अगदींच सोपें आहे!

**रजनीकांत**—कमलाकर, तुझे मजवर इतके उपकार झाले आहेत, कीं, तूं माझी कशीहि थट्टा केलीस तरी ती मला मुकाट्यानें सहन केलीच पाहिजे. परन्तु

प्रियाविरहानें पोळलेल्या माझ्यासारख्या दीन अभागी मनुष्याची अशी थट्टा करणें तुझ्या सहृदयत्वाला शोभतें का ?

**दामिनी**—रजनीकांत ! मी आपली थट्टा करीत नाहीं. आपल्या स्वर्गस्थ प्रियेची भेट करविणं हें मला खरोखरच फार सोपं वाटतं.

**रजनीकांत**—म्हणजे ?

**दामिनी**—( हंसून ) मलाच आपल्या बाहुपाशांत बद्ध करा म्हणजे आपली प्रिया आपणाला कालाकडून जशीच्या तशीच परत मिळेल !

**रजनीकांत**—कमलाकर, तूं दिसतोस तसा नसून कोणी तरी विलक्षण पुरुष आहेस, असें मला वाटतें; पण—

**दामिनी**—नाहीं महाराज ! मी विलक्षण पुरुष नाहीं–

**रजनीकांत**—तर मग तूं आहेस तरी कोण ?

**दामिनी**—या हतभागिनीची आपणाला अजूनहि ओळख पटूं नये, इतकं माझं दुर्दैव अजूनहि माझ्या सुखाच्या आड येत आहे का ? ( बैराग्याचा वेष काढून ) आतां तरी पटते का कांहीं ओळख ?

**रजनीकांत**—( आश्चर्यानें ) कोण ? माझी दामिनी ?—

[ चाल—कोयलिया कूंके० ]

**प्रिय सुदति शंकाविमुक्त करीं । मम विनति परिसुनी**
**द्रवुनि मनीं प्रभु का मज दर्शन द्याया भूवरि तुज धाडी**
**वद वद सुंदरि ॥ ध्रु० ॥ कीं नच झाला छल अजुनि पूर्ण**
**तद्रूपें तुज ह्मणुनी प्रेषुनि प्रभु मज वंचुनि अधिक**
**छल करी ॥ १ ॥**

प्रिये, तूं खरोखर माझी दामिनीच आहेस ना ?

**दामिनी**—मी कोण आहें, हें आतां सांगितलं का पाहिजे ?

[ चाल—नोहे लाज न आई० ]

**शंकित मति कां जाहली । जवळी ही असुनियां दासी**
**अपुली । स्वीकारुनि कर जीचा स्वयें धन्य जिस**
**केली ॥ ध्रु० ॥ आपणासह सुखदुःख भोगण्या अर्पुनि**
**तनु भार्या अपुली विधिपूर्वक ठरली ॥ १ ॥**

**रजनीकांत**—प्रिये, होय होय–तूंच माझ्या हृदयांतील दुःखांधकाराचा नाश करणारी दामिनी आहेस ! ( तिला आलिंगन देऊन ) प्रिये, दुःखाश्रूंनीं डोळे

निर्बल झाल्यामुळें मीं तुला ओळखलें नाहीं, याबद्दल मी तुझा अपराधी आहें. मला क्षमा कर.

**दामिनी**—प्राणनाथ, मीच आधीं आपली क्षमा मागितली पाहिजे.

[ चाल–चमके चपला० ]

**म्लानपणा ये वदनीं या न उरलें तेज तया। व्याधि**
**उलट भय घेति अंतरीं सुदृढ तनुसि ज्या स्पर्श क-**
**राया। झाली विरहें ती कृश काया॥ ध्रु०॥ ज्या नयनां-**
**तिल तेज पाहुनी लज्जित मृग होती। अश्रुपूर वाहुनि**
**लोचन ते स्फटिकसमचि दिसती। स्थिति दीना ही**
**व्हाया अशुली कारण खरि ही पापिणि झाली त्रासवी**
**हा विचार हृदया॥ १॥**

[ तारानाथ, मंदार, तारिणी, इंदुमती, वगैरे प्रवेश करतात. ]

**तारानाथ**—बिलंदर तो शेवटपर्यंत बिलंदर! असो–पण हें काय? रजनीकांत, ज्या महात्म्यानें आह्मा सर्वांची घोर संकटांतून मुक्तता केली, तो कुठें आहे? आणि या कोण?

**रजनीकांत**—महाराज! ही माझी प्रिय पत्नी दामिनी! हिनेंच आह्मां सर्वांची सकटांतून मुक्तता केली.

**तारानाथ**—काय? दामिनी आणि कमलाकर एकच? दामिनीबाई! त्या नीचाचीं जीं भयंकर कारस्थानें मला किंवा माझ्या अधिकाऱ्यांनां कळलीं नाहींत, तीं तुह्मीं उघडकीला आणून आह्मांला आणि आमच्या सर्व प्रजाजनांनां मोठ्या संकटांतून आणि काळजींतून मुक्त केलेंत, हे तुमचे आह्मांवर कधींहि न फिटण्यासारखे उपकार झाले आहेत.

**दामिनी**—महाराज, आपणावर किंवा आपल्या प्रजाजनांवर माझे कसलेहि उपकार झाले नाहीत. माझ्या हातून जर कांहीं झालं असेल, तर त्याचं सर्व श्रेय माझ्या प्राणनाथांकडेच आहे. इकडच्या उपदेशाचं अन् सत्संगतीचंच तें फळ आहे.

**तारानाथ**—रजनीकांत! तुह्मी अत्यंत दैवशाली आहां, यांत संशय नाहीं! ह्मणूनच तुह्मांला दामिनीबाईसारख्या चतुर व सद्गुणी अर्धांगी मिळाल्या आहेत. अशी पत्नी मिळणें हें पूर्वपुण्याईचेंच फळ होय. असो, मंदार, झालेंना तुमच्या कुशंकांचें आतां तरी समाधान?

**मंदार**—हो, तसें ह्मणायला कांहीं हरकत नाहीं; पण रजनीकांतांचा आणि इंदुमतीचा स्नेह सहेतुक नसेलच असें कांहीं मला वाटत नाहीं.

**रजनीकांत**—अं: ! याचा उलगडा करणें अगदीं सोपें आहे ! माझ्या प्रियेची भेट होईपर्यंत कोणाहि आप्तमित्रांनां ओळख न देतां उदासीनतेनें आयुष्याचे दिवस कंठायचा माझा दृढनिश्चय होता, त्याची सांगता आतां झाली असल्यामुळें आतां माझ्या या आवडत्या भगिनींनां माझी ओळख द्यायला मला कांहीं हरकत वाटत नाहीं. तारिणी ! इंदुमती ! तुमचा हा बंधु मधुकर तुमच्याशीं आजपर्यंत कपटानें वागला, याबद्दल याला क्षमा करा.

**इंदुमती**—दादा ! तुला शेवटीं आमची कींव आली तर ?

[ चाल—तोसे लागी नजरिया० ]

**ही किती उतावीळ होत तव दर्शनाला । जरि बहु दिनयोग न आला हा प्राप्त सुदिन परि झाला ॥ ध्रु० ॥ तव दर्शनाशा न होई सफल ह्मणुनि वेष्टी निराशा मनाला तोंचि सुखद हा दिन आला त्वां जाणुनि मम अंत पाहिला ॥ १ ॥**

**तारिणी**—दादा, लहानपणींच आह्मांला सोडून गेलास, पण इतक्या दिवसांत आमचं स्मरणहि तुला होऊं नये ना ?

**रजनीकांत**—तारिणी ! असें कसें होईल ? अल्पवयांत लग्न करून आह्मां पतिपत्नींच्या योगक्षेमाचें सर्व ओझें वडिलांवर टाकणें मला बरें वाटेना आणि बाबा तर माझ्या लग्नाविषयींचा आपला आग्रह सोडिनात. ह्मणून कोणालाहि न कळवितां मला देशांतरास जाणें भाग पडलें. तिकडे ज्ञानधनार्जन करून व अनुरूप वधूशीं विवाह करून मी माझ्या पत्नीसह परत आपल्या जन्मभूमीला येतों, तों बाबा निवर्तल्याची व तुमचे विवाह होऊन तुह्मी आपापल्या पतींच्या घरीं सुखानें नांदत असल्याची बातमी मला कळली. हिला हिच्या वडिलांकडे पोंचवून मी तुमच्या भेटीला येण्याच्या हेतूनें जहाजांत बसून निघालों असतां आमच्या दुर्दैवानें मध्येंच आमचें जहाज फुटलें ! पुढची सारी हकीगत तुह्मांला ठाऊकच आहे.

**इंदुमती**—दादा, तूं मला पूर्वी ओळख दिली असतीस तर पुढचं हे अनर्थ टळून तुला व आह्माला किती तरी सौख्य झालं असतं नाहीं का ?

**रजनीकांत**—मी असा कां राहिलों, हें मीं मघांशींच सांगितलें आहे. तुझांला मीं ओळख दिली असती तर माझी प्रतिज्ञा मला पार पाडतां आली नसती.

**तारानाथ**--शेवट गोड तें सारें गोड ! रजनीकांत, तर मग तुझी कोणी परकी नसून माझ्या प्रियेचे बंधु मधुकरच आहांत ! अहाहा ! काय आनंदाचा दिवस आज उगवला हा ! मंदार, आतां तरी तुमच्या शंकांचें पूर्ण निरसन झालेंना ?

**मंदार**--महाराज ! माझ्या मूर्खपणाचा मला आतां पूर्ण पश्चात्ताप होत आहे. मी कोणत्या तोंडानें मधुकरांची आणि इंदुमतीची क्षमा मागूं ?

**इंदुमती**—माझी कसली क्षमा मागायची ? मी आपली दासी ना ?

**रजनीकांत**—आपलें मन माझ्याविषयीं पूर्ववत् स्वच्छ झालें, हें पाहून मला अत्यंत आनंद झाला आहे. माझी क्षमा मागण्याचें आपणाला खरोखर कांहीं कारण नाहीं.

**मंदार**—दामिनीबाई, तुह्मीं माझ्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालून मला शुद्धीवर आणलेंत, हे तुमचे उपकार मी कसे फेडूं ?

**दामिनी**—माझे जर आपणाला कांहीं उपकार वाटत असतील तर आपण आपल्या पत्नीवर पूर्ण प्रेम केलं, ह्मणजे माझे सर्व उपकार फिटतील. वन्सं ! आपणा उभयतांनां या दुष्ट जगाचा आतां बराच अनुभव आला आहे असं ह्मणायला कांहीं हरकत नाहीं. आतां तरी एखाद्या खुळ्या इच्छेला वश होऊन आपणाला आणि आपल्या पतींनां पुनः अशा संकटांत घालूं नका, असं मी लहान तोंडीं मोठा घांस घेऊन सांगायचं धाडस करतें.

**तारिणी व इंदुमती**--वहिनी, असं कांहीं मनांत आणूं नकोस. तुझे आह्मांवर जे उपकार झाले आहेत ते जन्मोजन्मीं फिटणार नाहींत !

**तारानाथ**—दयाघन परमेश्वराच्या कृपेनें सर्व संकटांचें निरसन होऊन हा अत्यंत सुखाचा दिवस आज प्राप्त झाला. दामिनीबाई ! तुमच्या अवर्णनीय उपकारांतून थोडें तरी मुक्त होण्याकरतां मीं तुमचें काय प्रिय करावें ?

**दामिनी**—दारुण विरहाचा शेवट होऊन प्राणनाथांची भेट झाली, यापेक्षां मला अधिक प्रिय तें काय असणार ? तरी पण आपला व इतर वडील मंडळीचा हा आशीर्वाद असावा--

३३०

[ चाल—जयति जय सुरसरित्• ]

करुत युवती गुणें भूषिता ही धरा ॥ ध्रु० ॥ भवसिंधु नर तरति । सह घेऊनि युवति । ज्ञानपथ आक्रमिति । त्यजुनि परि तत्करां ॥ १ ॥ हा भेद विस्मरुनि । ज्ञान-जल सिंचुनी । करुत सहगामिनी । सुजन त्या पामरा ॥ २ ॥ अल्प जरि तत्सुकृति । कौतुकें सुजनिं ती । आदरावी स्वमति । करुनि निर्मत्सरा ॥ ३ ॥

[ पडदा पडतो. ]

---

# ईशस्तुति.

[ चाल–आद्या स्मरदमना० ]

जय जय भवजनिते मंगले । त्रिभुवनविजये प्रभुवरकान्ते । विश्वा चलन देसी परि न दिससी दृष्टितें ॥ ध्रु० ॥ ज्ञाते मुनिजन सकलहि सुरगण जाती मोहुन तुजसी पाहुन तव बल घेउन अचिंत्य अरूप धरी तनूतें ॥ भो माये विलीन मी तुझ्या पदीं कृपा करीं आवरिं संसृतिपटला दावीं त्वरें मला परात्परातें । मंगले ॥१ ॥

संपूर्ण.

## विक्रीस तयार !

**संगीत जयद्रथविडंबन नाटक.**–याच ग्रंथकर्त्रीनें लिहिलेलें. वर्तमानपत्रें व मासिकें यांचे उत्तम अभिप्राय. कापडी सोनेरी बाइंडिंग. किंमत ८ आणे.

## लवकरच तयार होईल.

याच ग्रंथकर्त्रीनें लिहिलेलें **संगीत मिराबाई नाटक** लवकरच तयार होईल. यांत श्रीगिरिधर-लालजीची सुप्रसिद्ध भक्तशिरोमणि मिराबाई हिचें मनोहर प्रेमळ चरित्र ग्रथित केलें आहे.